नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १८३ * * नागपूर * | बुधवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्रग्रलेख

## खरीखरी...

## दिसते तसे नसते

आज हरियाणा आणि जम्मू-काश्मीर या दोन राज्यांचे विधानसभा निवडणुकांचे निकाल लागले. या दोन राज्यांच्या निकालात एक गोष्ट स्पष्ट दिसून आली की, जसे दिसत होते तसे निकाल आले नाहीत. या निकालांचे विश्लेषण केल्यावर जे दिसून येत आहे. त्यावरून भारतीय जनता पक्षाने हरियाणामध्ये जाट विरुद्ध सर्व जाती या सूत्रात काँग्रेसला धोबीपछाड दिलेली आहे. काँग्रेसच्या तिकीट वाटपात ज्येष्ठ म्हणजे मोठ्या हुड्डांनी केलेली हुड्डेगिरी काँग्रेसला महागात पडलेली आहे. जशी राजस्थानात गेहलोतगिरी महागात पडली, तशीच हरियाणात तीच गोष्ट पुन्हा महागात पडली. भारतीय जनता पक्षाजवळ निवडणूक लढण्याचे जे तंत्र आहे. त्या तंत्राचा उपयोग करून सर्वसमावेशक उमेदवारांना तिकीटे देण्यात आली होती. काँग्रेस पक्षात सर्व राज्यांमधील आपसातील गटबाजीने काँग्रेसचे नुकसान केलेले आहे. कुमारी सैलजा हरियाणा मध्ये बरेच दिवस कोपभवनात बसल्या होत्या. त्या उलट भारतीय जनता पक्षाने ओबीसींचा मुख्यमंत्री करून बरीच मते आपल्या पारड्यात खेचून घेतली. हरियाणातील मतदारांना एक्झिट पोलवाले जे प्रश्न विचारत होते. त्यात एक प्रश्न किंवा मुद्दा नक्की होता. तो म्हणजे हरियाणात परिवर्तन झाले पाहिजे. पण त्या शहाण्या प्रश्न विचारणाऱ्या लोकांना हे समजलेच नाही की, भाजपने निवडणुकीच्या आधीच सहा महिने परिवर्तन करून टाकलेले आहे. खट्टर यांचे लोढणे भारतीय जनता पक्षाला भारी पडेल. हे समजून आल्याबरोबर पंजाबी खट्टरांना खटाऱ्यात बसवून भाजपने त्यांना लोकसभेला पाठवून दिले. हे परिवर्तन भारतीय जनता पक्षाला चांगलेच फायद्याचे ठरले. एक्झिट पोलच्या प्रश्नकर्त्यांनी परिवर्तन हवे का? हे विचारले तेव्हा अनेकांनी हवे असे म्हटले. पण परिवर्तन करताना मत काँग्रेसला देऊ. असे म्हटले नव्हते हे नमूद केले पाहिजे. अशा प्रकारे डोक्याला जास्त त्रास न देता जे एक्झिट पोल दाखवले जातात. त्या एक्झिट पोललाच आता जनतेने एक्झिट दिली आहे, असे वाटते. हा झाला हरियाणाच्या निकालाचा थोडक्यात आढावा, आता आपण जम्मू काश्मीरकडे वळूया. जम्मू काश्मीर हे राज्य नाही. जम्मू काश्मीर हा केंद्रशासित प्रदेश आहे. तिथे निवडून आलेल्या पक्षाला नायब राज्यपालांच्या आदेशाचे पालन करावेच लागते. त्या ठिकाणीही भारतीय जनता पक्षा कडून जम्मूतील मोठ्या विजयानंतर हिंदू मुख्यमंत्री देण्यात येईल असा प्रचार करण्यात आला होता. यासाठी जम्मूच्या जागांमध्ये वाढही करण्यात आली. नायब राज्यपालांना जे पाच आमदार नियुक्त करायचे असतात. त्याचाही फायदा आता भाजपला घेता येणार नाही. कारण नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसने स्पष्ट बहुमत मिळवलेले आहे. पूर्वी राज्यपालांना दोन आमदार नियुक्त करण्यात येत असत. तिकडे काश्मीरात तर भारतीय जनता पक्षाचे 12 वाजले. म्हणजे 50% विजय भाजपचा आणि 50% विजय नॅशनल कॉन्फरन्सचा असे म्हणता येईल. पण त्या 50 टक्के विजयात काँग्रेसचा वाटा 10% आहे. अशा प्रकारे जम्मू-काश्मीरात भाजपचा पराभव झाला असला तरी काँग्रेसचा विजय झाला नाही. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. राहुल गांधीचे मुद्दे आणि ते मारत असलेले गुद्दे, याचा जनतेवर निश्चितच परिणाम होतो. पण पक्षातील सुंदोपसुंदी आणि शिस्तबद्ध कार्यकर्त्यांचा अभाव हे काँग्रेसच्या पराभवाचे खरे कारण आहे. काँग्रेसने सत्तेवर असताना संघटनाकडे फारसे लक्ष दिले नाही. जे काही पूर्वीचे थोडे बहुत संघटन होते. ते गेल्या दहा वर्षाच्या मोदीकाळात फरफटत गेलेले आहे. आता राहुल गांधी यांना पुन्हा काँग्रेसला संजीवनी द्यायची असेल. तर पक्षातील भांडखोरांना आणि मुजोरांना दंडुका दाखवल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. जम्मू-काश्मीरमध्ये सत्ता जरी नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसची असली. तरी खरे राज्य केंद्रीय गृहमंत्री शहाच चालवतील. आता बघायचे आहे की दिल्लीत ज्याप्रमाणे नायब राज्यपाल आणि सत्ताधारी पक्ष भांडतात. तसेच या ठिकाणी होईल की, नायब राज्यपाल यांच्याशी इथले पक्ष जुळवून घेतील. निवडणुकीच्या निकालाने एक गोष्ट मात्र सिद्ध करून टाकली आहे. ती म्हणजे केवळ हवेवर निवडणुका जिंकता येत नाहीत. हवा तर हवीच असते पण त्या हवेला कार्यकर्त्यांची दवा मिळाली नाही. तर कशी फटफजिती होते. हे या निवडणुकीच्या निकालाने सिद्ध करून दाखवले आहे. या विजयानंतर आता भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यात काँग्रेसला खंडखंड करतो आहे की, काँग्रेसला दंड देतो आहे हेच बघावयाचे आहे. महाराष्ट्रातील उद्दंड काँग्रेसचे नेते हरियाणाच्या दंडामुळे काही धडा घेतील की, आम्ही जिंकूच जिंकू अशा हवेतच राहतील, हाच मोठा प्रश्न आहे. कारण दिसते तसे नसते.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# हरियाणात सलग तिसऱ्यांदा भाजपचे सरकार!

■ वृत्तसंस्था, चंदीगड, दि. ८: हरियाणात भाजप तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार आहे. राज्यात असे करणारा हा एकमेव पक्ष असेल. राज्यातील एकूण ९० जागांपैकी पक्षाने ४८ जागा जिंकून बहुमत मिळवले आहे. २ जागांची अधिकृत घोषणा बाकी आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यावेळी ८ जागांची वाढ झाली आहे.



दुसरीकडे, काँग्रेसने ३७ जागांवर विजय मिळवला आहे. त्यांना या निवडणुकीत ६ जागांचाही फायदा झाला आहे. मुख्यमंत्री नायब सैनी लाडवा आणि काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री भूपेंद्र हुड्डा गढी-सांपला मतदारसंघातून विजयी झाले आहेत.

काँग्रेसने हा निकाल धक्कादायक असल्याचे म्हटले आहे. सीएम सैनी म्हणाले की, जनतेने काँग्रेसचा खोटारडेपणा नाकारला आहे. भाजपच्या आघाडीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांना फोन करून विजयाबद्दल अभिनंदन केले. नवीन सरकारचा शपथविधी १२ ऑक्टोबरला होणार असल्याचे समजते. निवडणुकांचे निकाल जाहीर होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी संध्याकाळी ७ वाजता दिल्लीतील भाजप मुख्यालयात पोहोचले.

## जम्मू-काश्मिरात एनसी-काँग्रेसचे सरकार



■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ८: जम्मू-काश्मीरमधून कलम 370 हटवल्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला 49 जागा मिळाल्या. आघाडीत समाविष्ट नॅशनल कॉन्फरन्सला सर्वाधिक 42 जागा, काँग्रेसला 6 आणि माकपला एक जागा मिळाली. सरकार स्थापनेसाठी 46 जागांची गरज आहे.

भाजपने 29 जागा जिंकल्या आहेत. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत पक्षाला 4 जागांचा फायदा झाला आहे. मात्र, जम्मू-काश्मीर भाजपचे अध्यक्ष रविंदर रैना नौशेरा मतदारसंघातून एनसी उमेदवाराकडून सुमारे 8 हजार मतांनी पराभूत झाले. त्यांनी आपला राजीनामा पक्षप्रमुखांकडे पाठवला आहे.

माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांचा पक्ष पीडीपीने 3 जागा जिंकल्या आहेत. गेल्या निवडणुकीत पक्षाला 28 जागा मिळाल्या होत्या. पहिल्यांदाच निवडणूक लढवत असलेल्या मेहबूबा यांची मुलगी इल्तिजा मुफ्ती यांचा श्रीगुफ्वारा बिजबेहारा मतदारसंघातून 9 हजारांहून अधिक मतांनी पराभव झाला.

जम्मू-काश्मीरमध्ये आम आदमी पक्षाने पहिल्यांदाच विजयाची नोंद केली आहे. दोडा मतदारसंघातून मेहराज मलिक यांनी भाजपच्या गजयसिंह राणा यांचा 4500 हून अधिक मतांनी पराभव केला. तर पीपल्स कॉन्फरन्सने एक जागा जिंकली. 7 वर अपक्ष विजयी झाले. संसद हल्ल्यातील आरोपी अफजल गुरूचा भाऊ एजाज गुरूला सोपोरमधून 129 मते मिळाली.

नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला म्हणाले- ओमर अब्दुल्ला हे जम्मू-काश्मीरचे पुढील मुख्यमंत्री असतील. ओमर अब्दुल्ला यांनी दोन जागांवर (बडगाम आणि गंदरबल) निवडणूक लढवली आणि दोन्ही जागांवर पीडीपी उमेदवारांचा पराभव केला.

जम्मू-काश्मीरमध्ये 18 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या कालावधीत 3 टप्प्यांत 63.88 टक्के मतदान झाले. 10 वर्षांपूर्वी 2014 मध्ये झालेल्या निवडणुकीत 65% मतदान झाले होते. यावेळी 1.12% कमी मतदान झाले.

## सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

विधानसभा निवडणुकांचा परिणाम

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ : राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही जिल्ह्यात जाहीर करण्यात आलेल्या सहकार क्षेत्रातील निवडणुकांच्या तारखा आता पुढे ढकलण्यात आल्या आहेत. राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका आता थेट ३१ डिसेंबरच्या नंतर होणार असल्याची माहिती समोर अली आहे.

राज्यात 29 हजार 429 निवडणुका गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित असून त्या सातत्याने पुढे ढकलण्यात येत आहेत. आता तर विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या आहेत त्यामुळे आता देखील या प्रलंबित निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता सहकार क्षेत्राच्या निवडणुकांपूर्वी विधानसभेच्या निवडणुका पार पडणार आहेत.

राज्यातील जवळपास 7,109 सहकारी संस्थांच्या निवडणुकांच्या प्रक्रिया सुरू करण्यात आल्या होत्या. यात दूध संघ, बाजार समिती, जिल्हा बँक व पतसंस्थांच्या निवडणुकांचा समावेश होता. तसेच नोव्हेंबर महिन्यात या निवडणुकांच्या तारखा देखील जाहीर करण्यात आल्या होत्या.

मात्र राज्य सरकारच्या सहकार व पणन विभागाने या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. जून महिन्यात सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया 30 सप्टेंबर पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या होत्या. आता त्या पुन्हा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

## सीएम एकनाथ शिंदेंची प्रकृती बिघडली

मंगळवारचे सर्वच कार्यक्रम रद्द

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ : मुख्यमंत्र्यांचे आजचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची तब्येत बरी नसल्याने मुख्यमंत्र्यांचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहे. सोलापूर दौरा आणि राज्यमंत्री मंडळाची बैठकही रद्द करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

शिंदे आज सोलापूर शहरात वचनपूर्ती सोहळ्यासाठी येणार होते. फ्यांचा सोलापूर दौरा आतापर्यंत पाचव्यांदा रद्द झाला आहे. इतर कार्यक्रमही रद्द करण्यात आले.




# मुख्यमंत्र्यांच्या प्रभावापुढे ठाण्यात भाजपची कोंडी?

**ठाणे, दि. ८ : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागण्यापूर्वी महाराष्ट्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याची आखणी करण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची निर्णायक भूमिका पाहायला मिळत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत मुंबई महानगर प्रदेश हा महायुतीसाठी महत्त्वाचा मानला जात आहे. या प्रदेशाचा मध्यबिंदू असलेल्या ठाण्यात पंतप्रधानांना जाहीर कार्यक्रमासाठी पाचारण करताना मुख्यमंत्र्यांनी या संपूर्ण आयोजनावर स्वत:ची छाप कशी राहील याची पद्धतशीरपणे आखणी केली. भाजपचे ठाणे जिल्ह्यात आठ आमदार आहेत. पंतप्रधानांचे स्वागत आणि प्रत्यक्ष कार्यक्रमात पक्षाचे नेते, पदाधिकाऱ्यांचे 'दर्शन' घडले खरे, मात्र मोदी यांचा जाहीर कार्यक्रम शिंदेसेनेचा जाहीर मेळावा वाटावा अशा पद्धतीची वातावरणनिर्मिती करण्यात मुख्यमंत्र्यांचा पक्ष यशस्वी ठरला. पंतप्रधानांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांचा हा वाढता प्रभाव भाजपच्या गोटात मात्र अस्वस्थतेचे कारण ठरू लागला आहे.

ठाणे जिल्हा हा शिवसेनेसाठी नेहमीच महत्त्वाचा विभाग मानला जातो. पालघर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर या ठाण्यातील विधानसभेच्या जागा कमी झाल्या. या जिल्ह्यात मध्यंतरीच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आणि २०१४ नंतर भाजपचे आव्हान तेव्हाच्या एकसंध शिवसेनेलाही पेलावे लागले. पाच वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप-शिवसेना एकत्र लढले. त्यानंतरही कल्याण ग्रामीण, शहापूर यांसारख्या हक्काच्या जागांवर शिवसेनेला पराभवाचे तोंड पाहावे लागले. दुसरीकडे भाजपने जिल्ह्यात सर्वाधिक आठ जागांवर विजय मिळवला. एकनाथ शिंदे यांना २०१९ मध्ये पक्षाची कामगिरी फारशी रुचली नव्हती. जिल्ह्यात आपला पक्ष पहिल्या क्रमांकावर असला पाहिजे असा शिंदे यांचा त्यावेळीही आग्रह होता. आता तर ते मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे आपल्या जिल्ह्यात पक्षाची कामगिरी उजवी असावी असा त्यांचा प्रयत्न आहे. भाजपपेक्षाही दोन जागा अधिक लढवाव्यात आणि त्या जिंकूनही याव्यात या दृष्टीने त्यांच्या पक्षाची व्यूहरचना सुरू आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या प्रभावाने भाजप अस्वस्थ?**

राज्यात विधानसभा निवडणुकांच्या जागावाटपात भाजप सर्वाधिक जागा लढवेल हे स्पष्टच आहे. ठाणे जिल्ह्यात मात्र हे गणित कसे राहील याविषयी भाजपच्या स्थानिक नेत्यांमध्ये संभ्रम आहे. सद्य:स्थितीत जिल्ह्यात पक्षाचे आठ आमदार आहेत. या आठ जागांवर भाजपचा दावा कायम आहे. कळवा-मुंब्रा, शहापूर, भिवंडी पूर्व या तीन जागांवर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दावा केला आहे. त्यामुळे उरलेल्या सात जागा मुख्यमंत्र्यांच्या पक्षासाठी राहतात. मात्र जागावाटपाच्या गणितात काही जागा अधिकच्या मिळाव्यात असा शिंदे सेनेचा प्रयत्न आहे. कल्याण पूर्व, नवी मुंबईतील बेलापूर या दोन जागांवर शिंदे यांच्या शिवसेनेने दावा सांगितला आहे. कल्याण पूर्वेत भाजपचे विद्यमान आमदार गणपत गायकवाड यांनी शिंदे समर्थकावर केलेल्या गोळीबारामुळे या भागात दोन्ही पक्षांत तीव्र मतभेद आहेत. ही जागा मुख्यमंत्री पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्रतिष्ठेची केली आहे. लोकसभेचा अनुभव लक्षात घेता हातच्या जागा मुख्यमंत्र्यांच्या पक्षाकडे जाऊ नयेत याविषयी भाजप नेते सावध झाले आहेत.

**ठाणे जिल्ह्यात भाजप वाढीला मर्यादा?**

शिवसेना एकसंध असल्यापासून ठाणे जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांमध्ये भाजपचा विस्तार होताना दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही प्रभावी नेते भाजपमध्ये आले. त्यामुळे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही भाजपला जागा मिळाल्या. ठाण्याच्या एका बाजूस असलेल्या नवी मुंबईत गणेश नाईक यांच्या प्रवेशामुळे राज्यातील एक श्रीमंत महापालिका भाजपला मिळाली. एकसंध शिवसेनेच्या तुलनेत हा पक्ष वाढत असला तरी मुख्यमंत्र्यांच्या प्रभावामुळे ताकद असूनही वाढीला मर्यादा आल्या आहेत, अशी चर्चा आता भाजपच्या अंतर्गत गोटात सुरू झाली आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघात विधानसभेच्या चार जागांवर भाजपचे आमदार आहेत. असे असतानाही मुख्यमंत्र्यांच्या आग्रहामुळे हा मतदारसंघ त्यांच्या पक्षाला सोडावा लागला. कल्याण-डोंबिवलीत सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांचा दबदबा डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आक्रमक शैलीमुळे फारसा जाणवत नाही. कल्याण लोकसभा मतदारसंघातही भाजपचे अधिक आमदार आहेत. येथे कमी जागा असूनही मुख्यमंत्र्यांच्या पक्षाचा 'आवाज' अधिक आहे. ठाणे जिल्ह्यात पंतप्रधानांचा कार्यक्रम होत असताना या नियोजनात मुख्यमंत्र्यांचा पक्ष अधिक सक्रिय दिसला. हा प्रभाव भाजपच्या स्थानिक नेत्यांना फारसा रुचत नसल्याचे चित्र आहे.

# मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वीजबिलांच्या पावतीचे वितरण

## मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेअंतर्गत आस्थापित कृषिपंपाचे लोकार्पण

**छत्रपती संभाजीनगर, दि.८ : प्रतिनिधी**



मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वीजबिलांच्या पावतीचे वितरण आणि मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेअंतर्गत आस्थापित कृषिपंपाचे लोकार्पण मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मा.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मा.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे झाले.

पालकमंत्री तथा अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट, खा.भागवत कराड, आ.सतीश चव्हाण, आ.विक्रम काळे, आ.प्रदीप जैस्वाल, आ.रमेश बोरनारे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी ना.एकनाथ शिंदे म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेत राज्य सरकारने शेतकऱ्यांचे कृषी पंपांचे चालू बिल भरण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे. आगामी पाच वर्षे सरकार शेतकऱ्यांचे साडेसात एचपीपर्यंतच्या पंपांचे चालू बिल भरेल असा शासन निर्णय जारी झाला आहे. राज्यातील 44 लाख शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. सरकारने एप्रिल ते जून या कालावधीच्या बिलापोटी 2750 कोटी रुपये महावितरणला अदा केल्यामुळे शेतकऱ्यांना महावितरणकडून पावत्या पाठविण्यात येत आहेत.

या कार्यक्रमात मा.मुख्यमंत्री आणि मा.उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात पावत्या प्रदान करण्यात आल्या. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याच्या या योजनेत राज्य सरकार कृषी पंपांचे चालू बिल भरत आहे. मा.मुख्यमंत्री तसेच मा. उपमुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांच्या वीज बिलापोटी प्रतिकात्मक धनादेश महावितरणला सुपूर्द केला. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी हा धनादेश स्वीकारला. यावेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला उपस्थित होत्या.

ना.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेत राज्यातील शेतकऱ्यांना दहा लाख पंप देण्यात येणार आहेत. केवळ दहा टक्के रक्कम भरून शेतकऱ्यांना सौर ऊर्जा निर्मिती पॅनल्स आणि कृषी पंप मिळणार आहे. अनुसूचित जाती व जमातींच्या शेतकऱ्यांना लाभार्थी हिस्सा केवळ पाच टक्के भरावा लागेल. ऊर्वरित रक्कम केंद्र आणि राज्य सरकारकडून अनुदान म्हणून मिळते. शेतकऱ्यांना स्वतंत्र आणि हक्काचे सिंचनाचे साधन सौर कृषी पंपामुळे मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना 25 वर्षे वीजबिल नाही. पाच वर्षांत पंप बिघडला तर दुरुस्त करून मिळणार आहे. तसेच चोरीस गेला किंवा मोडतोड झाला तर त्याचा विमा सरकारने काढला आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत आजतागायत 2,08,935 सौर पंप मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी 1,67,155 शेतकऱ्यांनी आवश्यक रकमेचा भरणा केला आहे व त्यापैकी 60,000 सौर पंप आस्थापित करण्यात आले आहेत. यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावला असून, सर्वा धिक पंप या जिल्ह्यात आस्थापित करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-2.0 अंतर्गत कालच पंतप्रधानांच्या हस्ते 5 सौर प्रकल्पांचे उद्घाटन झाले. येत्या 18 महिन्यांत शेतकऱ्यांची सर्व वीज सौर ऊर्जेद्वारे पुरवली जाणार आहे. त्यासाठी पहिली कृषा ऊर्जा कंपनी स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

ना.अजित पवार म्हणाले की, राज्य सरकार पुढील 5 वर्षे शेतकऱ्यांचे वीजबिल भरणार आहे. त्यासाठी सरकारने निधी दिला आहे. शेतकऱ्यांना आता शून्य वीजबिले पाठवली जात आहेत.

यावेळी मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अर्जदारांना अर्ज मंजुरीचे व अनुदानाचे एसएमएस पाठविण्यात आले. तसेच मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बटण दाबून आतापर्यंत शेतात बसविलेले 60,000 सौर कृषी पंप रिमोटद्वारे चालू करून योजनेचे लोकार्पण केले.

# अजित पवार शिरूरमधून लढणार ?

**पुणे, दि. ८ : प्रतिनिधी**



बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडणूक न लढविण्याचे संकेत देणारे उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार शिरूर मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची शक्यता आहे. शिरूर मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात असल्याने त्या दृष्टीने अजित पवार यांनी चाचपणी सुरू केली आहे. त्यामुळे या मतदारसंघातील लढत अजित पवार विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार) पक्षाचे विद्यमान आमदार अशोक पवार अशी होण्याची शक्यता आहे.

उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी बारामती विधानसभेची जागा न लढण्याचे संकेत बारामती येथील मेळाव्यात गुरुवारी दिले होते. 'मी उमेदवार देईन, त्यालाच निवडून द्या,' असे सूचक वक्तव्य पवार यांनी केले होते. त्यामुळे बारामतीचा उमेदवार कोण असेल, याचबरोबर अजित पवार कोणत्या मतदारसंघातून निवडणूक लढविणार, याबाबत राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू होती. मात्र, अजित पवार यांनी शिरूर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने चाचपणी सुरू केल्याचे पुढे आले आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या सूत्रांकडूनही त्याला दुजोरा देण्यात आला. कर्जत-जामखेड मतदारसंघातूनही अजित पवार निवडणूक लढवतील, अशी चर्चा सातत्याने होत होती. मात्र, शिरूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याबाबत पवार सकारात्मक असल्याचे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या सूत्रांकडून सांगण्यात आले.

लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना पराभव स्वीकारावा लागला होता. हा पराभव अजित पवार यांच्या जिव्हारी लागला आहे. त्यामुळे दोन महिन्यांपूर्वी, त्यांनी 'बारामतीमधून निवडणूक लढविण्यात आता रस राहिलेला नाही,' असे विधान करतानाच, 'कार्यकर्त्यांची मागणी असेल आणि संसदीय समितीने मान्यता दिली तर, जय पवार यांना बारामतीमधून उमेदवारी दिली जाईल,' असे स्पष्ट केले होते. मात्र, त्यांच्या या विधानानंतर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी, 'बारामती हा अजित पवार यांचा डीएनए आहे. ते बारामतीमधूनच लढतील,' असे स्पष्ट केले होते.

शिरूर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे अशोक पवार विद्यमान आमदार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि आमदार अशोक पवार यांनी शरद पवार यांच्या समवेत राहण्याचा निर्णय घेतला होता. लोकसभा निवडणुकीपूर्वी शिरूरमध्ये झालेल्या मेळाव्यात त्यावरून अजित पवार यांनी विद्यमान खासदार आणि आमदारांना आव्हान दिले होते. 'मंत्रिपद तर लांबच, आमदारच कसे होतो ते मी पाहतोच,' असा इशारा अजित पवार यांनी आमदार अशोक पवार यांना दिला होता. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी शिरूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविल्यास अशोक पवार यांच्यापुढे मोठे आव्हान असणार आहे.

# आंतरशालेय कबड्डी स्पर्धा संपन्न



**तलासरी, दि. ८ : प्रतिनिधी**

ज्ञानमाता सदन सोसायटी तलासरी संचलित ११ प्राथमिक शाळांची आंतरशालेय कबड्डी स्पर्धा निर्मला आदिवासी विद्यामंदिर सावरोली या ठिकाणी संपन्न झाली. सदर सामन्यांच्या उद्घाटन प्रसंगी ज्ञानमाता सदन सोसायटीचे संस्थाचालक फादर निलम लोपीस,शाळासंचालक फादर सॅबी कोरिया गावचे सरपंच शिंगडे, मुख्याध्यापक रमेश नागुडे,मनोज भुरकुड, यशवंत कुऱ्हाडे, दामू वळवी, सुमेध सुतार आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी संस्थाचालक फादर निलम यांनी मुलांना झाडांसारखे मोठे व परोपकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून यशस्वी होण्यासाठी धडपडत राहण्याचा सल्ला दिला. शाळासंचालक फादर सॅबी यांनी हार जीत यापेक्षा जिद्दीने व जोशाने खेळ खेळत राहण्याचा सल्ला दिला. सरपंच नरेश शिंगडे यांनी देखील सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.यावेळी आजी-माजी शिक्षक व खेळाडू, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व ग्रामस्थ प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर स्पर्धेत मुलींचे ११ व मुलांचे ११ याप्रमाणे २२ संघानी भाग घेतला होता. या संपूर्ण स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे- मुले १) प्रथम क्रमांक - ज्ञानमाता आदिवासी विद्यामंदिर तलासरी. २) द्वितीय क्रमांक - निर्मला आदिवासी विद्यामंदिर सावरोली पाटीलपाडा. ३) तृतीय क्रमांक - निर्मला आदिवासी विद्यामंदिर कुर्झे बारगपाडा. ४) चतुर्थ क्रमांक - मुक्तिदाता आदिवासी विद्यामंदिर शिसणे. उत्कृष्ट चढाई - उमंग संदीप शनवार (तलासरी) उत्कृष्ट पकड - अंकुल वनश्या वळवी. (सावरोली) मुली - १) प्रथम क्रमांक - शांतिकुमार आदिवासी विद्यामंदिर वरखंडा. २) द्वितीय क्रमांक - खाजगी शाळा उपलाट पाटीलपाडा ३) तृतीय क्रमांक - ख्रिस्तराय आदिवासी विद्यामंदिर उपलाट धोधडपाडा ४) चतुर्थ क्रमांक - ज्ञानमाता आदिवासी विद्यामंदिर तलासरी . उत्कृष्ट चढाई - निमिता बारक्या रिंजड (वरखंडा) उत्कृष्ट पकड - ख्रीष्टिना जितेश झिरवा (पाटीलपाडा ) सदर स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी नवयुवक मंडळ सावरोली,चित्रा पाटील, सुनील शिंदे यांच्यातर्फे शालेय वस्तूस्वरूपात भेट देण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक मा. सदू कांटेला सर यांच्यातर्फे आकर्षक ट्रॉफीज भेट स्वरूपात देण्यात आल्या.तर मंडप व्यवस्था सुभाष दादोडा यांच्यातर्फे करण्यात आली होती. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर भोईर यांनी तर सामन्यांचे नियोजन व समालोचन डॉ.दत्तात्रय शिंदे व सुभाष वसावला यांनी केले. आभार प्रदर्शन अस्मिता जाधव यांनी पार पाडले.

# उल्हासनगरमध्ये तरुणाचा संशयास्पद मृत्यू

**उल्हासनगर, दि. ८ : प्रतिनिधी**

उल्हासनगर कॅंप ३ येथील कमला अपार्टमेंट मध्ये राहणाऱ्या शाहीर गौतम शहा या तरुणाचा संशयास्पद मृत्यु झाला असुन त्या निषेधार्थ काल पवई चौक येथील बाजार बंद करण्यात आला. मृत्तकाचा भाऊ राहुल शहा याने माझ्या भावाचा घातपात झाल्याचा आरोप केला आहे.तर पोलिस या घटनेचा तपास करत आहेत. उल्हासनगर कॅंप ३ येथील पवई चौक जवळील कमला अपार्टमेंट मध्ये शाहीर शहा हा २२ वर्षीय तरुण आपल्या परिवारासह राहत असुन त्याचा काल रात्री अचानक संशयास्पद मृत्यु झाला . तेव्हा त्याला त्याच्या मित्रानी उपचारा करिता मध्यवर्ती रूग्णालयात नेले , असता डॉक्टरानी त्याला मृत घोषीत केले. दरम्यान शाहीर चा भाऊ राहुल याने आरोप केला आहे , की माझ्या भावाच्या अंगावर कोठे ही जखम नसुन फक्त गळ्याला व्रण दिसत आहेत. तर त्याचा कमर बेल्ट तुटलेल्या अवस्थेत असुन मोबाईल व पाकिट गायब केले आहे. तेव्हा माझ्या भावाचा गळा आवळुन खुन केला असल्याचा आरोप त्याने केला आहे. या बाबत मध्यवर्ती पोलिस तपास करत असुन शाहीर च्या अकस्मात व संशयस्पद मृत्युने पवई परिसरातील नागरिकानी संताप व्यक्त करुन बाजार पेठच बंद केली होती.

# डॉ. साकेत हेमंत पाटील आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित




**पालघर, दि. ८ : प्रतिनिधी**

डॉ. मैथिली शरण सिग्नेचर आंतरराष्ट्रीय पुरस्कार हा वसईतील नामवंत स्त्री-रोगतज्ज्ञ डॉ. साकेत हेमंत पाटील यांना नुकताच प्रदान करण्यात आला. गोवा येथील एका भव्य कार्यक्रमात डॉ. साकेत हेमंत पाटील यांना आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. एखाद्या व्यक्तीचे समाजाप्रती असलेले कार्य जागतिक व्यासपीठावर आणून त्या व्यक्तीचा तसेच त्याच्या कार्याचा सन्मान करणे या उद्देशाने सुवाच आणि साऊथ एशियन फेडरेशन ऑफ ओबीसीटेरिकस आणि गायनॅकोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. या वर्षी डॉ. साकेत हेमंत पाटील यांना त्यांनी केलेल्या तसेच त्यांच्या अगोदरच्या पिढीने केलेल्या ग्रामीण भागातील उल्लेखनीय वैद्यकीय सेवेबद्दल हा सन्मान देऊन गौरवण्यात आले. डॉ. साकेत हेमंत पाटील हे त्यांचे वडील 'कोविडयोद्धा' स्व. डॉ. हेमंत दामोदर पाटील यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांची समाजाभिमुख असलेली स्वप्ने पूर्ण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ डॉ. साकेत पाटील यांनी वसईतील पारनाका येथे नायशा प्रसूतीगृह सुरू केले. डॉ. साकेत हेमंत पाटील हे अत्यंत वाजवी किमतीत गर्भवती स्त्रियांना वैद्यकीय सेवा त्यांच्या प्रसूतीगृहात प्रदान करतात. स्त्रियांच्या इतर आजारांच्या उपचाराबरोबरच तेथे गर्भसंस्कारविषयक माहिती देणे, गर्भाशय आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण करणे या समाजाभिमुख जनजागृतीच्या उद्देशाने दर महिन्याला विनामूल्य शिबिराचे आयोजन केले जाते. या शिबिराचा अनेक महिला फायदा घेत आहेत. डॉ. साकेत पाटील हे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात स्त्री-रोग तज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. सरकारी रुग्णालयात गरोदर स्त्रियांना उत्तमोत्तम आरोग्य सेवा मिळावी यासाठी ते तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देत असतात. ''माझे दिवंगत वडील डॉ. हेमंत दामोदर पाटील यांचे तसेच माझी आई डॉ. शुभांगी पाटील यांचे वैद्यकीय आणि सामाजिक कार्य पुढे नेण्यास हा पुरस्कार मला नेहमीच प्रोत्साहित करेल,'' असा विश्वास डॉ. साकेत पाटील यांनी पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केला.

# नवरात्र उत्सवात स्वप्नपूर्ती गृहसंकुलांमध्ये रक्तदान शिबिर आणि आरोग्य शिबिर संपन्न



**पनवेल, दि. ८ : प्रतिनिधी**

खारघर सेक्टर 36 मधील सिडको ने बांधलेल्या स्वप्नपूर्ती हाऊसिंग सोसायटीमध्ये नवरात्र उत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाचे हे सहावे वर्ष असून यावर्षी त्यांनी सामाजिक उपक्रम राबवत असताना टाटा कॅन्सर हॉस्पिटलच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यामध्ये संकुलातील 78 लोकांनी रक्तदान केले आणि आपली सामाजिक भावना दाखवून दिली. याचवेळी आरोग्य शिबिराचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते यामध्ये रक्तदाब, निरोपती इसी जी, नेत्र तपासणी आदी करण्यात आले होती याचा सुद्धा लाभ स्वप्नपूर्ती संकुलातील नागरिकांनी घेतला.

स्वप्नपूर्ती सांस्कृतिक उत्सव मंडळ हे रजिस्टर मंडळ असून संकुलामध्ये नवरात्र उत्सव साजरा करत असताना दरवर्षी विविध सांस्कृतिक सामाजिक उपक्रम राबवत आहे. या वर्षी सुद्धा त्यांनी लहान मुलांसाठी जादूचे प्रयोग, समस्त नागरिकांसाठी श्री गणेश प्रासादिक भजन मंडळ बोलवली तालुका खालापूर यांचे उत्कृष्ट अशा भजनाचा कार्यक्रम ठेवला होता त्याचा आस्वाद स्वप्नपूर्ती मधील नागरिकांनी घेतला. या सर्व कामासाठी स्वप्नपूर्ती सांस्कृतिक उत्सव मंडळाचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शरद बिबवे. अध्यक्ष सचिन बारवे सचिव संदीप खोचरे, उपाध्यक्ष मनोज मोहोड, खजिनदार नागेश सावंत, यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे कार्यकर्ते विशेष मेहनत घेत आहेत.

# विजेच्या समस्यांनी अंबाडीकर त्रस्त



**वाडा, दि. ८ : प्रतिनिधी**

गेल्या कित्येक महिन्यांपासून अंबाडी परिसरातील नागरिक विजेच्या समस्यांनी त्रस्त झाले असून वीज वितरण कंपनीच्या अंबाडी कार्यालयांमध्ये वारंवार अर्ज विनंती करूनही त्यात सुधारणा होत नसल्याने अखेर या परिसरातील आघाडीच्या कार्यकर्त्यांनी महावितरणच्या वाडा कार्यालयातील उपअभियंता अविनाश कटकवार यांना निवेदन देऊन या समस्या तात्काळ सोडवण्याची मागणी केली.

अंबाडी येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत. या परिसरातील अनेक गावपाड्यांमध्ये जुने सडलेले पोल आहेत. त्यामुळे अपघात होण्याची भीती आहे, ते त्वरित बदलावावेत. या परिसरामध्ये वारंवार विजेचा प्रवाह खंडित होत आहेत. अनेक गावांमध्ये कमी दाबाची वीज आहे. नवीन मीटरसाठी गोरगरीब नागरिकांना वीज वितरणच्या कार्यालयामध्ये हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यासाठी वीज वितरण कंपनीने गावोगावी कॅम्प लावून नागरिकांची होणारी गैरसोय दूर करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे सहसमन्वयक दशरथ पाटील, किशोर पाटील, केशव लाटे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# आम्ही सातारकर विकास प्रतिष्ठानचा 10 ऑक्टोबरला दसरा मेळावा

**मुंबई, दि.८ : प्रतिनिधी**

आम्ही सातारकर विकास प्रतिष्ठानच्या वतीने मुंबई आणि परिसरातील शहरांमधील सातारकरांचा भव्य दसरा मेळावा गुरुवार दिनांक १० ऑक्टोबर २०२४ या दिवशी सायंकाळी पाच वाजता दादर येथील शिवाजी मंदिर सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. यावेळी प्रमुख अतिथी महंत स. भ.मोहनबुवा रामदासी,विजयजी शिर्के , शिर्के ग्रुप,कायदेतज्ज्ञ ॲड.उदयजी वारुंजीकर,हास्यसम्राट भाऊ कदम तसेच अन्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्याचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांना सातारा रत्न आणि सातारा भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहेत. हे पुरस्कार जाहीर झालेले मान्यवर असे राजकीय रत्न – श्रीमंत रामराजे नाईक-निंबाळकर, कला रत्न – राहुल भंडारे, कामगार रत्न – मनोज धुमाळ, क्रीडा रत्न – विनया माने, साहित्य रत्न – अरुण गोडबोले , शैक्षणिक रत्न – अंजली गोडसे, सामाजिक रत्न – विकास धनवडे, उद्योग रत्न – शिवाजीराव माने, पत्रकारिता – निलेश बुधावले, वैद्यकीय रत्न – डॉ. अरुण माने, कायदा रत्न – ॲड.पांडुरंग पोळ, प्रशासकीय रत्न – सोमनाथ घार्गे (भापोसे ), सहकार रत्न – विनायक गाढवे. याशिवाय सातारभूषण पुरस्कार सन्माननीय किरण सोनवणे, संपत शेवाळे, सुरेश गोडसे, प्राची कोल्हटकर-जांभेकर, कु.भार्गव जगताप यांना तसेच वैष्णव चॅरिटेबल व मेडिकल ट्रस्ट, मुंबई यांना प्रदान करण्यात येणार आहेत.

# दुबार आणि बोगस मतदार नोंदणी पंधरा दिवसात रद्द करा

## उच्च न्यायालयाचे पनवेलच्या तहसीलदारांना आदेश

**पनवेल, दि. ८ : प्रतिनिधी**

१८८ पनवेल विधानसभा मतदारसंघातील प्रसिद्ध मतदार यादी मध्ये ८५ हजारांहून अधिक नावे दुबार आणि बोगस असल्याचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी निवडणूक आयोगाच्या लक्षात आणून दिले होते. सदरहू नावे वगळण्याच्या कामात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून असमर्थता व्यक्त होण्याची शक्यता ध्यानात घेऊन माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सन्माननीय उच्च न्यायालयात धाव घेतली होती.दाखल याचिका क्रमांक WPST No.२८०८०/२०२४ बाबत सन्माननीय उच्च न्यायालयाने सोमवार दिनांक ७ ऑक्टोबर रोजी पुढील १५ दिवसांच्या आत दुबार आणि बोगस मतदार नोंदणी रद्द करा असे आदेश पनवेलच्या तहसीलदारांना पारित केले आहेत. यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते बाळाराम पाटील यांनी ही बाब पनवेल तहसील यांच्या निदर्शनास आणून दिली होती, परंतु त्यावेळेस पनवेलच्या तहसीलदाराने याबाबत आपण आज समर्थ असल्याचे सांगितले होते. असे झाल्यानंतर बाळाराम पाटील यांनी प्रथम याबाबत पत्रकार परिषद घेतली आणि जनजागृती केली त्यानंतर त्याने मुंबई उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला याचिका क्रमांक WPST No.२८०८०/२०२४ दाखल केली. यावर आपली प्रतिक्रिया देताना उच्च न्यायालयाने याबाबत आदेश पारित केले. तूर्तास १८८ पनवेल मतदार संघात २५,८५५ मतदारांची दुबार नोंदणी झालेली आहे. १५०- ऐरोली मतदार संघातील १६०९६ नावे,१९०- उरण मतदार संघातील २७,२७५ नावे आणि १५१- बेलापूर मतदार संघातील १५,३९७ नावे पनवेल मतदार संघात अंतर्भूत झालेली आहेत. या व्यतिरिक्त ५८८ नावांचा कन्नड अथवा अन्य दक्षिण भारतीय भाषांच्यात पत्ता नमूद आहे,तसेच संपूर्ण नाव नमूद नाही. या सर्व नावांना मतदार यादीतून वगळण्यात यावे अशी मागणी बाळाराम पाटील यांनी सन्माननीय उच्च न्यायालयाकडे मागणी केली होती.

# भिवंडीतील 'त्या' दहशत माजवणाऱ्या कोयता गँगला अटक

**भिवंडी, दि. ८ : प्रतिनिधी**

भिवंडीतील कामतघर परिसरात कोयता गँगने दहशत माजवल्याची घटना ३० सप्टेंबर रोजी घडली होती.याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात १० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.तर घटनेनंतर कोयता गँग फरार झाली होती.दरम्यान सदर गुन्ह्याची गांभीर्यता लक्षात घेऊन पोलिसांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार कोयता गँगचा शिताफीने शोध घेऊन त्यांना शनिवारी ताब्यात घेऊन अटक केली आहे.अभिषेक संभाजी देशमुख,नरेश गोहील,रोहीत पांडे, तंबडू,सोनू उर्फ जे.डी,पिल्या,सत्या उर्फ डिवाईन,काशिराम उर्फ आकाश, सुमित उर्फ सुम्या,रोहीत उर्फ मॉडेल अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.तर यातील दोन आरोपी अल्पवयीन असल्याने त्यांची जामिनावर सुटका करण्यात आल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले आहे.२९ सप्टेंबर रोजी निलेश भगवान पाटील यांनी त्यांच्या दुकानाजवळ काही तरुण भांडण करत कोयत्याच्या धाकाने दहशत माजवत असल्याने निलेश यांनी सदर भांडण सोडवून सर्वांना त्या ठिकाणाहून जाण्यास सांगितले होते.या गोष्टीचा राग मनात धरून आरोपी कोयता गँगने हातात कोयते घेऊन येत निलेश यांना ३० सप्टेंबर रोजी धमकावून त्यांच्याकडील ८६३० रुपयांची रोख रकमेची बॅग जबरीने हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला होता.तर त्याचा प्रतिकार केल्याने निलेश पाटील यांचा पाठलाग करून आरोपी अभिषेकने निलेश याच्यावर कोयत्याचा वार केला असता नीलेशने वार चुकवून तो मनगटाला मुक्का मार लागून जखमी झाला होता.त्यानंतर निलेशच्या फिर्यादीवरून कोयता गँगवर गुन्हा दाखल करण्यात येवून पोलिस आरोपींचा कसून शोध घेत होते.दरम्यान ५ ऑक्टोबर रोजी कोयता गँगला सर्वांना ताडाळी स्मशान भूमीच्या आतून पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.वरील सर्वांवर शहर पोलीस ठाण्यात टेम्पो चालक नरेश नागो भोईर यांच्या फिर्यादीवरून भान्यासं २०२३ चे कलम ३०८ (३), १८९(२),सहशस्त्र अधिनियम कलम ४, २५ सह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे.पुढील तपास पोउनि कडाळे करीत आहेत.

# बाभुळगावची ग्रामदैवत कमलाजाई भवानीची ख्याती सर्वदूर

■ महासागर प्रतिनिधी,
**बाभुळगाव , दि. ८ :** यवतमाळ जिल्ह्यामध्ये बाभुळगाव तालुक्यातील राणी अमरावती गावाची उपवस्ती असलेल्या कमळजापुर येथील आई भवानी माता ही केवळ गावाचेच नव्हे तर संपूर्ण बाभुळगाव तालुक्याचे ग्रामदैवत म्हणून प्रख्यात आहे. या परिसरातील लोकांची पाहाट ही भवानी मातेच्या दर्शनानेच सुरू होते. पहाटे पासूनच येथे नैसर्गिकरीत्या अविरत सुरू असलेल्या गोमुखी झऱ्याच्या पाण्याखाली अंघोळ करण्याकरिता भक्तांची गर्दी सुरू होते. ते आई भवानीची पूजा अर्चना अटोपेपर्यंत भक्तांची मांदियाळी लागलेली असते.

या मंदिराची अख्यायिका सांगायची तर ई. स. पासूनचा या मंदीराचा पौराणिक इतिहास असून या मंदिराची प्राणप्रतिष्ठा तत्कालीन



कृष्णवर्णीय गवळी समाजातील देवी भक्तांनी केल्याची सांगितले जाते. हे मंदिर पूर्वीचे हेमाडपंथी मंदिर असून तत्कालीन मोठमोठाले दगडी चिरे आजही संस्थानाने राखून ठेवलेले आहेत. या मंदिराचा परिसर अत्यंत विलोभनीय व हिरवळीने परिपूर्ण अश्या नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे. मंदिरा लगत निखळपणे सतत वाहणारी वेरुळा नदी ही उत्तर वहिनी



असल्याने येथे दशक्रियेसाठी सुद्धा भाविक मोठ्या प्रमाणात येत असतात. याच नदीच्या काठी बारमाही अविरत सुरू असलेला गोमुखी झरा हा भाविकांसाठी आकर्षणाचा व कुतूहलाचा विषय आहे. या झऱ्याचे पाणी नेहमीच गोड व अत्यंत शीतल असल्याने प्रत्येक भाविक दैवीप्रसाद स्वरूपात याचा आस्वाद घेतात. या झऱ्याचा उगम भवानी मातेच्या असना खालून झाला असल्याचे बोलले जाते. येथील स्थानिकांना देवी कृपेचे अनेकवेळा प्रत्यय आले आहेत. यामुळेच येथे भाविकांची गर्दी असते. मंदिर संस्थानच्या अनेक सुविधा असतात उपलब्ध या ठिकाणी परिसरातील गरीब वर्गातील लोकांकरिता लग्न, समारंसाठी मोठे सभागृह संस्थानतर्फे स्वेच्छा देणगीवर देवून त्यांना पाणी, भांडे, स्वयंपाक गृह उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे येथे अनेक धार्मिक कार्यप्रसंग सुद्धा नियमित होत असतात. तसेच लहान मुलांना बागडण ाकरिता उद्यान सुद्धा केले आहे. तसेच गजानन महाराजांच्या भक्तांकरिता एक छोटेसे मंदिरही येथे उभारण्यात आले आहे. सदर मंदिरास शासन कडून क दर्जा प्राप्त असून स्थानिक आमदार ाच्या साथीने या ठिकाणचा विकास वेगाने सुरू आहे.

# व्यवहार बंद ठेवून कृउबासने नोंदवला मंत्री सत्तारांचा निषेध

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ८:** राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या राज्य अधिवेशनात केलेल्या गैरवर्तनाच्या निषेधार्थ सोमवारी येथील बाजार समिती दिवसभरासाठी बंद ठेवली होती. त्यामुळे सुमारे ६ कोटी रुपयांची उलाढाल ठप्प झाल्याचे कृउबास प्रशासनाने सांगितले आहे.

राज्यातील सर्व बाजार समित्यांची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे राज्य अधिवेशन पुण्याच्या चिंचवड-निगडी परिसरातील ग. दि. माडगुळकर सभागृहात आयोजित केले होते. या अधिवेशनाला मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री येणार होते. परंतु त्याच दिवशी राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक आयोजित केल्याने सरकारचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पणन मंत्री




अब्दुल सत्तार यांना पाठवण्यात आले. परंतु सत्तार यांनी कार्यक्रमस्थळी पोहोचल्यानंतर क्षणाचीही उसंत न घेता मला मंत्रिमंडळाच्या बैठकीला जायचे आहे, असे सांगत तेथून काढता पाय घेतला. त्यांची ही कृती राज्यातील सर्व बाजार समित्यांच्या पदाधिकारी-संचालकांचा अपमान आहे, असा सूर त्याचवेळी उमटला होता. एवढेच नव्हे तर ज्या मंचावर त्यांनी ही कृती केली, त्याच मंचावरून त्यांच्या निषेधाच्या घोषणाही देण्यात आल्या होत्या. दरम्यान परिषदेची कारवाई संपल्यानंतर त्याच ठिकाणी ८ ऑक्टोबरला बाजार समित्यांचे व्यवहार बंद ठेवून पणन मंत्री सत्तार यांचा निषेध नोंदवण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनानुसारच सोमवारी येथील बाजार समितीचे व्यवहार बंद ठेवले. सध्या बाजार समितीत सोयाबीन, तूर, हरभरा आदी धान्यपिके विक्रीस येत आहेत. एकूण व्यवहाराच्या अंदाजानुसार या काळात दररोज सुमारे ६ कोटी रुपयांची उलाढाल होते.

त्यामुळे सोमवारी दिवसभरात तेवढ्या रकमेचे व्यवहार ठप्प पडले, असे समितीचे सचिव दीपक विजयकर यांनी सांगितले. बंदबाबत सूचना दिली होती आजच्या बंदची आगाऊ सूचना दिली होती. ८ तारखेला बाजार समितीचे व्यवहार बंद ठेवले जातील, अशी नोटीस यापूर्वीच जारी करण्यात आली होती. त्यामुळे शेतकऱ्यांची कोणतीही गैरसोय झाली नाही. मुळात ही गैरसोय टाळण्यासाठीच बाजार समिती प्रशासनाने सभापती हरीश मोरे व संचालक मंडळाच्या वतीने आगाऊ सूचना दिली होती, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे सायकल कंत्राट वादाच्या भोवऱ्यात

■ महासागर प्रतिनिधी,
**चांदूरबाजार, दि. ८:** अमरावती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत देण्यात आलेला सायकलींचा कंत्राट वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. हा कंत्राट अपात्र कंत्राटदाराला दिला गेला, असा शहजाद खान या निविदाधारकाचा आरोप आहे. विशेष म्हणजे ही बाब वेळेच्या आत लक्षात आणून दिल्यानंतरही यंत्रणेने त्यात बदल केला नाही. त्यामुळे सदर निविदाधारकाने जिल्हा परिषदेच्या सीईओंपासून ते विभागीय आयुक्त, मुख्यमंत्र्यांपर्यंत तक्रार नोंदवली आहे. सोमवार, ७ ऑक्टोबरला या संदर्भात पुन्हा विभागीय आयुक्तांना स्मरणपत्र देण्यात आले.

राज्याच्या ग्रामविकास आणि पंचायत राज विभागाच्या वतीने कमकुवत घटकांतील विद्यार्थ्यांना सायकली पुरवल्या जातात. ही योजना जि. प.च्या शिक्षण विभागामार्फत चालवली जाते. त्यासाठी एक कोटी रुपयांच्या १८०० सायकली पुरवण्याबाबत जि. प. प्रशासनाने शासनाने निश्चित केलेल्या गव्हर्नमेंट-ई-मार्केटिंग

तक्रारीच्या अनुषंगाने मला सीईओंनी कळवले होते. त्यानुसार माझ्या विभागाने संबंधित व्यक्तीला कळवले आहे. पत्राची नक्की तारीख सांगू शकत नाही, पण आम्ही त्यांना कळवले आहे. -प्रिया देशमुख, शिक्षणाधिकारी, जि.प. अमरावती.

(जीईएम) या पोर्टलवर निविदा जारीकेली होती. पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याचे दाखवून ती तीनदा प्रकाशित करण्यात आली. त्यामुळे त्यात संबंधित अधिकारी यांची भूमिका संशयास्पद असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. आपल्या जवळच्या ठेकेदारांना निविदा देण्याच्या मानस ठेवून तसे केले, असे त्यांचे निरीक्षण आहे.

या संदर्भात शहजाद खान यांनी १३ सप्टेंबरलाच पहिली तक्रार नोंदवली होती. त्यानंतर जिल्हा परिषद मुख्याधिकारी यांच्याकडेही तक्रार दाखल केली. दहा दिवसांनी पुन्हा संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी नोंदवल्या, असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. परंतु काहीही हालचाल न झाल्यामुळे सोमवारी पुन्हा विभागीय आयुक्तांकडे स्मरणपत्र देण्यात आले. दरम्यान सीईओ संजीता महापात्र यांनी सदर तक्रार प्राप्त होताच ती शिक्षण विभागाने त्यांना कळवले शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठवून त्याबाबत योग्य ती माहिती तक्रारदाराला पाठवण्याची सूचना केली होती, असे त्यांच्यातर्फे सांगण्यात आले.

काय आहे प्रकरण? निविदा क्रमांक जीइएम/२०२४/बी/५२००८४ यामध्ये न्यू शर्मा ब्रदर्स यांना एलवन (सर्वात कमी किमतीची निविदा) दर्शवून कार्यारंभ आदेश देण्यात आला. तत्पूर्वी निविदा क्रमांक जीइएम/२०२४/बी/५१५२६८ यामध्ये न्यू शर्मा ब्रदर्स यांना अपात्र ठरवले होते. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी शासकीय नियमांना डावलून हेतुपुरस्सर न्यू शर्मा ब्रदर्स यांनाच काम कसे देता येईल, अशी कृती केली. त्यामुळे या प्रकरणाची नि:पक्ष चौकशी करून कारवाईची मागणी करण्यात आली. मला अद्याप काहीही कळवले नाही मी केलेल्या तक्रारीसंदर्भात अद्याप मला कुठलेही पत्र किंवा माहिती मिळाली नाही. त्यामुळे या प्रकरणी अधिकारी हेच अधिक जबाबदार असल्याचे दिसत आहे. त्यामुळे या प्रकरणाची नि:पक्ष चौकशी करून मला न्याय द्यावा. - शहजाद खान, तक्रारदार, अमरावती.

# बुलढाण्यात यश मिळविण्यासाठी ठाकरे गट सक्रिय

■ महासागर प्रतिनिधी,
**बुलढाणा, दि. ८ :** लोकसभा निवडणुकीत अनुकूल वातावरण असतानाही झालेला पराभव शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. पक्षाचे जिल्ह्यातील अस्तित्व धोक्यात आले असल्याने विधानसभा निवडणुकीसाठी ठाकरे यांनी पुन्हा बुलढाणा जिल्ह्यावर लक्ष केंद्रित केले आहे. सोमवारी त्यांनी मुंबईत घेतलेली बैठक नवीन धोरणाचाच भाग मानली जात आहे.

मातोश्रीमध्ये पार पडलेल्या बैठकीला बुलढाणा जिल्ह्याचे संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, सहसंपर्क प्रमुख छगन मेहेत्रे, राजू मुळे, तालुका प्रमुख लखन गाडेकर, मेहकर मतदारसंघातील इच्छुक सिद्धार्थ खरात, जिल्हा संघटक गोपाल बच्छिरे उपस्थित होते.

काँग्रेसने दावा केलेल्या बुलढाणा मतदारसंघावर जास्त चर्चा झाल्याचे पक्षसूत्रांनी सांगितले. जिल्हाप्रमुख बुधवत हेच बुलढाणा विधानसभा मतदारसंघातून लढण्यास इच्छुक आहेत.

या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड करीत आहेत. यामुळे बुलढाण्यावर तपशीलवार चर्चा झाली. एवढेच नाही, तर ठाकरे यांनी बुधवत यांच्या समवेत स्वतंत्र चर्चा केल्याचेही सांगितले जात आहे.

लोकसभा निवडणुकीतील कटू अनुभव लक्षात घेता ठाकरे दक्षता आणि सर्वंकष विचार करून उमेदवार निवडणार, अशी चिन्हे आहेत.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **ABDUL KADIR.** NOW MY NEW NAME IS **ABDULKADER ABDULLAH LAPAT.**
**ADD :** 353 F NO 406 BURHANI MANZIL DHIMARPURA ITWARI NAGPUR: 440002 (MS)

MY OLD NAME WAS **UMMEHANI ABDUL KADIR.** NOW MY NEW NAME IS **UMMEHANI ABDULKADER LAPAT.**
**ADD :** 353 F NO 406 BURHANI MANZIL DHIMARPURA ITWARI NAGPUR: 440002 (MS)

MY SON OLD NAME WAS **MOHAMMED SAJID NURANI.** NOW HIS NEW NAME IS **MOHD SAJID MOHD AMIN NURANI.**
**ADD:** KALMNA NAGPUR 440026.

MY OLD NAME WAS **MOHAMMED SHABBIR AKHAI.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ALI AKHAI VIRANI.**
**ADD :** P. NO. 67, NAMDEO NAGAR NAGPUR

MY OLD NAME WAS **HUZEFA HUSAIN.** NOW MY NEW NAME IS **HUZEFA ARVIWALA.**
**ADD :** HOUSE NO.101 NAJMI MANZIL GANJAKHET CHOWK NAGPUR



**-: इश्तेहार :-**

**न्यायालय तहसीलदार पांढुर्णा, जिला- पांदुर्णा (म.प्र)**
रा.प्र.क्र. /अ-६/२०२४-२५
मौजा-पांदुर्णा प.ह.नं. ५१

एतद द्वारा सर्वसाधारण को सूचित किया जाता है कि, इस न्यायालय के रा.प्र.क्र. /अ-६/२०२४-२५ मे पक्षकार गीताबाई पति गुलाबराव विरूद्ध सुधाताई विधवा भालचंद खोडे निवासी खारीवार्ड पांढुर्णा तहसील पांढुर्णा जिला पांढुर्णा द्वारा मोजा पांढुर्णा पहन ५१ रा.नि.म. पांढुरना स्थित भूमि ख.क्र. १२७१/६ रकबा ०.१८६ हे. भूमि सुधाताई विधवा भालचंद्र के नाम दर्ज है. आवेदित ख.क्र. १२७१/६ कुल रकबा ०.१८६ मे से रकबा ०.००२ हे. भूमि रजि. विक्रय पत्र कमांक १३५ दिनांक १२.०१.२००५ को कय किये जाने से नामातरण हेतु आवेदन पत्र प्रस्तुत किया गया है.

अतः वादोक्त भूमि मौजा सावरगॉव प.ह.नं. ५१ रा.नि.म. पांढुरना स्थित भूमि ख.क्र. १२७१/६ कुल रकबा ०.१८६ मे से रकबा ०.००२ हे. भूमि के नामान्तरण की कार्यवाही न्यायालय मे प्रचलित है. विक्रेता भालचंद्र पिता बलीरामजी खोडे एवं उनके विधिक वारसान यदि कोई हो अथवा किसी भी हितवद्ध पक्षकारों को कोई आपत्ति हो तो दिनांक २२.१०.२०२४ के पूर्व अपनी आपत्ति स्वयं अथवा अभिभाषक के माध्यम से न्यायालय मे प्रस्तुत कर सकता है. नियत दिनांक के बाद प्राप्त होने वाली किसी भी आपत्ति को मान्य नही किया जावेगा.

जारी दिनांक :-३०/०९/२०२४
नियत दिनांक :-२२/१०/२०२४
तहसीलदार
जिला-पांढुर्णा


# दर्यापुरात शिवसेना शिंदे गटाचा महामेळावा

## कोविड काळातील आरोग्य निधीत भ्रष्टाचार-

■ महासागर प्रतिनिधी,
**दर्यापूर , दि. ८ :** अमरावती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या कार्यकाळात आरोग्यावर तब्बल ३५० कोटी रुपये खर्च करून जनतेला आरोग्य विषयक जगण्याचे बळ दिले. मात्र, या अगोदर कोविड काळात तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी केवळ अडीच कोटी रुपये खर्च करून जनतेला वाऱ्यावर सोडले होते, असे विधान करत खा. श्रीकांत शिंदे यांनी सोमवारी दर्यापुरातील माहेश्वरी भवन येथे शिवसेना शिंदे गटाच्या जनसंवाद महामेळाव्यात उद्धव ठाकरेंवर अप्रत्यक्षपणे टीका केली.

या महामेळाव्या प्रसंगी राज्य सचिव माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ, माजी खासदार संजय निरुपम, भाऊसाहेब चौधरी, जिल्हा संपर्क प्रमुख गजानन वाकोडे, रवींद्र गणोरकर, जिल्हा प्रमुख गोपाल पाटील अरबट, संतोष



ब्रंदे, राजेंद्र गायगोले, महेंद्र भांडे, नंदू जांभूळकर, मुन्ना ईसोकार आदी पदाधिकारी उपस्थित होते. या मेळाव्याला दर्यापूर-अंजनगाव मतदार संघामधील महिलांची संख्या लक्षणीय होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला खा. श्रीकांत शिंदे यांची शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांद्वारे शहरातून बाइक रॅली काढून डीजेच्या निनादात सभास्थळी आणले. प्रास्ताविक कॅप्टन अभिजीत अडसूळ यांनी केले. सूत्रसंचालन वृंदा मुक्तेवार यांनी केले, तर आभार मनोज गव्हाणे यांनी मानले. जनसंवाद मेळाव्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची जमलेली गर्दी.

# महिला सशक्तीकरण कार्यक्रम संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
**नागपूर, दि. ८ :** सृजन लोकविकास संस्था, मागासवर्गीय बहुउदेशीय संस्था आणि तांदळे गुरुजी रिसोर्स एंड डेवलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक ०४.१०.२०२४// रोजी वैशाली नगर येथे महिला सशक्तीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमास महाराष्ट्राचे पूर्व मंत्री तथा आमदार डॉ. नितीन राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत, डिस्ट्रिक्ट बार असोसिएशन च्या उपाध्यक्ष अधिवक्ता उषा गुजर, उत्तर नागपूरचे प्रभारी बंदुपंतजी टेंभूर्ने व ब्लॉक १४चे अध्यक्ष दीपक खोब्रागडे, यांनी मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाला प्रदीप मून (चीफ विजिलंस ऑफिसर, लेबर एंड सोशल जस्टिस सेंट्रल बोर्ड फॉर वर्कर्स एजुकेशन) हे मुख्य मार्गदर्शक म्हणून लाभले होते. कार्यक्रमाचा महिलांनी लाभ घेतला. डॉ शालिनी हेडाऊ यांनी कार्यक्रमाचे संचालन केले व आभार प्रदर्शन जितेंद्र वेळेकर यांनी केले.


**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-tender Notice**

Super scribed percentage rate e-tenders are invited from established, reputed, experienced contractors and who are registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for the works of **1) Various civil maintenance works to the existing control room and DC office at 33 kv S/stn Mowad , tq. Narkhed, dist. Nagpur amounting Rs. 6.79 Lakhs 2) Providing metal spreading in switchyard of 33 Kv S/stn Pachkhedi under O&M division Umred, Tq. Kuhi, Dist. Nagpur amounting Rs. 6.00 Lakhs 3) Providing metal spreading in switchyard of 33 Kv S/stn Lohari Sawanga under O&M division Katol, Tq. Katol, Dist. Nagpur amounting Rs. 4.59 Lakhs 4) Various civil maintenance works to the existing control room and DC office at 33 kv S/stn Mohpa(Umred), tq. Umred, dist. Nagpur amounting Rs. 7.88 Lakhs 5) Maintenance of switchyard and other allied works in Vidyut Bhavan Katol Road, Nagpur amounting Rs. 1.68 Lakhs 6) Various civil maintenance work such as Main Gate, Barbed wire fencing, approach repair & other miscellaneous civil work at 33 KV Sub Station, Sahur, Tq. Ashti, Dist. Wardha amounting Rs. 6.53 Lakhs 7) Repairing of collapsed UCR wall, chainlink fencing, providing new main gate & switchyard gate & allied civil maintenance work at 33 KV Kannamwargram Sub-station, Tq. Karanja, Dist. Wardha amounting Rs. 8.30 Lakhs 8) Repair and maintenance of EE cabin toilet and general toilet blocks at O&M Division and Sub-Division office Hinganghat, Tah. Hinganghat, Dist. Wardha amounting Rs. 7.67 Lakhs 9) Various civil maintenance work & metal spreading work at 33 KV Mayo S/Stn, Nagpur amounting Rs. 3.55 Lakhs 10) Renovation and maintenance of 33/11 KV Tarodi S/stn Tq. Kamptee Dist. Nagpur amounting to Rs. 7.97 Lakhs vide e-tender specification No. EEC/NGP/e-T-31/2024-25 to EEC/NGP/e-T-40/2024-25 respectively.** The tender with all details will be available on MSEDCL's website **www.mahadiscom.in** from date - **09.10.2024 to 15.10.2024 and submission on 16.10.2024 upto 13.00 Hrs. Corrigendum if any will not be published, the bidders have to check it on website itself.**

**PRO No. 118 /NZ**
**Dt. 08.10.2024**
**Executive Engineer (C)**
**CCCM Division, Nagpur**



**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Tender Notice**

Commissioner NMC invites Offline Tenders for the following works. These tenders can be submitted by the Registered Contractors of NMC. The Terms and Conditions of tenders are available in the Tender Form. The sale and purchase of Tender Form can be done at E.E. (DPDC) Office, 5th Floor, B-Wing NMC, Nagpur.

| Tender No. | Name of the work | BOQ Cost (Rs.) | EMD Rs. |
|---|---|---|---|
| 1 | Providing & Fixing C.C. I-Block Nr. H/o. Balpande Behind Medical At Wanjari Nagar In Prabhag No 17. | 824811 | 8300 |
| 2 | Providing & Fixing C.C. I-Block In Front Of Gangotri Apartment In Prabhag No 17. | 824624 | 8300 |
| 3 | Providing & Fixing C.C. I-Block From H/o. Daf To H/o. Kulkarni In Prabhag No 17. | 824854 | 8300 |
| 4 | Providing & Fixing C.C. I-Block Nr. H/o. Rajankar At Adhyapak Nagar In Prabhag No 34. | 824790 | 8300 |
| 5 | Providing & Fixing C.C. I-Block From H/o. Baseshwar To Narendra Kirana In Prabhag No 17. | 824560 | 8300 |
| 6 | Construction of Pathway At Wanjari Nagar Ground In Pr.No 17. | 826065 | 8300 |
| 7 | Providing & Fixing C.C. I-Block In Triangular Garden At Mahalaxmi Nagar In Prabhag No 29. | 824467 | 8300 |
| 8 | Providing and laying Underground Storm Drain Line at Shree Mahalaxmi Nagar in Pra. No. 29. | 825244 | 8300 |
| 9 | Providing & Fixing Interlocking Blocks at Shree Mahalaxmi Nagar in Prabhag No. 29. | 829437 | 8300 |
| 10 | Construction Of Various Civil at Shivaji Park, Rambhau Malghi Nagar in Prabhag No. 29. | 832304 | 8400 |
| 11 | Providing and laying Underground Storm Drain Line at Mahatma Gandhi Nagar 2 in Pra. No. 29. | 823052 | 8300 |
| 12 | Construction of Shade and Otta at Triangular Garden, Mahalaxmi Nagar in Pr. No. 29. | 832316 | 8300 |
| 13 | Providing and laying Underground Storm Drain Line at Dhangavli Nagar in Prabhag No. 29. | 823075 | 8300 |
| 14 | Construction Of Shed & Providing and Laying I-Block at Hanuman Mandir, Sunmarg Nagar in Pr. No. 29. | 832291 | 8400 |
| 15 | Construction of Cement Concrete Road at New Mahalgi Nagar in Prabhag No. 29. | 818912 | 8200 |
| 16 | Providing & Fixing C.C. I-Block From H/o. Patil To H/o. Randive At Mahalaxmi Nagar In Prabhag No 29. | 824975 | 8300 |
| 17 | Providing & Fixing C.C. I-Block In Front Of Hudkeshwar Ground In Prabhag No 29. | 824695 | 8300 |
| 18 | Construction of Cement Concrete Road At Bante Layout In Pr. No. 29. | 824056 | 8300 |
| 19 | Construction Of Pathway At Prerana Nagar In Prabhag No 29. | 825663 | 8300 |
| 20 | Providing & Fixing C.C. I-Block In Front Of Bhagyashri Nagar Ground In Prabhag No 29. | 824975 | 8300 |
| 21 | Providing & Laying U/G Storm Drain At Mahatma Gandhi Nagar In Prabhag No 29. | 828011 | 8300 |
| 22 | Construction of Various Civil Works at Bajrang Nagar Samaj Bhavan in Prabhag No 32 | 838554 | 8400 |
| 23 | Providing and Laying Storm Water Drain Line at Jambudip Nagar Lane near Sawata School in Prabhag No 32 | 834009 | 8400 |
| 24 | Providing & Fixing C.C. I-Block At Triangular Garden Premises At Bidipeth New Subhedar, Dwarka Nagar In Prabhag No 30. | 824973 | 8300 |
| 25 | Providing & Fixing C.C. I-Block From H/o. Burile To H/o. Dumbare At New Bidipeth In Prabhag No 30. | 825021 | 8300 |
| 26 | Construction of Cement Concrete Road From H/o. Kubade To H/o. Sapate At New Bidipeth In Prabhag No. 30. | 824286 | 8300 |
| 27 | Construction of Cement Concrete Road From H/o. Itankar To H/o. Thakre At New Bidipeth In Prabhag No. 30. | 824424 | 8300 |
| 28 | Providing & Fixing C.C. I-Block From H/o. Madavi To H/o. Wankhede At New Bidipeth In Prabhag No 30. | 824945 | 8300 |
| 29 | Providing & Fixing C.C. I-Block In Triangular Garden At New Bidipeth In Prabhag No 30. | 824483 | 8300 |
| 30 | Construction Of Shed and I Block at Dhangavli Nagar & Gajanan Nagar in Pr. No. 29. | 832316 | 8400 |
| 31 | Construction of Remaining Samaj Bhawan at Chandan Nagar in Prabhag No. 31 | 708689 | 7200 |
| 32 | Construction of Toilet at Chandan Nagar in Prabhag No. 31. | 754683 | 7600 |
| 33 | Providing and Laying Sewer Line at Gajanan Nagar in Pr. No 34 | 834236 | 8400 |
| 34 | Construction of C.C. Pavement Road back side of Sakkardara Fire Station in Prabhag No 30 | 831571 | 8400 |
| 35 | Providing and Fixing I-block at Sonzari Nagar in Prabhag No 30 | 830747 | 8400 |
| 36 | Providing & Fixing C.C. I-Block In Front Of Samaj Bhavan At Reshimbagh In Prabhag No 31. | 823365 | 8300 |
| 37 | Construction of Walking Track at Reshimbag Garden in Pr. No 31 | 821832 | 8300 |
| 38 | Providing & Fixing C.C. I-Block Below Green Gym At Sudampuri In Prabhag No 29 | 825411 | 8300 |
| 39 | Providing and laying Kota stone flooring & other Civil Works at Reshimbag Samaj Bhavan in Prabhag No 31 | 837625 | 8400 |
| 40 | Construction of Samaj Bhavan at Pavansut Nagar in Pr.No-28. | 830216 | 8400 |
| 41 | Construction of Samaj Bhavan at Vaibhav Nagar in Pr.No-28. | 830943 | 8400 |
| 42 | Providing and Laying 600 mm dia RCC Storm Water Drain Line at Ladikar Layout near H/o Shirpurkar in Prabhag No 32 | 835784 | 8400 |
| 43 | Providing and Laying 900 mm dia RCC Storm Water Drain Line at Ladikar Layout in Pra. No. 32 | 835749 | 8400 |
| 44 | Construction of CC Pavement road at Chandramani Nagar Lane No 08 in Prabhag No 17 | 835361 | 8400 |

**Note : (1)** Cost of Blank Tender form each Rs. 590/- **(2)** Tender sale & submission start date : 08/10/2024. **(3)** Tender submission and date/sales end date 15/10/2024 up to 5.00 pm. **(4)** Date of opening of Tender (if possible) 16/10/2024 up to 5.00 pm. **(5)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in tender document.

**Advt No : 629/PR, Dt : 08/10/2024** **Executive Engineer (DPDC), N.M.C., Nagpur**

# भाजप प्रादेशिक पक्षांना संपवतो का?



हरियाणा व जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीत स्थानिक प्रादेशिक पक्षांची जबरदस्त पिछेहाट झाली आहे. जम्मू काश्मीरमध्ये भाजपसोबत घरोबा करून नंतर काडीमोड घेणाऱ्या पीडीपीची पिछेहाट झाली. तर हरियाणात जेजेपीपीचा पुरता धुव्वा उडाला आहे. याऊलट या दोन्ही राज्यांत भाजपची दमदार कामगिरी झाली आहे. या निकालामुळे भाजप आपल्या मित्रपक्षांना संपवतो का? हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चिला जात आहे.

जम्मू काश्मीर व हरियाणा विधानसभा निवडणुकीचा निकाल आज घोषित होत आहे. त्यात जम्मू काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वातील नॅशनल कॉन्फरंसने आघाडी घेतली आहे. या ठिकाणी भाजप 29 जागांवर आघाडीवर आहे. तर हरियाणात भाजपला आपली सत्ता राखण्यात यश येईल असा अंदाज आहे. या ठिकाणी भाजप सद्यस्थितीत 48 जागांवर आघाडीवर आहे. या दोन्ही राज्यात भाजपने कधिकाळी आघाडी केलेल्या मित्रपक्षांची पिछेहाट झाली आहे.

भाजपने जम्मू काश्मीरमध्ये पीडीपीच्या मदतीने सत्ता स्थापन केली होती. पण त्यानंतर त्यांनी पीडीपीचा हात सोडला होता. दुसरीकडे, हरियाणात त्यांनी जेजेपीला सोबत घेतले होते. पण विधानसभा निवडणुकीत या दोन्ही पक्षांची पिछेहाट झाली आहे. त्यामुळे भाजप प्रादेशिक पक्षांसोबत युती करून त्यांना संपवत असल्याची चर्चा पुन्हा एकदा राजकीय पटलावर रंगली आहे.

**शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेसची वाढली चिंता**

जम्मू काश्मीर व हरियाणातील विधानसभा निवडणुकीच्या निकालामुळे महाराष्ट्रातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेना व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसची चिंता वाढली आहे. भाजपवर आतापर्यंत अनेकदा आपल्या मित्रपक्षांना संपवण्याचा आरोप झाला.

भाजप स्थानिक प्रादेशिक पक्षांसोबत युती करतो. त्यानंतर त्यांच्या मदतीने हळूहळू आपली पाळेमुळे रोवतो. अखेर आपल्याच मित्रपक्षांना कमकुवत करून सत्ता काबीज करतो, असा आरोप केला जातो. यासाठी शिवसेना व शिरोमणी अकाली दलाचे उदाहरण दिले जाते. त्यात आता पीडीपी व जेजेपी या २ पक्षांची भर पडली आहे.

पीडीपीच्या अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती व जेजेपीचे दुष्यंत चौटाला यांनी भाजपसोबत जाऊन अनुक्रमे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्रीपद भूषवले. महाराष्ट्रातही एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी भाजपच्या मदतीने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्रीपद मिळवले. त्यामुळे मुफ्ती व चौटाला यांची घसरगुंडी पाहून या दोघांच्याही पोटात गोळा उठला आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे २०१९ च्या हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपने ४० जागा जिंकल्या होत्या. दिल्ली लगतच्या या छोट्याशा राज्यात ४६ हा बहुमताचा जादुई आकडा आहे. त्यामुळे त्यावेळी दुष्यंत चौटाला यांच्या जेजेपीचा भाव वधारला होता.

पहिल्यांदाच विधानसभा लढवणाऱ्या जेजेपीचे त्यावेळी तब्बल १० उमेदवार विजयी झाले होते. त्यानंतर चौटाला यांनी भाजपसोबत सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला. ते नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले. पण लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांची युती तुटली.

भाजपसोबतची युती तुटल्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत जेजेपीचा पार धुव्वा उडाला आहे. आज जारी होणाऱ्या निवडणूक निकालात स्वबळावर निवडणूक लढणाऱ्या जेजेपीला अद्याप एकाही जागेवर आघाडी मिळाली नाही. त्यामुळे त्यांना भाजपसोबतची राजकीय मैत्री भोवल्याची चर्चा रंगली आहे.

हरियाणात बिगर जाट समाज हा भाजपचा पाठीराखा असल्याचे मानले जाते. याऊलट जेजेपीचे राजकारण याच जाट मतांवर अवलंबून आहे. पण शेतकरी आंदोलनावेळी जेजेपीने शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही. त्यामुळे त्यांना त्याचा फटका बसल्याचे मानले जात आहे.

**३ फॅक्टरनी भाजपाला तारले**

हरियाणामध्ये मोठा उलटफेर दिसून आला. एक्झिट पोलचे आकडे चुकले आहेत. सलग १० वर्ष सत्तेत असल्यामुळे भाजपा विरोधात सत्ता विरोधी लाट होती. मात्र, असं असूनही निकाल भाजपाच्या बाजून येत असल्याच दिसते. हे कशामुळे होते? भाजपाच कोणतं नरेटिव चाललं? एक्झिट पोल्स कसे चुकले?

भाजपाने निवडणुकीत सर्वाधिक उचलला कुमारी शैलजाचा मुद्दा. कुमारी शैलजा यांना इच्छा असूनही विधानसभेच तिकीट मिळालं नाही. त्यांच्या जवळच्या माणसांना कमी तिकीटं मिळाली. त्यातून भाजपाने काँग्रेस दलित नेत्यांचा आदर करत नाही असा संदेश देण्याचा प्रयत्न केला.

स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इशाऱ्यांमध्ये या मुद्यावरुन वार केला. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने संविधान बदलणार असं नरेटिव सेट केलेलं. भाजपाने शैलजाच्या निमित्ताने काऊंटर नेरटिव सेट केलं. भाजपाने तिसऱ्यांदा हरियाणात सरकार स्थापन केलं, तर ते दलितांना आपल्याकडे आणण्यात यशस्वी ठरले असं म्हणता येईल.

**खर्ची-पर्ची मुद्याला यश**

भाजपाने नोकरीत खर्ची आणि पर्चीचा कथित ट्रेंड बंद करण्याचा मुद्दा उचलला. भाजपाने खर्ची-पर्ची मुद्यावरुन भुपेंद्र हुड्डा यांना घेरलं. हुड्डा यांच्या १० वर्षांच्या कार्यकाळात खर्ची म्हणजे पैसे देऊन आणि पर्ची म्हणजे शिफारशीच्या आधारावर नोकऱ्या दिल्याचा मुद्दा लावून धरला. भाजपाचा दावा होता की, त्यांच्या 10 वर्षांच्या शासन काळात नोकऱ्या पैसे न घेता आणि कुठल्याही वर्गासोबत भेदभाव न करता दिल्या. जनतेमध्ये या नरेटिवची चर्चा झाली.

**मुख्यमंत्री बदलाची चाल यशस्वी**

मनोहरलाल खट्टर जवळपास १० वर्ष हरियाणाचे मुख्यमंत्री होते. पंजाबी चेहरा म्हणून त्यांना प्रमोट करण्यात आलं. जाट विरुद्ध नॉन जाट या नरेटिवद्वारे त्यांना खुर्चीवर कायम ठेवण्यात आलं. मात्र, निवडणुकीच्या काही महिने आधी हटवण्यात आलं.

त्यांच्याजाही ओबीसी चेहरा नायब सिंह सैनी यांना मुख्यमंत्रीपदी बसवलं. ही चाल सुद्धा जाट विरुद्ध नॉन जाट अशीच होती. ओबीसी प्राथमिकता असल्याचा संदेश दिला. निकाल भाजपाच्या बाजूने लागल्यास विधानसभेच्या या निवडणुकीत त्यांच्या अशा काही चाली यशस्वी ठरल्या, असे म्हणता येईल.

●●●●●●●●●

# भावना पोहचविण्याचे साधन 'टपाल'

९ ऑक्टोबर हा पहिला जागतिक पोस्ट दिवस १९६९ मध्ये टोकियो, जपान येथे यूनिवर्सल पोस्टल यूनियन काँग्रेसमध्ये घोषित करण्यात आला. भारतीय शिष्टमंडळाचे सदस्य श्री आनंदमोहन नरुला यांनी हा प्रस्ताव सादर केला होता. तेव्हापासून टपाल सेवांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी जागतिक पोस्ट दिवस साजरा केला जातो.

इंडिया पोस्ट या ब्रँड नावाखाली व्यवहार करणारे टपाल विभाग ही भारतातली सरकारद्वारे संचालित अशी टपाल प्रणाली आहे, जी दळणवळण मंत्रालयाची एक उपकंपनी आहे. १ ऑक्टोबर १८५४ रोजी ब्रिटिश भारतात लॉर्ड डलहौजी ह्यांनी आधुनिक भारतीय टपाल सेवेचा पाया रचला. डलहौजी ह्यांनी एकसमान टपाल दर (सार्वत्रिक सेवा) लागू केलेत आणि इंडिया पोस्ट ऑफिस ॲक्ट १८५४ मंजूर करीत लॉर्ड विल्यम बेंटिक ह्यांच्या भारतात टपाल विभागाची स्थापना करण्याविषयीच्या १८३७ च्या कायद्यात दुरूस्ती केली.

---------------

दरवर्षी ९ ऑक्टोबरला जागतिक टपाल दिन किंवा 'वल्ड पोस्ट डे' हा दिवस जगभरातून साजरा केला जातो. इंटरनेटच्या काळात आजही लोकं टपालसेवेचा वापर करतात आणि त्यावरचा लोकांचा विश्वास कायम आहे. एका शहरातून दुसरीकडे टपाल पाठविण्याचं सर्वात सोपं आणि स्वस्त साधन आहे ते म्हणजे पोस्ट सेवा.





फक्त देशातच नाही तर जगातील कोणत्याही देशात टपाल पाठविण्यासाठी या सेवेचा लाभ घेता येतो. टपाल दिवस साजरा करण्याचा हेतू एवढाच कि, टपाल सेवा आणि त्यातील विभागांविषयी लोकांना जागरुक करणे होय. स्मार्टफोनच्या जमान्यात पत्र कोण पाठवेल? हा प्रश्न नक्कीच तुमच्या मनात देखील आला असेल. मात्र आजही भारतातील काही ठिकाणी पत्र हेच एकमेकांशी संपर्क करण्याचं साधन आहे.

'टपाल' हा इतिहासाचा मौल्यवान ठेवा, काळ बदलला तरी आजही त्याचे महत्व कायम आहे. एक काळ असा होता, जेव्हा लोक दिवस-रात्र पत्रांची वाट पाहत असे. मात्र बदलत्या काळाबरोबरच आणि तंत्रज्ञानाबरोबर मोबाईल, सोशल मीडियामुळे क्षणात कोणाशीही संवाद साधता येतो. मात्र आजच्या युवा पिढीला पत्र, पोस्टकार्ड आणि ग्रिटिंगचे महत्त्व हवे तेवढे वाटत नाही. एकेकाळी लोकांसाठी पत्र म्हणजेच सर्वकाही होतं.

युनिवर्सल पोस्टल युनियन (युपीयु) ची उभारणी करण्यासाठी ९ ऑक्टोबर १८७४ मध्ये स्विझर्लंडची राजधानी 'बर्न' येथे २२ देशांनी मिळून करारावर सही केली होती. या घटनेच्या स्मृतीत टोकियोत १९६९ मध्ये आयोजित केल्या गेलेल्या संमेलनात ९ ऑक्टोबरला जागतिक टपाल दिन म्हणून घोषित करण्यात आले.

१ जुलै १८७६ ला भारत 'युनिवर्सल पोस्टल युनियन' चा सदस्य होणारा पहिला आशियाई देश ठरला. बदलत्या काळासोबत जगातील सर्व टपाल सेवांनी त्यांच्या कार्यप्रणालीमध्ये आवश्यक बदल केले आहेत. नवीन तंत्रज्ञानासह टपाल सेवांनी स्वतः ला अधिक जलद केले आहे. डाक, पार्सल, पत्र हे एक्सप्रेसने जाण्याची सेवा सुरु झाली. जवळपास २५ वर्षांपूर्वी या बदलावांना सुरुवात झाली आणि सर्वच स्तरावर तांत्रिक बदल करण्यात आले. आता ऑनलाईन पोस्टल देवाण- घेवाणीवरही लोकांचा विश्वास वाढला आहे.

'युपीयु ने केलेल्या एका सर्वेमध्ये अशी माहिती समोर आली की जगभरातून आजच्या घडीला ६५ पेक्षा जास्त प्रकारच्या ई-पोस्टल सेवा उपलब्ध आहेत. सध्याच्या टपाल व्यवस्थेची सुरवात सतराव्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात झाली. १६८८ मध्ये मुंबई आणि मद्रास इथे कंपनी पोस्टची कार्यालये स्थापन झाली. मात्र त्याद्वारे केवळ कंपनीच्या टपालाचीच ने-आण होई.

वॉरन हेस्टिंग्ज हा बंगाल प्रांताचा गव्हर्नर असताना त्याच्याकडे मुंबई आणि मद्रास इलाख्याच्या देखरेखीचे अधिकार होते. त्या काळात १७७४ मध्ये टपालसेवा जनतेसाठी खुली करण्यात आली. पोस्टमास्टर जनरलची प्रथमच नियुक्ती करण्यात आली आणि टपालसेवेसाठी पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकने टपालासोबत वापरायला सुरूवात झाली. सुरवातीच्या काळातील अडचणींवर मात करण्यासाठी सर्व प्रेसिडेन्सीं अंतर्गतची टपाल सेवा एकसूत्री असावी असा विचार पुढे आला. त्यातूनच पहिला भारतीय टपाल कायदा, १८३७ हा अस्तित्वात आला.

त्यात पुढे बदल करून १८५४ चा टपाल कायदा अस्तित्वात आला. त्याद्वारे देशात टपाल सेवेचा एकाधिकार हा टपाल खात्याला देण्यात आला. २०११ पर्यंत त्यात बदल झालेला नाही. पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकने मागे पडून, १ ऑक्टोबर १८५४ पासून चिकट पार्श्वभाग असलेली टपाल तिकिटे वापरात आली.

१९७७ मध्ये भारतानं जाल कूपर यांचं टपाल तिकीट प्रसिद्ध केलं होतं. याचं कारणंही तसंच होतं. जाल कूपर हे टपाल तिकीट या विषयातील जागतिक पातळीवरचे अभ्यासक होते. मुंबईत पारशी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. इंडियाझ स्टॅम्प जर्नलचे संपादन केले होते.

भारतातील पहिल्या तिकीट संपादक ब्यूरोचे ते संपादक होते. त्यांनी इम्पायर ऑफ इंडिया फिलाटेलिक सोसायटीची स्थापना केली होती. याच विषयावर त्यांनी पुढे पुस्तकही लिहिलं. त्यांच्या छंदाला त्यांनी शास्त्रीय स्वरुप दिलं. भारतीय टपाल तिकीटांचा अभ्यास जागतिक पातळीवर नेण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

टपाल तिकीट संग्राहक अशी कारकिर्दीची सुरुवात करुन जागतिक पातळी गाठणाऱ्या कूपर यांचे योगदान प्रचंड महत्वाचं आहे, हे त्यांच्यावर काढलेल्या तिकीटांवरुन लक्षात येतं. भारतात २३ टपाल क्षेत्रात विभागले गेले आहेत, प्रत्येक क्षेत्र चीफ पोस्टमास्टर जनरल यांच्या अध्यक्षतेखाली आहे. संपूर्ण देशासाठी डायरेक्टर जनरल ऑफ पोस्ट हे प्रमुख पद आहे.

युनिव्हर्सल पोस्टल युनियनने कार्यक्षम अशा टपाल सेवेचा मार्ग खुला केला, जी पुढे १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची एक प्रमुख संस्था बनली. भारत स्वतंत्र्य झाल्यापासून ते आजपर्यंत टपाल तिकीटांच्या स्वरुपात, आकारात, रचनेत विविध बदल झालेत. त्यांच्यातील या बदलांमुळे त्या-त्या काळाविषयी माहिती मिळते.

टपाल खाते नेते, फुलं, प्राणी-पक्षी, एखादी घटना, रौप्य, सुवर्ण, अमृतमहोत्सवी, शतक, द्विशतक किंवा त्रिशतकनिमित्त तिकीटं काढतं. १९४७ ला जेव्हा भारत स्वतंत्र झाला, त्यावेळी पोस्ट तिकीटात बदल करण्यात आला होता. त्या तिकीटावर तिरंग्याचे चित्र दिले होते, तर कधी इंदिरा गांधी, महात्मा गांधी, राजीव गांधी, सचिन तेंडुलकर यांच्या सारख्या थोर व्यक्तींच्या प्रतिमा टपाल तिकीटांवर विशेष काळात होत्या. यावरुन आपल्याला त्या काळात त्यावेळी घडलेल्या घटनांची माहिती मिळते. त्यामुळेच टपाल तिकीटे हा इतिहासाचा मौल्यवान ठेवा आहे.

हिमाचल प्रदेशमधील हिक्किम नावाच्या गावामध्ये जगातील सर्वात उंचावरील टपाल कार्यालय अर्थात पोस्ट ऑफिस आहे. ४४४० मीटर उंची जेथे श्वास घेण्यास अडचण येते, अशा ठिकाणी १९८३ पासून हे टपाल कार्यालय दुर्गम भागात पत्र पाठवण्याचे काम करते. हिक्किमच्या आजुबाजूच्या गावांचे संचाराचे एकमात्र साधन हे पत्र आहे.

या टपाल कार्यालय हिक्किमबरोबरच लांगचा-१, लांगचा-२ आणि कॉमिक गावांमध्ये पत्र पोहचवण्याचे काम करते. बर्फामुळे जून ते ऑक्टोबरच्या काळात या ठिकाणी जाणे शक्य नसते.

या टपाल कार्यालयात १९८३ पासून रिनचेन नावाची व्यक्ती पोस्टमनचे काम करत आहे. अनेकदा बर्फामुळे त्यांना घरी परतण्यास अडचणीचा सामना देखील करावा लागतो. तत्परतेने सेवा देणाऱ्या भारतीय टपाल विभागातील सर्वांना आंतरराष्ट्रीय टपाल दिना निमित्त मनपूर्वक शुभेच्छा!

●●●●●●●●●



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

# ओबीसींची जातनिहाय गणना अत्यावश्यकच!

पूर्वार्ध
कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
9423714883

ओबीसी समाजाला मिळालेले आरक्षण हे सद्या धोक्यात आले असून ते पुढे रद्दी होऊ शकते. त्यामुळे काँग्रेसच्या वतीने ओबीसी समाजामध्ये जनजागृती करण्यात येत आहे. सरकार विरोधात आंदोलने करण्यात येत आहेत. महाराष्ट्रभरातील विविध ओबीसी संघटनाही सरकारच्या विरोधात पेटून उठू लागल्या आहेत. जिकडे तिकडे निषेध मोर्चे, संप, चक्काजाम, उपोषणे, आंदोलने होऊ लागले आहेत.

अजब सरकारच्या गजब निर्णय-कारनाम्यांना जनता आता ठेचून काढून त्यांना- सरकारच्या कच्च्या बच्च्यांना त्यांची जागा आणि लायकी दाखवून देणार आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्टच! तसेच ओबीसींची जातनिहाय जनगणना करणे गरजेचे आहे, अशी मागणी यातून करण्यात येत आहे, ती अगदी रास्तच आहे. प्रत्येक जिल्ह्यात ओबीसींसाठी स्वतंत्र वसतिगृह निर्माण करावे व ते चालविण्यासाठी ओबीसीमधील सुशिक्षित बेकार लोकांना चालू करण्यास परवानगी द्यावी. महाज्योती ही ओबीसींसाठी चालू केलेली वित्तिय संस्था आहे.

परंतु त्यासाठी पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर या ठिकाणी त्वरीत विभागीय कार्यालय चालू करण्यात यावे. परदेशी शिक्षणासाठी व इतर महत्त्वाच्या शैक्षणिक डिग्रीसाठी भरीव निधीची तरतूद करावी, याही मागण्या लावून धरण्यात येत आहेत.

बहुजनांसाठी व बलुतेदारांसाठी विविध महामंडळे स्थापन केले आहे. परंतु त्यांना पुरेसा निधी व पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे योजनांची अंमलबजावणी होत नाही. तसेच बलुतेदार महामंडळासाठी अडीच हजार कोटी रूपयाची तरतूद करून पुर्वी जे कर्ज काढले आहेत, ते सर्व पुर्णपणे माफ करून कोटार्तील केसेस काढुन घ्याव्यात. मागसवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना आहे.

त्यापध्दतीची ओबीसींसाठी स्वाधार योजना त्वरीत चालू करण्याचीही मागणी होत आहे. छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण राज्यात आगामी काळात सत्यपाल मलिक यांच्या विविध शहरांमध्ये सभा घेतल्या जाणार आहेत यामध्ये छत्रपती संभाजी नगर पुणे शहरात घेतल्या जाणार असल्याची माहिती काँग्रेसच्या ओबीसी सेलचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे.

माळी म्हणाले होते, की सत्यपाल मलिक यांच्यासोबत माझे बोलणे झाले असून पुढच्या महिन्यात त्यांच्या सभा राज्यात घेण्यात येणार आहेत. त्यामध्ये छत्रपती संभाजी नगर, नाशिक, नागपूर, पुणे या ठिकाणी या सभा होणार आहेत यामधून मलिक हे केंद्र सरकारची पोलखोल करणार असल्याचे माळी यांनी म्हटले आहे. या अशा रोषांना सरकारला सामोरे जावे लागत आहे, रोष पत्करावा लागत आहे, तेव्हा सरकारने आपली थोडी थोडकी लाज वाचवून ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय तातडीने घ्यावा.

देशातील ९० टक्के ओबीसी आणि मागासवर्गीय लोकसंख्येला खरोखरच न्याय द्यायचा असेल, तर देशातील ओबीसींसह सर्व जातींची जनगणना होणे गरजेचे आहे. या देशात धर्म आणि जातीच्या नावावर लोकांना भडकवले जात आहे. धर्माच्या नावावर दंगली घडवून आणल्या जात आहेत, शाळांकडे जाणारा जमाव धार्मिक उन्मादाकडे वळवला जात आहे.

धर्माच्या नावाखाली काढण्यात येणाऱ्या मिरवणुकांमध्ये तरुणांना सहभागी करून, त्यांच्या हातातून पेन-वही काढून, त्यांना त्रिशूळ, तलवारी देऊन त्यांच्या भविष्याशी खेळ केला जात आहे. या देशाला शाळांची गरज आहे, मंदिरांची नाही. मंदिरापासून फक्त ब्राह्मणी पुजाऱ्यांना रोजगार मिळेल, परंतु बहुजन लोकांना त्यापासून काही एक लाभ नशीब होऊ शकत नाही.

शाळेत शिकून देशसेवा म्हणून सरकारी नोकरीत तरी रूजू होईल. नोकरी लागल्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती सुधारेल. ओबीसींची परिस्थिती सुधारू नये म्हणून की काय? शैक्षणिक आणि नोकऱ्यातील आरक्षण संपवण्यात आले आहे. म्हणजे ब्राम्हण किती षडयंत्रकारी असतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे. म्हणून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगत असत, ब्राम्हीन्स हॅव अ ब्रेन वुईथ इन द ब्रेन..! ब्राम्हणांच्या एका मेंदूत अनेक षडयंत्रकारी मेंदू लपलेले असतात. म्हणून तो सतत षडयंत्र रचत असतो. आजचे ब्राह्मणीमेंदूयुक्त सरकारही देश विकायला-देश बरबाद करायला निघाले आहे, वेगळे सांगावे लागू नयेच!

ओबीसींनी नाना देवांधर्मांच्या नादी लागून स्वतःचे वाटोळे केले आहे. कारण धर्म ही अफूची गोळी आहे. या धर्म नावाच्या अफूच्या गोळीची नशा चढली तर ती धोकादायक- विनाशक ठरते. म्हणून ओबीसींनी सावध होणे गरजेचे आहे. ज्या दिवशी ओबीसींची जातनिहाय जनगणना होईल, त्या दिवशी ओबीसी ब्राम्हणी गुलामीतून नक्कीच होईल. हे मी येथे जगजाहीरपणे लिहून देत आहे.

●●●● क्रमशः ●●●●

# बिग बॉस विजेत्या सूरज चव्हाणचा प्रेरणादायी प्रवास

कलर्स मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या बिग बॉस या रिॲलिटी शो चा ग्रँड फिनाले रविवारी रंगला आणि या अपेक्षेप्रमाणे सूरज चव्हाण हा या रि?लिटी शो चा विजेता ठरला.

सूरज चव्हाण या शो चा विजेता ठरावा अशी प्रेक्षकांची ईच्छा होती. कारण अल्पावधीतच त्याने प्रेक्षकांच्या मनात घर केले होते. त्याचा भोळसट स्वभाव आणि निरागस वागणूक यामुळे प्रेक्षक त्याच्या प्रेमात पडले होते.

मनोरंजन क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकार या शो मध्ये त्याचे प्रतिस्पर्धी होते त्यामुळे त्याला कोणीच जमेस धरले नव्हते. टीकटॉक वर स्वतःचे काही सेकंदाचे व्हिडिओ बनवून टाकणारा सूरज चव्हाण हा या शो चा विजेता ठरेल असे सूरज वगळता कोणालाच वाटले नव्हते. सूरजला मात्र स्वतः वर विश्वास होता आणि याच विश्वासाच्या जोरावर तो विजेता ठरला.

काहीही करून हा शो जिंकायचाच असा विचार करून तो शो मध्ये उतरला आणि त्याने स्वतः ला सिद्ध केले. सूरज बिग बॉस चा विजेता ठरला असला तरी त्याचा इथपर्यंतचा प्रवास सोपा नव्हता. बारामती येथे जन्मलेल्या सूरज चव्हाणचे बालपण अतिशय खडतर अवस्थेत गेले. सूरज चव्हाण लहान असतानाच त्याचे आई वडील वारले. लहानपणीच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सूरज चव्हाणचा सांभाळ त्याच्या मोठ्या बहिणीने केला. त्याला एकूण पाच बहिणी आहेत. घरची परिस्थिती हालाखीची असल्याने आठवितच सूरजला शाळा सोडून द्यावी लागली.

घरची परिस्थिती हलाखीची असल्याने एक वेळचे जेवण मिळणे देखील मुश्कील त्यामुळे कित्येकदा तो उपाशी किंवा अर्धपोटीच झोपत असे. पोटाची खळगी भरण्यासाठी त्याने मंदिरातील नैवद्य खाऊन दिवस काढले.

किशोर वयातच त्याला सोशल मिडियाचे वेड लागले. इतर मुलांसारखे तो ही टिक टॉक या सोशल मीडिया साईट वर स्वतःचे व्हिडिओ काढून टाकू लागला. अल्पावधीतच त्याचे व्हिडिओ लोकप्रिय झाले आणि बघता बघता तो महाराष्ट्रात फेमस झाला तो त्याच्या आगळ्या वेगळ्या शैलीने, त्याचे डायलॉग अक्षरशः वाऱ्या सारखे व्हायरल झाले. गुलिगत धोका, बुक्कित टेंगुळ, झापुक झुपुक, मरीआई पावली या सारखे त्याचे कितीतरी डायलॉग हिट झाले आणि तो टिक टॉक स्टार झाला.

टिक टॉक यू ट्यूब कडून त्याला पैसेही मिळाले पण सुरुवातीला त्याच्या भोळ्या स्वभावामुळे ते त्याच्या पर्यंत पोहचले नाही तरीही त्याची काही तक्रार नव्हती. तो त्याचे व्हिडिओ, रिल्स बनवून प्रेक्षकांसमोर येतच होता. त्याची लोकप्रियता वाढतच होती. त्याच्या याच लोकप्रियतेचा फायदा घेण्यासाठी कलर्स मराठी वाहिनीने त्याला बिग बॉस शो ची ऑफर दिली. सुरुवातीला सूरज बिग बॉसच्या घरात यायला तयार नव्हता. पण कलर्स वाहिनीने त्यांचा हट्ट सोडला नाही. अखेर सूरज चव्हाण बिग बॉसच्या घरात यायला तयार झाला आणि आज सूरजने थेट बिग बॉसच्या ट्रॉफी वर नाव कोरत इतिहास घडवला.

काही जण त्याच्या या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून म्हणतात की बिग बॉस प्रि प्लॅन्ड होतं पण तळागाळातील सर्वसामान्य मुलासासाठी कोण प्लॅन करणार? कोण त्याचा एवढा विचार करणार? ते पण एवढ्या मोठ्या कसलेल्या कलाकारांसमोर. सूरज चव्हाण त्याच्या कष्टाच्या आणि जिद्दीच्या बळावर ईथवर पोहचला आहे. आता त्याच्या कष्टाचे चीज झाले असे म्हणावे लागेल. बिग बॉस विजेत्या सूरज चव्हाणचे मनापासून अभिनंदन !!

------------------

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

●●●●●●

# नवरात्रीत उपवास... या चुका करू नका





उपवासाच्या दिवसात लोक व्यायाम करणे बंद करतात. बहुतेक लोकांचा असा विश्वास आहे की उपवास दरम्यान व्यायाम केल्याने शरीरातील उर्जा पातळी कमी होते. तर वास्तव यापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. जर तुम्ही रोज नियमित व्यायाम केलात तर तुमची चयापचय क्रिया वाढेल आणि अन्न पचायला सोपे जाईल. उपवासात तुम्ही जे काही खात आहात ते सहज शोषले जाईल. हे कॅलरी बर्न करण्यास देखील मदत करेल आणि वजन कमी करेल. भारतातील बहुतेक लोक उपवासात इतके कार्बोहायड्रेट आणि साखरयुक्त पदार्थ खातात की नवरात्रीनंतर त्यांची तब्येत सुधारण्याऐवजी बिघडते. चहा किंवा कॉफीचे वारंवार सेवन केल्यामुळे झोपेची गुणवत्ता बिघडते किंवा झोप कमी होऊ लागते. त्यामुळे लोक रात्री उशिरापर्यंत जागे राहून जेवतात.

याचा परिणाम असा होतो की उपवास संपल्यानंतर अनेक लोक ब्रेन फॉगिंग, मूड बदलणे आणि चिडचिडेपणाची तक्रार करतात.

नवरात्रीच्या ९ दिवसांमध्ये आहार आणि व्यायामाशी तडजोड करू नका. योग्य आहार योजना फॉलो करण्यासोबतच आवश्यक व्यायाम देखील करा.

एकाच वेळी भरपूर नाश्ता करणे, साखर आणि तूप भरपूर वापरणे, चहा किंवा कॉफी वारंवार पिणे, भरपूर कार्बोहायड्रेट आणि पिष्टमय पदार्थ खाणे, खूप गोड खाणे, पाणी कमी पिणे, पॅकेज केलेले अन्न खाणे, रात्री उशिरा जेवणे, व्यायाम न करणे, या ९ चुकांमुळे वजन कमी होत नाही.

जॉन हॉपकिन्स स्कूल ऑफ मेडिसिनचे न्यूरोसायंटिस्ट मार्क मॅटसन यांना २५ वर्षांच्या संशोधनानंतर असे आढळून आले की आपले शरीर उपवासासाठी आधीच तयार आहे. उपवासासाठी जास्त मेहनत करावी लागत नाही.

आपल्या पूर्वजांनी आपल्याला उत्क्रांतीच्या रूपाने अनेक अनोख्या देणग्या दिल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे आपण काहीही न खाता बरेच दिवस जगू शकतो. कधीही असा प्रसंग येऊ शकतो की आपल्याला उपाशी राहावे लागेल यासाठी आपले शरीर आधीच तयार असते. त्यामुळे आपलं शरीर संकटासाठी पुरेशी ऊर्जा साठवून ठेवते.

त्यांना संशोधनात असे आढळून आले की जर आपले पूर्वज इतके तंदुरुस्त आणि निरोगी असतील तर त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे उपवास हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. आपल्याला हवे असेल तर त्याचा अवलंब करून आपणही तंदुरुस्त राहू शकतो.

●●●●●●

## अशोकायन

### भवितव्य?

महाराष्ट्राच्या राजकारणाला
इर्षा द्वेशाने झपाटले
बहुतांश नेते जणू तारतम्य
सोडून वागाया लागले . ..

समाज स्वास्थ
बिघडविण्याचा
जणू उचललाय विडा
समजेना काही कशी टळेल
भाऊही ईडा -पिडा ..!

सामाजिक शांततेला
बसू लागलेत तडे
'आम आदमी ' साठी
हे पोषक नाही गडे..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# पश्चिम विदर्भात पावसाळ्यात ६५ नागरिकांनी गमावले प्राण

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ८ :** यंदाच्या पावसाळ्यात पश्चिम विदर्भाच्या पाच जिल्ह्यात विविध घटनांमध्ये६५ व्यक्तींचा मृत्यू झाला. तर २० जण जखमी झाले असून एक जण बेपत्ता आहे. दरम्यान, अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे १ हजार४७ पक्क्या घरांची पडझड झाली. यातील १०० घरे पूर्णत: जमीनदोस्त झाली, तर ४४७ घरांची अंशत: पडझड झाली आहे.





शासकीय व्याख्येनुसार, ३० सप्टेंबरल रोजी पावसाळा ऋतू संपुष्टात आल्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयाने सन २०२४ च्या पावसाळ्याचा संयुक्त अहवाल राज्य शासनाकडे पाठविला आहे. या अहवालात संबंधित माहिती नमूद केली आहे. या अहवालानुसार बुलडाणा जिल्ह्यात सर्वाधिक १६ व्यक्तींचा मृत्यू ओढवला. त्याखालोखाल अमरावती व अकोला जिल्ह्यातील प्रत्येकी १५ जणांना अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे आपले प्राण गमवावे लागले. यवतमाळ जिल्ह्यात १२ तर वाशीम जिल्ह्यातही ७ जणांचा अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे बळी गेला. १ जून ते ३० सप्टेंबर या पावसाळ्याच्या चार महिन्यांत पश्चिम विदर्भात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली. परिणामी नद्यांनाही पूर आले. या पुरामुळे ५० तालुक्यांतील ३ शहरे आणि ३८८ गावे बाधित झाली. शहरे व गावांमधील बाधित कुटुंबांची संख्या४४५ आहे, तर व्यक्तींची एकूण संख्या हजार ८६५ आहे. यापैकी ८८६ व्यक्तींना काही दिवसांसाठी सुरक्षित स्थळी हलवावे लागले. शासनाला सादर केलेल्या अहवालानुसार मृतांच्या संख्येत एकने वाढ होण्याची शक्यता आहे. पुरात वाहून गेलेल्या अमरावती जिल्ह्यातील एका व्यक्तीचे शव अद्याप हाती लागले नाही. त्यामुळे शासकीय व्याख्येनुसार हा व्यक्ती सध्या बेपत्ता आहे. पावसाळ्याच्या चार महिन्यांत अतिवृष्टी व पुराचा फटका बसल्याने ३ लाखांवर शेतकरीही बाधित झाले. या सर्वांनी २ लाख ८० हजार६१४ हेक्टर शेतजमीनीतील पिके जवळपास गमावली असून त्यांना ३८६ कोटी २३ लाख ४८ हजार रुपयांची मदत दिली जावी, असेही विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडेय यांच्या प्रस्तावात आहे.

५० मृतांच्या कुटूंबीयांना मदत विभागीय आयुक्तांच्या अहवालानुसार, ६५ मृतांपैकी५० जणांच्या कुटूंबीयांना शासनातर्फे मदत पुरविण्यात आली. उर्वरित प्रकरणांमध्येही मदत पुरविण्याची प्रक्रिया सुरु आहे.

एकूण मृतांपैकी ४० जणांचा मृत्यू पुरात वाहून गेल्याने झाला असून काहींचा वीज पडल्याने, तर उर्वरित व्यक्तींचा भिंत पडून झाला आहे. त्यामुळे एसडीआरएफच्या नियमानुसार त्या-त्याकुटुंबाला मदत पुरविण्यात आली आहे.

# यवतमाळचा नवरात्रोत्सव बघण्यासाठी लाखो भाविकांची गर्दी

■ महासागर प्रतिनिधी,
**यवतमाळ, दि.८ :** देशातील दुसऱ्या आणि महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाचा दुर्गोत्सव यवतमाळात उत्साहात सुरू आहे. धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जपणारा हा उत्सव डोळ्यांत साठवून ठेवण्यासाठी दररोज लाखो भाविक यवतमाळात दाखल होत आहेत. नवरात्रीच्या पर्वावर होणारा हा दुर्गोत्सव यवतमाळकरांसाठी लोकोत्सव ठरला असून शेकडो हात या उत्सवाला यशस्वी करण्यासाठी अहोरात्र झटत आहेत.



शहरातील विविध मंडळांनी साकारलेले आकर्षक देखावे, दुर्गादेवीची प्रसन्न भाव असलेली मूर्ती, भाविकांसाठी पूर्णवेळ महाप्रसाद आणि त्या जोडीला सामाजिक उपक्रम असे एकूण दुर्गोत्सवाचे स्वरूप आहे. कार्यकर्त्यांच्या परिश्रमाने आणि भक्तांच्या उत्साहाने या दुर्गोत्सवाला नवचैतन्य प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील विविध भागांसह परजिल्ह्यातून आणि तेलंगणा, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात आदी राज्यातून भाविक यवतमाळात दाखल होत आहेत. दररोज सायंकाळी ५ वाजल्यानंतर पहाटे तीन, चार वाजेपर्यंत गर्दीचा महापूर शहरात ओसंडून वाहत आहे. नवरात्रीच्या चवथ्या दिवसापासून अष्टमीपर्यंत जवळपास २० ते २५ लाख नागरिक हा दुर्गोत्सव बघण्यासाठी यवतमाळात येतात. या उत्सवामुळे स्थानिक रोजगारही वाढला आहे. अनेक मंडळ भाविकांसाठी महाप्रसाद ठेवतात. अनेक छोट्या व्यावसायिकांनी जागोजागी उपवासाचा नाष्टा आदी दुकाने लावली आहेत.

येथील बालाजी चौकातील बालाजी दुर्गोत्सव मंडळाच्या माध्यमातून माजी नगराध्यक्ष सुभाष राय हे गेल्या ३५ वर्षांपासून लंगर उपक्रम राबवित आहेत. छोटी गुजरीमधील एकता दुर्गोत्सव मंडळ, वडगाव रोडवरील सुभाष क्रीडा मंडळाने देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांसाठी उपवासाच्या फराळाची व्यवस्था केली आहे. अनेक दुर्गोत्सव मंडळ भक्तांचे प्रबोधानही करत आहेत. बेटी बचाव, स्वदेशीचा वापर करा, बचत करा, यासारखे संदेश देण्यात येत आहे.

गणपती मंदिर चौकातील नवशक्ती दुर्गोत्सव मंडळाची अन्नदानाची अखंड परंपरा आहे. मंडळाचे हे ५३ वे वर्ष आहे. या ठिकाणी भाविकांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय मंडळ अखंड दीपज्योत ही संकल्पना राबविते. हे दीप नऊ दिवस तेवत असतात. यावर्षी १००१ अखंड दीप या विकाणी तेवत आहेत. यासाठी मंडळाचे असंख्य कार्यकर्ते परिश्रम घेत आहे.

आठवडी बाजारात यवतमाळची ग्रामदेवी आहे. या ठिकाणी हिंदुस्थानी दुर्गादेवी मंदिरात गेल्या सहा वर्षांपासून शितलामाता मंदिरात जलार्पण केले जाते. यासाठी पहाटेपासून भक्त रांगेत असतात. गांधी चौकातील गांधी चौक दुर्गोत्सव मंडळ भक्तांचा निरंकार उपवास लक्षात घेता दूध वितरण करीत आहे. दररोज ६०० ते एक हजार लिटर दुधाचे वितरण केले जात आहे.

# अमरावती जिल्हाभरातील ५६ प्रकल्पांमध्ये ८८.४५ टक्के पाणी



■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ८ :** जिल्ह्यात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रात झालेल्या पावसाने मोठा प्रकल्प, मध्यम आणि लघु अशा प्रकल्पात जलसाठ्यात वाढ झाली असून, यातील काही प्रकल्प ओव्हरफ्लो होऊन वाहत असल्याने प्रशासनाने त्या प्रकल्पाचे दारे खुली केली आहेत. यामध्ये एक मोठा अप्पर वर्धा प्रकल्प तर सहा मध्यम प्रकल्पांचा समावेश आहे. आजघडीला ८८.४५. टक्के जलसाठा आहे. जिल्ह्यात यंदा होत असलेल्या संततधार पावसामुळे प्रकल्पातील पाणीसाठा कमालीचा वाढत आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याला तसेच शेतीला पूरक पाणी मिळेल. जिल्ह्यात पावसाची रिपरिप सुरू होती. काही भागात तीन दिवसापूर्वी पावसाचा जोर कायम होता. त्यामुळे जलपातळीत आणखी वाढ आहे. त्यामुळे नदी नाल्यांसह मोठे प्रकल्प आणि मध्यम प्रकल्पांच्या जल पातळी वाढली आहे. सद्यास्थितीत ५६ प्रकल्पात उपयुक्त जलसाठा८८.४५ . टक्के आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या अप्पर वर्धा धरणाचा पाणीसाठा हा ४४.१८. टक्क्यांवर पोहोचला आहे. मध्यम प्रकल्पात ६४.१३. टक्के पाणीसाठा तर४८ लघु प्रकल्पात . टक्यांवर जलसाठा आहे. यातील अनेक मध्यम आणि लघु प्रकल्प ओव्हरफ्लो झाले आहेत.

सद्यस्थितीत सात प्रकल्पांचे दारे खुली करण्यात आली आहेत. यामध्ये सर्वात मोठा अप्पर वर्धा धरण टक्यांवर भरले आहेत. याचे ५ गेट १० सेंटी मीटरने खुले करण्यात आली आहेत.

यामधून क्युमेक विसर्ग होत आहे. तर मध्यम प्रकल्प असलेल्या शहानूरचे २ गेट पाच सेंटीमीटरने खुले करण्यात आले आहेत. त्यातून २.११. क्युमेक विसर्ग होत आहे. तसेच चंद्रभागा प्रकल्पाचे ३ गेट पाच सेंमी सोडले असून यातून १७.४०. क्यूमेक विसर्ग होत आहे, तर पूर्णाचे २ गेट १० सेंमी खुले केली असून १७.३८. क्युमेक विसर्ग होत आहे. सपनचे २ दारे सेंटीमीटरने उघडी केली असून . क्यूमेकने विसर्ग होत आहे. तर पंढरी प्रकल्पातून १.६४२४. क्युमेकने विसर्ग होत आहे. तर गर्गा मधून ११.४६. क्यू मेकने विसर्ग होत आहे.

# कळमेश्वर तहसीलदार रोशन मेकवाने यांना तक्रार देऊन दखल नाही

**शासकीय जमीन सावकाराचा कब्जा**

**पांदन लगतचे जमीन मालक/स्थानिक नागरिक त्रस्त, सावकाराकडून शासनाच्या जमिवर बिना परवानगी काम सुरू**





■ महासागर प्रतिनिधी,
**कळमेश्वर, दि. ८ :** ठाणेदार सध्या तो कायका डर ही कहावत तेव्हा संपुष्टात आली जेव्हा मौजा दहेगाव येथील पाणीपुरवठा टाकी जवळील महसूल विभाग ची पांधन रस्त्याचे काम एका धनाढ्य व्यक्तीने अवैधरित्या सुरू केले. नागरिकांनी ग्रामपंचायत मध्ये धाव घेतली. महसूल ची जमीन आहे. आम्ही काही करू शकत नाही असे सांगितले नागरिक त्रस्त म्हणून

ग्रामस्थांनी आरटीआय सामाजिक कार्यकर्ता कु. सुषमा डबराल यांना फोन करून संपूर्ण माहिती दिली असता लेखी तक्रार ग्राम पंचायत सचिव ग्रामस्थांसोबत ग्रामसेवक यांना भेटून सर्व प्रकार सांगितला असता काम तात्पुरते बंद केले. तहसीलदार रोशन मेकवाने यांना सुद्धा तक्रार केली.परंतु आजपर्यंत त्यांनी सामाजिक कार्यकर्ते च्या तक्रारी ची दखल घेतली नाही. धनवान व्यक्ती बिना निविदा ने काम करून खाजगी नफा मिळवतो घेतल्याचे समजताच कु.सुषमा डबराल यांनी तहसीलदार रोशन मकवाने यांना संपर्क केला असता मेकवाने यांनी ग्रामस्थांशी भेट न घेतली नाही.त्याचे सहाय्यक यांनी समजून घातली परंतु शासनाच्या जमीन सुरक्षा अंधारातच आहे. धनवान असल्याने कार्यवाही केली नाही.

रस्ता प्रस्तावित नसताना देखील रस्त्यांचे खोद काम सुरू शेतकऱ्यांची काठाची शेती मध्ये जेसीबी चालवून रस्ता मोठा बनवण्याचे कट कारस्थान मोठ्या व्यवसायईक व्यक्ती ला लाभ पोहोचवण्याचे कारस्थान तहसीलदार रोशन मेकवाने करत असल्याचे आरोप ग्रामस्थांनी लावले आहे.एन एम आर डी रोड प्रस्तावित करण्याकरिता तहसीलदार व व्यावसायिक यांनी हा कट रचून शेतकऱ्यांची शेती व शासकीय जमीन दडपण्याचे कारस्थान असल्याचे आरटीआय कार्यकर्ता कुमारी सुषमाडबराल यांनी सांगितले आहे.

# वीज कंपनीच्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्येच सहाय्यक अभियंत्याचा मृत्य

■ महासागर प्रतिनिधी,
**हिंगोली , दि. ८ :** हिंगोली नांदेड विभागाच्या विज कंपनीच्या थकीत देयकाच्या वसुलीसह इतर सुचनांसाठी मंगळवारी व्हिडीओ कॉन्फरंन्सींगद्वारे आयोजित बैठकीत हिंगोलीच्या सहाय्यक अभियंत्याचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याची घटना दुपारी एक ते दिड वाजण्याच्या सुमारास घडली आहे. त्यांचा मृतदेह हिंगोलीच्या शासकिय रुणालयात हलविण्यात आला आहे. विज कंपनीच्या नांदेड विभागांतर्गथ नांदेड, हिंगोली व परभणी जिल्ह्याचा समावेश आहे. नांदेड येथील मुख्य अभियंता कार्यालयाकडून व्हिडीओ कॉन्फरंन्सींगद्वारे बैठका घेऊन आवश्यक त्या सुचना तीनही जिल्ह्यातील विज कंपनीच्या अभियंत्यांना दिल्या जातात. दरम्यान, आज दुपारी साडेबारा वाजता मुख्य अभियंता कार्यालय नांदेड यांच्याकडून व्हिडीओ कॉन्फरंन्सींगद्वारे बैठकीचे आयोजन केले होते. याबैठकीस तीनही जिल्ह्यातील अभियंत्यांना उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार दुपारी साडेबारा वाजता बैठक सुरु झाली. या बैठकीत हिंगोलीच्या विज कंपनीच्या कार्यालयातील सर्व अभियंता सहभागी झाले होते.



बैठकीमध्ये थकीत विज देयक वसुली सोबतच इतर सुचना दिल्या जात असतानाच हिंगोली कार्यालयातील सहाय्यक अभियंता सचिन दत्तात्रय कोळपे हे खुर्चीवरून खाली पडले. या बैठकीत उपस्थित इतर अधिकाऱ्यांनी तातडीने त्यांच्याकडे धाव घेतली. त्यांच्या तोंडातून फेस येत असल्याने त्यांना तातडीने हिंगोली येथे खाजगी रुणालयात उपचारासाठी नेण्यात आले.

मात्र उपचारापुर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहिर केले. त्यानंतर मयत अभियंता सचिन कोळपे यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोलीच्या शासकिय रुग्णालयात दाखल केला आहे. या घटनेमुळे हिंगोली विज कंपनीच्या कार्यालयावर शोककळा पसरली आहे.दरम्यान, मयत सचिन यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगी असा परिवार असून ते मुळचे नांदेड येथील रहिवासी असल्याचे विज कंपनीच्या सुत्रांनी सांगितले.

# राष्ट्रीय पोषण अभियानात हिंगोली जिल्हा राज्यात पहिला

■ महासागर प्रतिनिधी,
**हिंगोली , दि. ८ :** राज्यात राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत हिंगोली जिल्हयाने ११९७ अंगणवाड्यांमधून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून तब्बल १८ लाख नोंदी घेत राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. भंडारा जिल्हा दुसऱ्या तर अमरावती जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.



राज्यात महिला बाल कल्याण विभागाच्या वतीने अंगणवाड्यांमधून सप्टेंबर महिन्यात पोषण माह राबविण्यात आला. यामध्ये १ लाख अंगणवाड्यांमधून विविध उपक्रम राबवून त्याच्या नोंदी घेण्याच्या सुचना आयुक्त कार्यालयाने दिल्या होत्या. या उपक्रमात अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्य सोबतच गरोदर व स्तनदामातांसाठी मार्गदर्शन उपक्रमांचा समावेश होता.

दरम्यान, हिंगोली जिल्हयात जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यकार्यकारी अधिकारी गणेश वाघ तसेच बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी यांनी सहा प्रकल्पांमधील अंगणवाड्यांमधून उपक्रम राबविण्यास सुरवात केली आहे.

महिला बाल कल्याण विभागाच्या आयुक्त कार्यालयाने ठरवून दिलेल्या उपक्रमांसोबतच इतर नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. या उपक्रमांची माहिती व छायाचित्र देखील ऑनलाईन अपलोड केले जात आहे. हिंगोली जिल्हयातील ११९७ अंगणवाड्यामधून १८ लाख ऑनलाईन नोंदी घेण्यात आल्या आहेत.

राज्यात सर्वात जास्त उपक्रम व नोंदी घेत हिंगोली जिल्ह्याने राज्यात पहिला क्रमांक मिळविला आहे. तर भंडारा जिल्ह्यातील १४९७ अंगणवाड्यांतून ९.७५ लाख नोंदी घेण्यात आल्या असून या जिल्हयाने दुसरा तर अमरावती जिल्हयातील ३१८९ अंगणवाड्यांतून २० लाख नोंदी घेतल्या गेल्या असून त्यांची दररोजच्या नोंदीची सरासरी कमी आल्यामुळे त्यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे.

# आपली बस चालकांचा संप सुरूच; निम्म्या बस रस्त्यावर, प्रवाशांना मोठा फटका



**नागपूर :** आपली बस चालकांचा संप अद्यापही सुरुच आहे. त्यामुळे केवळ पावणेदोनशे बस रस्त्यांवर धावल्या. रविवारीही क्षमतेपेक्षा निम्म्या बस सुरू असल्याने देवी दर्शनासाठी जाणाऱ्या नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. अनेक बस स्थानकांवर आपली बसच्या प्रतीक्षेत नागरिकांची गर्दी दिसून आली.ऐन नवरात्रोत्सवात आपली बस चालक, वाहकांच्या संपावर आतापर्यंत तोडगा न निघाल्याने जवळपास सव्वालाख नागपूरकर प्रवाशांना पुढील काही दिवस मनस्ताप सहन करावा लागणार आहे. दरम्यान, सोमवारी कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना आयुक्तांनी चर्चेसाठी बोलावले आहे.

# विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून दिला स्त्री सुरक्षा, व्यसनमुक्तीचा संदेश

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ८:** महिलांच्या संबंधातील विविध प्रश्नांवर समाजात जनजागृती करण्यासाठी तसेच व्यसनांमुळे होणारे सामाजिक, वैयक्तिक व कुटुंबावर होणारे दुष्परिणाम याबाबत बडनेरा येथील समाजकार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्तमसरा येथे पथनाट्यातून स्त्री सुरक्षा व व्यसनमुक्तीचा संदेश दिला.



समाजात दिवसेंदिवस युवती व महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटना पाहता त्यांना घरातून बाहेर पडणेही कठीण होत आहे. समाजासाठी ही बाब चिंताजनक आहे. युवती व महिलांनाही घरातून बाहेर पडून त्यांना स्वतंत्रपणे व भयमुक्त वातावरणात जगता यावे, यासाठी स्त्री सुरक्षा महत्त्वाची आहे. यासोबतच वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक प्रगती साधण्यासाठी समाज हा व्यसनमुक्त असणे गरजेचे आहे. या बाबीवर समाजकार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून प्रकाश टाकत समाजाला स्त्री सुरक्षा व व्यसनमुक्तीचा संदेश दिला.

एमएसडब्ल्यू अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षाच्या दीपक मालविय, संकेत राठोड, आकाश गादे, ऋषिकेश गावंडे, पल्लवी शापामोहन, सुमती मकेश्वर, मोनिका ईसाने या विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून तर उत्तमसरा येथील जि. प. प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी रॅली काढून व्यसनमुक्ती व स्त्री सुरक्षा या विषयावर जनजागृती केली.

या वेळी जि. प. प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी इंगळे, शिक्षक राजेश सावरकर, गजानन येलोने, सुनीता अकर्ते, प्रमोद काबंळे, एकता शेवतकर, प्राजक्ता वऱ्हेकर, जि. प. हायस्कूलचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर, संतोष कुऱ्हेकर आदींसह शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.


**जाहीर सुचना**

**कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक यांच्या न्यायालयातील**
**एम.जे.सी. नं. ३९/२०२४**
**पेशी ता.११.११.२०२४**
**प्रोसेस नं २५३७ दि.०७/१०/२४**

अर्जदार – १) वैशाली भिमराज घरजाळे वय ३८
२) वैष्णवी भिमराज घरजाळे वय १७
३) श्रूतीका भिमराज घरजाळे वय १४
०२ व ०३ त्यांचा आई तर्फे सर्व राह – स्वामी विवेकानंद वार्ड, रामटेक तह-रामटेक जि. नागपूर.
-- विरुध्द --
प्रतिवादी : कोणीही नाही
मयतदार : भिमराज रामचंद्र घरजाळे,
मृत्यू दिनांक ०१.०९.२०२४ रा. स्वामी विवेकानंद वार्ड रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर

सदरहू अर्जदाराने नियम २ प्रकरण १ मुंबई विनीमयम अधिनियम १८२७ अंतर्गत या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने मयतदार भिमराज रामचंद्र घरजाळे मृत्यू दिनांक ०१.०९.२०२४ यांचे वरील नमूद वारस क. १ ते ३ यांच्या कायदेशीर वारस असल्याबाबत वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख ११.११.२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर मयतदाराच्या कायदेशीर वारसान प्रमाणपत्र बाबत जर कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारेखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ०५/१०/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
रामटेक



**-: जाहिरनामा :-**

**कोर्ट विद्यमान सुनिल साळवे नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपुर शहर, यांचे कार्यालय, जिल्हा नागपूर.**
Email: www.tahsildarngpcity@gmail.
Ph No. 0712-2561975
क.ली/प्रस्तु-२/तह.नाग (शहर)/प्र.क्र-७५/कावि -/२०२४
दि.:३०/०९/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५ /२०२३ दिनांक १५.१०.२०२३ ५) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका /डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि १५८/२०२४ दिनांक ११.०५.२०२४ ६) श्री रमेश कुमार s/o दिलीप सिंग वय ६० वर्ष रा. नियर गईमेंट इन्टर कॉलेज, सौरा सारोली, सोडासारोली देहरादून उत्तराखंड यांचा अर्ज दिनांक ११/०७/२०२४

ज्याअर्थी अर्जदार श्री रमेश कुमार s/o दिलीप सिंग वय, ६० वर्ष रा. नियर गर्व्हमेंट इन्टर कॉलेज, सौर्य सारोली, सोडासारोली देहरादुन उत्तराखंड यांनी त्यांचे जावाई यांचा मृत्युची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू नामे श्री प्रदीप धीमान s/o ओमप्रकाश धीमान ह्याचा मृत्यु दिनांक ०६/०१/२०१४ रोजी क्वार्टर नं ४६ सीआरपीएफ कैम्प नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,(शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २,३,४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्यू बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्यूबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यू नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

सुनिल साळवे
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर



**निविदा सूचना**


सर्व संबंधितांना याद्वारे सूचित करण्यात येते की, नगर परिषद नरखेड अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी) 2.0 अंतर्गत SWM DPR घटकातून ऑफलाईन निविदा व नागरी दालीतेत्तर वस्ती सुधार योजना 2024-25 अंतर्गत निधीतून ऑनलाईन निविदा नगर परिषद कार्यालय व जवाहर वाचनालय नोटीस बोर्ड वर प्रसिद्ध करण्यात येत आहे. ऑफलाईन निविदेसंबंधित सर्व दस्तावेज नगर परिषद कार्यालयात पाहवयास उपलब्ध आहे. ऑनलाइन निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in या पोर्टल वर प्रसिद्ध करण्यात येत आहे. अधिक माहिती करिता टोल फ्री मदत क्र. 18002337698 यावर संपर्क साधा.

| | |
|---|---|
| ऑनलाइन व ऑफलाईन निविदा प्रसिद्धी दिनांक व वेळ | दि. 09 ऑक्टोबर 2024 वेळ : स. 10:00 वा. पासून |
| ऑनलाइन व ऑफलाईन निविदा सादर करण्याचा अंतिम मुदत | दि. 16 ऑक्टोबर 2024 वेळ : साय. 5:00 पर्यंत |
| ऑनलाइन व ऑफलाईन निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | दि. 17 ऑक्टोबर 2024 वेळ : साय. 5:00 वाजता |

मुख्याधिकारी
नगर परिषद नरखेड


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# ... तर गमवावी लागेल नोकरी



विवाहबाह्य संबंध ठेवल्यास नोकरी गमवावी लागू शकते. कंपनीने नऊ जूनपासून कर्मचाऱ्यांसाठी हा विचित्र नियम लागू केला. कंपनीतील सर्वमहिला आणि पुरुष कर्मचाऱ्यांसाठी हा आदेश जारी करण्यात आला आहे. पत्नीने पतीला धोका दिल्यास तिलाही कंपनीकडून नारळ देण्यात येतो.

एखाद्या कंपनीमध्ये नोकरी करताना तेथील नियम पाळावे लागतात. सर्व कंपन्यांमध्ये सर्वसाधारणपणे सारख्या सोयीसुविधाही देण्यात येतात. कंपनीचे नियम काटेकोरपणे पाळावे लागतात. अन्यथा, दंड भरावा लागतो. नोकरी जाण्याचा धोकाही असतो. कोणत्याही कंपनीत रुजू होताना आपल्याला या नियमांची माहिती दिली जाते. दरम्यान, काही कंपन्यांकडून काही विचित्र नियम लागू करण्यात येतात. अशाच एका कंपनीच्या नियमानुसार कर्मचाऱ्याचे विवाहबाह्य संबंध आढळल्यास नोकरीवरून काढून टाकले जाते.

कर्मचाऱ्याचे विवाहबाह्य संबंध असतील तर पत्नीला धोका देणाऱ्या कर्मचाऱ्याला या कंपनीत कामावरून हटवण्यात येते. विवाहबाह्य संबंध रोखण्यासाठी कंपनीने हा विचित्र नियम लागू केला आहे. पतीने पत्नीशी एकनिष्ठ राहावे, असा या मागचा हेतू आहे. 'साऊथ चायना मॉर्निंग पोस्ट'ने म्हटलेआहे की या चिनी कंपनीने कोणत्याही कर्मचाऱ्याने

कंपनीच्या म्हणण्यानुसार, विवाहबाह्य संबंधांवर बंदी घालण्याचा नियम संस्थेचे अंतर्गत व्यवस्थापन मजबूत करण्यासाठी करण्यात आला आहे. कंपनीच्या मते, कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये कंपनीशी एकनिष्ठ रहावे लागते.

कंपनी आणि कुटुंबाच्या सुरक्षिततेचा विचार करणे महत्त्वाचे आहे या कंपनीने घटस्फोटालाही मनाई केली आहे. कंपनीच्या कर्मचाऱ्यांसह 'सोशल मीडिया'वर याबाबत संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. 'साऊथ चायना पोस्ट'च्या रिपोर्टनुसार, कंपनीने एका वरिष्ठ कार्यकारी अधिकाऱ्याला कामावरून हटवले आहे. हा कर्मचारी एका महिलेसोबत हातात हात घालून फिरताना दिसला. ही महिला त्याची पत्नी नव्हती. या दोघांचे फोटो व्हायरल झाल्यानंतर कंपनीने ही कारवाई केली आहे.

# कॅलिडोस्कोप

# एक किलो चहाची किंमत कोटीत!



ब्रिटिश वनस्पतीशास्त्रज्ञ रॉबर्ट फॉर्च्यून माउंट वुईवर गुप्त मोहिमेवर गेले. तेथून त्यांनी हा चहा भारतात आणला.

आपल्या देशात चहाप्रेमींची काही कमी नाही. गरमागरम चहा प्यायल्याशिवाय तर अनेकांच्या दिवसाची सुरुवात होत नाही. भारतात चहाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. हा चहा विदेशातही निर्यात केला जाते. साधारणपणे एक किलो चहाची किंमत ४०० ते ५०० रुपये असते; पण हाच चहा कोट्यवधींना मिळत असेल तर...

जगातील सर्वात महागड्या चहाची किंमत प्रति किलोसुमारे दहा लाख डॉलर आहे. भारतीय रुपयामध्ये याची किंमत सुमारे सात कोटी रुपयांपेक्षा जास्त होते. जगातील सर्वात महागडा चहा चीनमध्ये सापडतो. हा चहा अतिशय दुर्मीळ वनस्पतीपासून तयार केला जातो. त्यामुळे या चहाची किंमत जास्त आहे. चीनमधील फुजियान प्रांतामधील वुई पर्वतांवर या चहाची पाने आढळतात. २००५ मध्ये या चहाची कापणी करण्यात आली होती. जगातील या सर्वात महागड्या चहाचे नाव 'दा हाँग पाओ' आहे. या काही ग्रॅम चहाची किंमत सोन्याच्या किंमतीपेक्षाही जास्त आहे. २००२ मध्ये २० ग्रॅम चहा १८०,००० युआन म्हणजेच २८ हजार डॉलरला विकला गेला. भारतीय चलनामध्ये याची किंमत सुमारे २३ लाख रुपये होते.

अतिशय दुर्लभ असल्यामुळे चीनने हा चहा राष्ट्रीय खजाना म्हणून घोषित केला आहे. 'दा हाँग पाओ' चहाची लागवड चीनच्या मिंग राजवंशाच्या काळात सुरू झाली. हा चहा अतिशय खास आहे. चीन कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष माओ यांनी १९७२ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांना चीनच्या अधिकृत भेटी दरम्यान २०० ग्रॅम 'दा हाँग पाओ' चहा भेट म्हणून दिला होता. १८४९ मध्ये

जगातील सर्वात महागडा चहा 'दा हाँग पाओ' बाजारात मिळत नाही. हा चहा फक्त लिलावाद्वारे विकत घेता येतो. कारण तो अतिशय दुर्मीळ आहे. हा चहा एका दशकापूर्वी चीनच्या सिचुआनच्या याआन पर्वतांमध्ये एक उद्योजक आणि काही व्यक्तींनी मिळून पहिल्यांदा पिकवला होता. या चहाची ५० ग्रॅमची पहिली बॅच ३,५०० डॉलर म्हणजेच सुमारे तीन लाख रुपयांना विकली गेली. यामुळे त्याला जगातील सर्वात महागहा चहा म्हटले जाते. चिनी लोकांचा शिवास आहे की, त्या वेळी मिंग राजवटीची राणी अचानक आजारी पडली होती. तब्येत बिघडल्यामुळे त्यांना हा चहा पिण्याचा सल्ला देण्यात आला. हा चहा प्यायल्यानंतर राणी पूर्णपणे बरी झाली. यानंतर राजाने संपूर्ण राज्यात या चहाची लागवड करण्याचा आदेश दिला होता. मिंग राजाच्या लांब झग्यावरून या चहाच्या पानाला 'दा-होंग पाओ' असे नाव पडले.

# ३८ कोटींची लॉटरी लागली; पण पैसे घ्यायलाच येईना!



बहुतेकजण मेहनत करून स्वत:चे भविष्य बनवतात तर काहीजण नशिबावर विश्वास ठेवतात. काहीजण एका रात्रीत नशीब पालटेल, या उद्देशाने लॉटरी खरेदी करतात. एक दिवस आपल्याला नशिबाची साथ मिळेल आणि आपण श्रीमंत होऊ असे स्वप्न तेपाहतात. काहींचे हे स्वप्न आयुष्यभर स्वप्न राहते, तर काही मोजक्याच जणांचे हे स्वप्न सत्यात उतरते. अशाच एका व्यक्तीला ३८ कोटी रुपयांची लॉटरी लागली; पण बक्षिस घेण्यासाठी ती पुढेच आली नाही!

ब्रिटनमधील एका भाग्यवान व्यक्तीला ही ३८ कोटी रुपयांची लॉटरी लागली. ब्रिटन सरकारच्या राष्ट्रीय लॉटरीने 'सेट फॉर लाईफ लॉटरी' खेळणाऱ्या ग्राहकांना आवाहन केले की आपापली लॉटरीची तिकिटे नीट तपासून लॉटरी लागली आहेका, याची खात्री करून घ्यावी. ब्रिटन सरकार समर्थित राष्ट्रीय लॉटरीचा लकी ड्रॉ एका भाग्यवान व्यक्तीला लागला आहे. 'सेट फॉर लाईफ ड्रॉ' ही लॉटरी जिंकणाऱ्या भाग्यवान व्यक्तीला दरमहा १० हजार पाऊंड म्हणजे सुमारे ११ लाख रुपये दिले जातील. ही लॉटरी जिंकणाऱ्या व्यक्तीला पुढील ३० वर्षे दर महिन्याला ही रक्कम दिली जाईल; पण आतापर्यंत 'सेट फॉर लाईफ लॉटरी'चा भाग्यवान विजेता सापडलेला नाही. त्यामुळे सरकारने ही लॉटरी खरेदी करणाऱ्या ग्राहकांना तिकीट तपासण्यास सांगितले आहे.

दरम्यान, या व्यक्तीकडे डिसेंबर २०२३ पर्यंतचा वेळ आहे. या वर्षाच्या डिसेंबरपर्यंत हा भाग्यवान विजेता त्याची बक्षिसाची मालकी घेऊ शकतो. भाग्यवान विजयी तिकीट ब्रिटनमधील दक्षिण हॉलंड येथून विकत घेतले होते, अशी माहिती ब्रिटनच्या 'द मेट्रो न्यूज वेबसाइट' ने दिली आहे. या माहितीनुसार, या तिकिटाच्या बक्षिसावर दावा करण्यासाठी भाग्यवान विजेत्याकडे २ डिसेंबर २०२३ पर्यंत वेळ आहे.

५ जून रोजी या विजेत्याला ३८ कोटींची लॉटरी लागली; पण भाग्यवान विजेता अद्याप न सापडल्यामुळे शोध सुरू आहे. लॉटरी कंपनीने याबाबत माहिती देताना सांगितले आहे की ते या भाग्यवान रहस्यमय माणसाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# एक कोटी पगार तरी नोकरीसाठी कुणीच नाही तयार!



फक्त लाईट बल्ब बदलण्यासाठी एक कोटी रुपये पगार मिळणार... करणार का नोकरी? ही ऑफर ऐकून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला; पण सध्या अशीच 'जॉब ऑफर सोशल मीडिया'वर चर्चेत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, लोक ही ऑफर ऐकून फक्त आश्चर्य व्यक्त करतात. एवढा भरघोस पगार मिळूनही या नोकरीसाठी कोणीच तयार होताना दिसत नाही.

कारणही तसेच आहे. या व्यक्तिकडे लाईट बल्ब बदलणे एवढेच काम आहे, हे अगदी खरे आहे; पण हा लाईट बल्ब बदलण्यासाठी तब्बल ६०० मीटर उंचीच्या टॉवरवर चढावे लागणार आहे. काम क्षुल्लक वाटले, तरी धोक्याचे असल्यामुळे कोणीच ही नोकरी स्विकारण्यास तयार नाही. 'सोशल मीडिया'वर व्हायरल झालेल्या जाहिरातीनुसार, ही नोकरी टॉवर लँटर्न चेंजरची आहे. हे काम अमेरिकेतील साऊथ डकोटा येथे आहे. ही नोकरी स्विकारणाऱ्याला तब्बल ६०० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या सिग्नल टॉवरवर चढून त्याचा बल्ब बदलावा लागेल. हा टॉवर सामान्य टॉवरपेक्षा थोडा वेगळा आहे. जसजसे वर जातो, तसतशी त्याची रुंदी कमी होत जाते. त्यांच्या माथ्यावर पोहोचणे आणि बल्ब बदलण्यासाठी तिथे उभे राहणे हे खरेच अत्यंत कठीण काम आहे.

वर चढण्यासाठी सुरक्षितता म्हणून फक्त दोरीचा म्हणजेच, सेफ्टी केबल्बचा वापर केला जातो. 'मिरर यूके'ने दिलेल्या वृत्तानुसार, या नोकरीची सर्वात आवश्यक अट म्हणजे अर्जदाराला उंचीची भीती वाटू नये. तो शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असावा. एक वर्षापेक्षा कमी अनुभव असलेल्या व्यक्तीही या नोकरीसाठी अर्ज करू शकतात. वेतन अनुभवावर आधारित असेल; पण सुरुवातीचे उत्पन्नदेखील कोणत्याही सामान्य व्यक्तीपेक्षा नक्कीच खूप जास्त असेल. जमिनीपासून ६०० मीटरवर उंच असलेल्या टॉवरच्या माथ्यावर चढण्यासाठी सुमारे तीन तास लागतात, असे सांगितले जात आहे. हे काम करण्यासाठी चढायला तीन तास आणि उतरायलाही तेवढाच वेळ लागेल. म्हणजे काम सहा-सात तासांचे असेल. याशिवाय टॉवरच्या वरच्या बाजूला शंभर किलोमीटर तास वेगाने वारे वाहत असतात. त्यामुळे टॉवरवर चढणे आणखी आव्हानात्मक होते. हे काम करणाऱ्या व्यक्तीला एक लाख पौंड (सुमारे १ कोटी रुपये) वार्षिक पॅकेज मिळेल.

# चांगल्या नोकऱ्या सोडून तरुण बनतात वेटर आणि सफाई कामगार!




अधिक पगारासह चांगल्या सुविधा देणारी नोकरी करणे हे तरुण-तरुणीचे स्वप्न असते. पैशांसोबतच तुम्हाला मान-सन्मान मिळेल अशी नोकरी मिळवण्यासाठी सर्वांची घडपड सुरू असते; मात्र चीनमधील तरुण चांगल्या पगाराची व्हाईट कॉलर नोकरी सोडून वेटर आणि सफाई कामगाराची नोकरी स्वीकारत आहेत. एवढेच नाही तर, ही नोकरी करत असताना खूश असल्याचे हे तरुण सांगत आहेत.

चीनमधील मोठा तरुण वर्ग एका हॅशटॅगशी जोडला गेला असून इन्स्टाग्रामवर पोस्ट करत आहे. चीनमधील तरुण या हॅशटॅगवर फोटो आणि व्हिडीओ पोस्ट करत आहेत. 'बिजनेस इनसाइडर'ने दिलेल्या माहितीनुसार, १२ जून पर्यंत या हॅशटॅगला तीन कोटी लोक जोडले गेले आहे. रिपोर्टनुसार एक वर्षापासून तरुणांमध्ये हा बदल दिसत आहे. या ट्रेंडच्या मागे एक जुनी कथा आहे. या कथेनुसार कॉन्ग यिजी नावाच्या व्यक्तीने पदवी घेतली. पदवी घेतल्यानंतरदेखील त्याच्याकडे व्यावहारिक ज्ञान नसते; मात्र पदवी आणि पदवीनंतर त्याला मिळालेला गाऊन यामुळे कॉन्ग यिजीला खूप सन्मान मिळतो. त्यामुळे यिजी रोज हा गाऊन घालून फिरत असे. त्याने कधीच तो गाऊन काढला नाही. आजही जगभरातील विद्यापीठामध्ये पदवीप्रदान सोहळ्यात गाऊन घातला जातो. या ट्रेंडला संपवण्यासाठी आणि कॉन्ग यिजीचा गाऊन उतरवण्यासाठीदेखील हा ट्रेंड सुरू करण्यात आल्याचे म्हटले जाते. या ट्रेंडनुसार तरुण व्हाईट कॉलर जॉब म्हणजे जी नोकरी हुशार, इंटेलेक्च्युअल लोकांसाठी असते. ती नोकरी सोडून जिथे डिग्रीची गरज नसते, अशी नोकरी स्वीकारत आहे. इन्स्टाग्रामवरील एका पोस्टवर कॅप्शन लिहिले आहे, नोकरी सोडल्यानंतर तरुण फास्ट फूड रेस्टॉरंट सुरू करत आहे. सफाई कामगार बनत आहे, ज्या नोकरीमध्ये जास्त बुद्धीचा वापर केला आहे. असे करत तरुण आपले आयुष्य आपल्या पद्धतीनुसार जगण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे.'' तर दुसऱ्या महिलेने लिहिले आहे की, मी बाईट डान्समध्यो नोकरी करत होते; परंतु ही नोकरी आता मी सोडली आहे. कंपनी सोडल्यानंतर मी खूश आहे. आता मला महिन्याच्या रिपोर्टसची चिंता करण्याची गरज नाही. मी फक्त माझ्या फास्ट फूड रेस्टॉरंटमध्ये जेवण बनवते आणि विकते. तिने तिच्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, ती तिच्या रेस्टॉरंटमध्ये दररोज १४० डॉलर्स म्हणजेच सुमारे ११,००० रुपये कमवते. कामामुळे माझे शरीर थकते; परंतु मी आनंदी आहे. दुसऱ्या एका महिलेने लिहिले की, मी माझी उच्च पगाराची सल्लागाराची नोकरी सोडली. नोकरीसोबतच इमेल, मुलाखती आणि पीपीटीच्या मागे धावणे हा सर्व ताण गेला आहे. आता मी एका कॉफी शॉपमध्ये काम करते, जिथे मला अगोदरच्या नोकरीपेक्षा कितीतरी पट कमी पगार मिळतो; परंतु अगोदरच्या नोकरीपेक्षा मी आता जास्त आनंदी आहे.

# व्यवसाय शैलीदार स्वाक्षऱ्यांचा

याजगात अर्थार्जनाचे अनेक मार्ग आहेत. फक्त आपल्याकडे चांगली संकल्पना असणं गरजेचं असतं. आपल्या डोक्यातली कल्पना विकण्याचं तंत्र अवगत व्हायला हवं. सध्या विविध ऑनलाईन व्यवसायांना प्रचंड वाव आहे. इंस्टाग्राम, फेसबुकसारख्या ऑनलाईन माध्यमांवर विविध फोटो अपलोड करून उत्पन्न मिळवता येतं. रशियातल्या एका विद्यार्थ्याने इंस्टाग्रामवर डिझायनर म्हणजे विशिष्ट शैलीत सही करून देण्याचा व्यवसाय सुरू केला. यातून त्याने पाच महिन्यात ३०,५०० डॉलर्स म्हणजे २२ लाख रुपये उत्पन्न मिळवलं. आपली स्वाक्षरी शैलीदार असावी, अशी अनेकांची इच्छा असते. स्वाक्षरीद्वारे आपली छाप पाडता येते. पण अशी स्टायलिश स्वाक्षरी प्रत्येकाला जमतेच असं नाही. इवान कुजिन या रशियन विद्यार्थ्याची स्वाक्षरीही सर्वसाधारण म्हणावी अशीच होती. पासपोर्ट तयार करण्यापूर्वी इवानला स्वाक्षरी बदलायची होती. यासाठी त्याने मैत्रीण अनास्तासिया डोरची मदत घ्यायचं ठरवलं. तिला कॅलिग्राफीचं ज्ञान होतं.



तिने आपल्या या मित्राची खास स्वाक्षरी तयार केली. या स्वाक्षरीचा सरावही करून घेतला. इथूनच इवानच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. अशा प्रकारे त्याने डिझायनर स्वाक्षऱ्यांचा ऑनलाईन व्यवसाय करायचं ठरवलं. यासाठी त्याने राइट टाईट नावाने इंस्टाग्राम हँडल तयार केलं. यात त्याने अनास्तासियालाही सहभागी करून घेतलं. व्यवसायाच्या प्रसिद्धीसाठी त्याने १५ हजार रुबल म्हणजे १६ हजार रुपये खर्च केले. हँडल सुरू केल्यानंतर बारा तासांच्या आत त्याला पहिलं काम मिळालं.

# आगळी ग्रीनरुफ बस

सध्या इंधन बचतीसाठी वेगवेगळ्या कल्पना लढवल्या जात आहेत. प्रदूषण कमी करण्यासाठी बरेच प्रयत्न होत आहेत. झाडं लावण्याची, हिरवे पट्टे निर्माण करण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे. मात्र ही झाडं फक्त जमिनीवर किंवा घराच्या गच्चीवरच लावता येतात असं नाही. सार्वजनिक बसच्या टपांवरही बाग फुलवता येते. वाचून थोडं आश्चर्य वाटलं असलं तरी सिंगापूरमध्ये हा प्रयोग करण्यात आला आहे. इथे आशिया खंडातली पहिली ग्रीन रूफटॉप असणारी बस सुरू झाली आहे. 'गार्डन ऑन द मूव्ह' या अभियानाअंतर्गत ही बससेवा सुरू करण्यात आली आहे. या बसच्या टपावर १.८ गुणिले १.५ मीटर आकाराचे दोन ग्रीन पॅनल बसवण्यात आले आहेत. माती भरलेल्या ग्रीन पॅनलचं वजन २५० ते ३०० किलोपर्यंत असतं.




मात्र या बसेसवरच्या ग्रीन पॅनलमध्ये मातीऐवजी कार्बन फायबरचा वापर करण्यात आला आहे. यामुळे या पॅनलचं वजन फक्त ४० किलो भरतं. या झाडांना जास्त पाणी द्यावं लागत नाही. वर्षातून दोन किंवा तीन वेळा देखरेखीची गरज भासते. ग्रीनरूफ बसेसमध्ये एसी लावावा लागत नाही. यामुळे २० टक्के इंधनाची बचत होते. सध्या इथल्या चार मार्गांवर दहा ग्रीन रूफ बस चालवल्या जात असून काही चाचण्यानंतर ४०० ग्रीन बसेस तयार केल्या जातील. बसच्या टपावर आणि आतमध्ये सेन्सर्स बसवण्यात आले आहेत.

# असा आहे फॉरबिडन ग्रह

खगोलशास्त्रज्ञांनी अवकाशात नव्या एक्सोप्लॅनेटचा शोध लावला आहे. सूर्यऐवजी इतर ताऱ्यांभोवती फिरत असल्यामुळे त्यांना एक्सोप्लॅनेट असं म्हटलं जातं. काही खास वैशिष्ट्यांमुळे याला



फॉरबिडन प्लॅनेट असं नाव देण्यात आलं आहे. एनजीटीएस-४ बी असं या ग्रहाचं शास्त्रीय नाव आहे. या ग्रहावरचं वातावरण खूप उष्ण असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. सूर्याच्या अगदी जवळ असणाऱ्या बुध ग्रहापेक्षाही फॉरबिडन प्लॅनेटचं तापमान अधिक आहे. मंथली नोटिसेस ऑफ रॉयल अॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटी नावाच्या जर्नलमध्ये हा शोध प्रकाशित करण्यात आला आहे. हा ग्रह अवकाशातल्या नेपच्युनिअन डेझर्ट नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागात सापडला आहे. या भागात उष्णता आणि किरणोत्सर्गाचं प्रमाण बरंच जास्त असतं.

# मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत २ हजार ३० सदनिकांची मान्यवरांच्या हस्ते ऑनलाइन सोडत

## मुंबईकरांचे स्वतःचे घराचे स्वप्न म्हाडाच्या माध्यमातून साकार

मुंबई प्रतिनिधी : ०८ ऑक्टोबर : स्वप्न पूर्ण करणारे शहर म्हणून ओळख असलेल्या मुंबईत आपल्या हक्काचे घर असावे असे सर्वसामान्य नागरिकांचे स्वप्न असते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्य शासन म्हाडाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करीत असते. मुंबईकरांचे स्वतःचे घराचे स्वप्न म्हाडाच्या माध्यमातून साकार होत आहे याचा मला आनंद आहे, असे प्रतिपादन गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी केले.

म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे मुंबईतील विविध गृहनिर्माण योजनांतर्गत उभारण्यात आलेल्या २ हजार ३० सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत आज यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे काढण्यात आली.

यावेळी मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर-सिंह, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात राज्य गीताने करून मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

मंत्री अतुल सावे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे प्रत्येकाला घर देण्याचे स्वप्न आहे. सर्वांसाठी घरे हे स्वप्न साकार होण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजना सुरू केल्या आहेत. या माध्यमातून अल्प, मध्यम उत्पन्न गटातील सर्वसामान्यांना घरे वाटप करण्यात येत आहेत. राज्यात साडे सात लाख घरे बांधण्यात आली असून यातली अडीच लाख घर ही मुंबईमध्ये बांधली गेली आहेत. आजच्या या लॉटरी साठी २ हजार ३० घरांसाठी १ लाख १३ हजार पेक्षा जास्त अर्ज आले होते. आजची ही सोडत मानवी हस्तक्षेपविरहित संपूर्णता ऑनलाइन अशा २.० या संगणकीय प्रणालीद्वारे प्रक्रिया राबविण्यात आली आहे. नाशिक, पुणे, कोकण, छत्रपती संभाजीनगर, नागपूर या शहरात ही पारदर्शकपणे लॉटरी प्रक्रियेमार्फत लोकांना घर मिळाली आहेत. मुंबई शहर आणि परिसराचा झपाट्याने विकास होत आहे. त्यामुळे घरांची मागणी ही वाढत आहे. मुंबईत ही दुसरी सोडत असून लवकरच आणखी घरांची सोडत होईल. अभ्युदय नगर, कामाठीपुरा, शहरातील जुन्या वस्त्या येथील पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागत आहे. राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच आणले जाणार असून गृहनिर्माण धोरणामध्ये परवडणाऱ्या व टिकाऊ घरांवर भर दिला जाणारअसल्याचे मंत्री सावे यांनी यावेळी सांगितले.

# भाजपचे आणखी एक आमदार शरद पवारांच्या गळाला



■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ८ :** बीडच्या गेवराईचे भाजप आमदार लक्ष्मण पवार लवकरच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे.

पवार यांनी काही दिवसांपूर्वी कमळाचे देठ खुडून निवडणूक लढणार नाही, असे विधान केले होते. पण त्यानंतर आता त्यांच्या पोस्टर व बॅनरवरून भाजपचे नाव व चिन्ह गायब झाल्यामुळे ते पवार गटातील अशी चर्चा सुरू झाली आहे.

बीड लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचा विजय झाला होता. तेव्हापासून लक्ष्मण पवार यांची पाऊले शरद पवारांच्या पक्षाकडे वळल्याची माहिती आहे. सोमवारी ते मुंबईत पवार गटाच्या एका बड्या नेत्यासोबत दिसले. त्यामुळे ते लवकरच पवार गटात दिसतील असा दावा केला जात आहे.

लक्ष्मण पवार हे 2014 व 2019 च्या विधानसभा निवडणुकीत गेवराईतून विजयी झाले होते. ते लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांच्या प्रचारातही फारसे सक्रिय दिसले नाही. आता ते पवार गटात जात आहेत.

# मुख्यमंत्र्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे मंत्रिमंडळ बैठक रद्द

**मुंबई प्रतिनिधी : ०८ ऑक्टोबर :** सततचा प्रवास आणि दगदगीमुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती मंगळवारी बिघडली. हलका ताप, कामाचा ताण आणि रक्तदाबामुळे शिंदे यांना शारीरिक थकवा जाणवू लागल्यानंतर 'वर्षा'वर तातडीने डॉक्टरांच्या पथकाला पाचारण करण्यात आले. डॉक्टरांनी शिंदे यांना तपासल्यानंतर दगदगीमुळे त्रास उद्भवल्याचे निदान करत विश्रांतीचा सल्ला दिला. त्यामुळे आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीसह शिंदे यांचे दिवसभरातील कार्यक्रम रद्द करण्यात आले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल, सोमवारी नक्षलवादाला आळा घालण्यासाठी बोलावलेल्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी शिंदे दिल्लीला गेले होते. दिवसभर चाललेली बैठक आणि त्यानंतर अमित शहा यांच्यासोबतची राजकीय चर्चा यानंतर आज पहाटे शिंदे यांचे मुंबईत आगमन झाले. 'वर्षा'वर पोहचल्यानंतर एकनाथ शिंदे यांना तब्बेतीचा त्रास जाणवू लागला. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार शिंदे यांनी आज दिवसभर विश्रांती घेतली. मुख्यमंत्र्याना भेटण्यासाठी 'वर्षा'वर आमदार, पदाधिकारी आणि नागरिकांनी गर्दी केली होती. मात्र, यापैकी कुणालाही शिंदे यांना भेटू देण्यात आले नाही.

दरम्यान, मंत्रिमंडळ बैठकीसह एकनाथ शिंदे यांचे आज दिवसभराचे कार्यक्रम रद्द करण्यात आले. शिंदे यांच्या आजच्या यादीत म्हाडाच्या मुंबई मंडळासह विविध गृहप्रकल्पातील सदनिकांची वितरण सोडत, महिला सशक्तीकरण अभियानाच्या अंतर्गत सोलापूर दौरा, महाप्रीतच्या संचालक मंडळाची बैठक, राजभवन येथे मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुईझु यांच्या शिष्टमंडळासमवेत द्विपक्षीय बैठक तसेच स्नेहभोजन आणि रात्री कुर्ला विधानसभा क्षेत्रातील विविध विकासकामांचे भूमिपूजन, लोकार्पण असा भरगच्च कार्यक्रम होता.

# धनगर आरक्षणासाठी मंत्रालयात आंदोलन

मुंबई प्रतिनिधी : धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याच्या मागणीसाठी सकल धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी मंत्रालयात घुसून आंदोलन केले. या कार्यकर्त्यांनी मंत्रालयात सुरक्षेसाठी बांधलेल्या जाळीवर उड्या मारून आपल्या मागणीकडे लक्ष वेधले. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे पोलिसांची तारांबळ उडाली. पोलिसांनी जाळीवर उतरून आंदोलकांना बाहेर काढले. यावेळी आंदोलकांनी धनगर आरक्षणाचा शासन आदेश काढण्यासाठी जोरदार घोषणाबाजी केली.

धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. यासंदर्भात राज्य सरकारने सुधाकर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीने आपला अहवाल सरकारला सादर केला आहे. विधानसभा निवडणूक घोषित झाल्यास धनगर आरक्षणाचा निर्णय मागे पडण्याची शक्यता लक्षात घेऊन धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीचे निमित्त साधून आंदोलन छेडण्याचे ठरवले होते. मंत्रिमंडळ बैठक 'सह्याद्री' अतिथीगृह येथे होणार असल्याने कार्यकर्ते सुरुवातीला 'सह्याद्री'वर जाणार होते. मात्र, आजची मंत्रिमंडळ बैठक रद्द झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी आपला मोर्चाचे मंत्रालयात वळविला.

आज संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास सकल धनगर समाजाचे १५ कार्यकर्ते मंत्रालयाच्या तिसऱ्या मजल्यावर पोहचले. तेथून तीन कार्यकर्त्यांनी मंत्रालयातील सुरक्षा जाळीवर उड्या मारून घोषणाबाजी सुरु केली. तर उर्वरित कार्यकर्त्यांनी तिसऱ्या मजल्यावर घोषणा द्यायला सुरुवात केली.

# हरियाणा निकालाची महाराष्ट्रात पुनरावृत्ती !

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

मुंबई प्रतिनिधी : ०८ ऑक्टोबर : हरियाणाच्या जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत खोटा प्रचार करणाऱ्यांना नाकारले आहे. हरियाणातील जनतेने फेक नरेटिव्हच्या विरोधात मतदान केले. त्यामुळे हरियाणात जे घडले तेच नोव्हेंबर महिन्यात महाराष्ट्रात घडेल, असा विश्वास भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी येथे व्यक्त केला. हरियाणा विधानसभेचा निकाल हा भाजपच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढवणारा आणि मुर्खांच्या नंदवनात वावरणाऱ्यांना जमिनीवर आणणारा असल्याचेही त्यांनी सांगितले.

हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपने संपादन केलेल्या नेत्रदीपक विजयाचा जल्लोष आज प्रदेश भाजपच्या वतीने करण्यात आला.


# THE CHANDRAPUR DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK Ltd., CHANDRAPUR

HEAD OFFICE, CIVIL LINES, CHANDRAPUR PHONE NO.07172-252180, 254253

## TENDER NOTICE

Sealed tenders are invited on 'percentage base rate' from the approved and eligible contractors Registered in appropriate class with ZP, PWD and Govt. of Maharashtra and the state Government/ Central Govt. for following works.

| Sr.No. | Name of the Work | Estimated Cost (Rs.) | EMD (Rs.) | Time for Completion |
|---|---|---|---|---|
| 1 | Strong Room Repairing works of C.D.C.C.Bank, Head Office, Chandrapur | 1243981 | 12440 | 4 Months |
| 2 | Providing & Erecting Parking Shed C.D.C.C.Bank, Head Office, Chandrapur | 328916 | 3289 | 1 Month |

**Terms and Conditions :-**

1) Cost of Blank Tender from - Rs.500/- (Non Refundable)
2) Blank Tender forms will be issued - From Dt. 09.10.2024 to 16.10.2024 During Working hours.
3) Earnest Money may Be deposited by Cash or DD in favour of 'The Chandrapur District Central Co-operative Bank Ltd., Chandrapur'
4) Duly filled tender forms will be accepted up to 03.00 PM on dated 17-10.2024
5) Right to accept or reject any or all tenders without assigning any reason is reserved by Bank.

Place - Chandrapur Date 08.10.2024

Sd/-
**Chief Executive Officer**





श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री

सत्यमेव जयते
भारत सरकार

महाराष्ट्र शासन
ऊर्जा विभाग

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित



श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री

RDSS व AIIB निधीतून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत विदर्भ व मराठवाड्यातील पायाभूत विद्युत सुविधा सक्षमीकरण व विस्तारीकरणाच्या १७३४ कोटींच्या कामाचा शुभारंभ

नागपूर जिल्ह्यातील विद्युत यंत्रणा बळकटीकरणासाठी ३१३ कोटींच्या कामाचे ई-भूमिपूजन

पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील दुसरे सौरग्राम मौजे टेकवडी जि.पुणे चे लोकार्पण

पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजने अंतर्गत विदर्भातील लाभार्थ्यांचा सन्मान

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत विदर्भातील शेतकऱ्यांचा सन्मान

प्रमुख अतिथी
मा.ना.श्री. नितीन गडकरी
केंद्रीय मंत्री, रस्ते परिवहन आणि राज्यमार्ग, पोत परिवहन, जलसंसाधन, नदी विकास आणि गंगा संरक्षण

शुभहस्ते
मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री, नागपूर जिल्हा

विशेष उपस्थिती

मा. श्री. श्यामकुमार बर्वे – लोकसभा सदस्य
मा. श्री. प्रविण दटके – विधान परिषद सदस्य
मा. श्री. अभिजीत वंजारी – विधान परिषद सदस्य
मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे – विधान परिषद सदस्य
मा. श्री. सुधाकर अडबाले – विधान परिषद सदस्य
मा. डॉ. परिणय फुके – विधान परिषद सदस्य
मा. श्री. कृपाल तुमाने – विधान परिषद सदस्य
मा. श्री. अनिल देशमुख – विधानसभा सदस्य
मा. डॉ. नितीन राऊत – विधानसभा सदस्य
मा. श्री. कृष्णा खोपडे – विधानसभा सदस्य
मा. श्री. विकास कुंभारे – विधानसभा सदस्य
मा. श्री. मोहन मते – विधानसभा सदस्य
मा. श्री. विकास ठाकरे – विधानसभा सदस्य
मा. श्री. समिर मेघे – विधानसभा सदस्य
मा. ॲड. आशिष जयस्वाल – विधानसभा सदस्य
मा. श्री. टेकचंद सावरकर – विधानसभा सदस्य
मा. सौ. मुक्ताताई कोकड्डे – अध्यक्षा, जिल्हा परिषद नागपूर

बुधवार दि. ०९ ऑक्टोबर २०२४, दुपारी ३.०० वा.
स्थळ- वनामती सभागृह, व्ही.आय.पी. रोड, गोरेपेठ, नागपूर







देवेंद्र फडणवीस – उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे – मुख्यमंत्री
अजित पवार – उपमुख्यमंत्री

# महासागर वृत्तसागर

नागपूर

■ बुधवार, दि. ९ ऑक्टोबर २०२४ ■


## राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांचा जोगदंड यांच्याशी संवाद

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :**
डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील विद्यार्थी संवाद या उपक्रमाचे आयोजन राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विद्या चौरपगार यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. या संवादात आय.आय.टी. दिल्ली येथील प्राध्यापक यशपाल जोगदंड सहभागी झाले होते.

या संवादात यशपाल जोगदंड यांनी सामाजिक शास्त्राच्या आय.आय.टी. क्षेत्रातील विविध शैक्षणिक संधी, अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया, आय.आय.टी. क्षेत्रातील अभ्यासाचे वातावरण, ग्रंथालय, प्लेसमेंट, राहण्याची सुविधा, स्कॉलरशिप इत्यादी बाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. यासोबतच समाजकारण, राजकारण, अर्थकारण याबाबतही मोकळी चर्चा झाली. डॉ. यशपाल जोगदंड यांनी दीक्षाभूमीबद्दल आस्थेने विचारपूस केली. डॉ. आंबेडकरांनी निर्माण केलेली ही दीक्षाभूमी प्रेम व शांतीचे प्रतीक असल्याची माहिती विद्यार्थ्यांनी त्यांना दिली. सोबतच दीक्षाभूमीवर येणा?्या लाखो जनतेच्या बाबासाहेबांबद्दलच्या असलेल्या मानसिकतेबद्दल जाणून घेण्यासाठी विजयादशमीच्या दिवशी दीक्षाभूमीवर सर्वे करण्यात यावा व अनुयायांच्या मुलाखती घेण्यात याव्या असे मार्गदर्शन जोगदंड यांनी केले. प्राध्यापक यशपाल जोगदंड यांची भेट घडवून आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश फुलझेले, प्रा. डॉ. गौतम कांबळे, प्रा. डॉ. मोहन वानखेडे यांचे सहकार्य मिळाले.

## डिप्टी सिग्नल परिसरात युवकाच्या हत्येने तणाव

### २ मित्रही जखमी, २ आरोपी ताब्यात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :**
सोमवारी रात्री मोटारसायकलचा धक्का लागल्यावरून झालेल्या वादात अल्पवयीन आरोपीने साथीदारासोबत मिळून तीन तरुणांवर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात तीनही तरुण गंभीर जखमी झाले. यातील एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता.

पोलिसांनी गुन्हा नोंदवून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. या घटनेवरून डिप्टी सिग्नल परिसरात तणावाची स्थिती निर्माण झाली. मृतक आणि जखमी तरुणांच्या कुटुंबीयांनी आरोपींच्या घरांवर हल्ला करून तोडफोड केली. इतकेच नाहीतर पोलिसांवरही दगडफेक करण्यात आली.

बळाचा वापर करून पोलिसांना परिस्थितीवर नियंत्रण मिळवावे लागले. नागेश गणेश सोनसाठी (21) रा. संजयनगर, डिप्टी सिग्नल असे मृताचे नाव आहे. जखमी शिवा बहुरसिंग सेलोकर (21) आणि गोविंदा रेवा शाहू (20) यांच्यावर मेयो रुग्णालयात उपचार सुरू आहेत. करण बिरजू हीरा (21) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याचा अल्पवयीन साथीदारही पोलिसांच्या ताब्यात आहे.

नागेश, शिवा आणि गोविंदा हे तीनही तरुण मजुरी करतात. सोमवारी रात्री कामावरून परतल्यानंतर तिघेही मोटारसायकलने फिरायला निघाले. डिप्टी सिग्नलच्या संतोषी माता मंदिरजवळ त्यांची मोटारसायकल बंद पडली. त्याच दरम्यान मागून येत असलेल्या करण आणि अल्पवयीनच्या मोटारसायकलचा धक्का लागला. यावरून दोन्ही गटात बाचाबाची होऊन हाणामारी सुरू झाली. अल्पवयीन आणि करणने चाकू काढत तिघांवरही हल्ला करीत गंभीर जखमी केले आणि फरार झाले. कुटुंबीयांनी जखमींना उपचारार्थ मेयो रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान नागेशचा मृत्यू झाला.

**कुलूप तोडून घुसले आरोपींच्या घरात**

या घटनेनंतर परिसरात तणाव पसरला. परिस्थिती पाहता आरोपी करण आणि अल्पवयीनच्या घरासमोर दंगा नियंत्रक पथक तैनात करण्यात आले. रात्री 1.30 वाजताच्या सुमारास 150 ते 200 संतप्त लोकांच्या जमावाने दोघांच्याही घरावर हल्ला केला. पोलिसांनी त्याला अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांशी धक्काबुक्की करीत संतप्त लोक आरोपींच्या घराचे कुलूप तोडून आत घुसले. घरातील सामानाची तोडफोड केली. जमावाने पोलिसांवरही दगडफेक सुरू केली. यात महिला कॉन्स्टेबल सारिका माने जखमी झाल्या. अखेर पोलिसांनी बळाचा वापर करून जमावाला पांगवले.

**अंत्यसंस्काराच्या वेळीही तणावाची स्थिती**

मंगळवारी नागेशच्या अंत्यसंस्काराच्या वेळीही परिसरात तणावाचे वातावरण होते. न्यायालयाने करणला पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी करण आणि अल्पवयीनवर खुनाचा गुन्हा नोंदविला आहे तर, आरोपींच्या घरावर दगडफेक, तोडफोड आणि दंगा करणाऱ्या जमावावरही गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## १० ते १२ ऑक्टोबरपर्यंत साजरे होणार धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे कार्यक्रम

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ८ :**
दरवर्षी प्रमाणे यावर्षी परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या विद्यमाने दीक्षाभूमी, नागपूर येथे ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन वर्धापन दिनाचे कार्यक्रम दिनांक १० ते १२ ऑक्टोबर पर्यंत आयोजीत करण्यात आले आहेत.



दरवर्षी अनुयायांची गर्दी दीक्षाभूमीवर वाढत आहे. या वर्षी देखील धम्मचक्र प्रवर्तन दिन समारोहासंबंधी व्यवस्था करण्यासाठी नागपूर महानगरपालिका, नागपूर महानगर क्षेत्र. विकास प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, महाराष्ट्र शासनाचे आरोग्य सेवा विभाग आणि पोलिस विभाग यांच्या तर्फे अनुयायांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण यंत्रणा कामाला लागली आहे.

यापूर्वी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांनी या सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेतली व त्यांनी सर्व संबंधितांना आवष्यक सूचना दिल्या आहेत. त्यामुळेच आम्ही एवढा मोठा कार्यकम घांततेत आणि कुठलीही अनुचित घटना न घडता पार पडतो.

१४ ऑक्टोंबर १९५६ रोजी विजयादशमीला परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पवित्र दीक्षाभूमीवर पूज्य महास्थवीर चंद्रमणी यांचेकडून त्रिशरण व पंचशील ग्रहण करून धम्मदीक्षा घेतली.

त्या प्रसंगाची स्मृति म्हणून या वर्षी देखील येत्या १४ ऑक्टोबरला सकाळी ९ वाजता दीक्षाभूमीवर पूज्य भदंत आर्य नागार्जून सुरई ससाई अध्यक्ष, प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, यांचे प्रमुख उपस्थितीत बुध्दवंदना घेण्यात येईल. याचवेळी संपूर्ण नागपूर शहरातील बुध्द विहारात बुध्द वंदना घेण्यात यावी असे आवाहन स्मारक समितीतर्फे करण्यात आले आहे.

## अवादा ग्रुपच्या सुपर फॅक्टरीमध्ये १३ हजार कोटींची गुंतवणूक



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ८ :**
भारताच्या अग्रगण्य नूतनीकरणयोग्य उर्जा कंपन्यांपैकी एक असलेल्या अवादा ग्रुपने आपल्या नवीन उत्पादन अवादा इलेक्ट्रो प्रा. लि.ची नागपूरमधील बुटीबोरी औद्योगिक उद्यान येथे आधारशिला बसविण्यात आली. हि आधारशिला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ठेवण्यात आली.

अवादाच्या रु.13,650 कोटी गुंतवणूकीचा भाग, ही नवीन सुविधा भारताच्या नूतनीकरणयोग्य उर्जा महत्वाकांक्षेमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. 2030 पर्यंत कार्बन उत्सर्जनात 50% पर्यंत कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या आणि 2070 पर्यंत शुद्ध-शून्य उत्सर्जन साध्य करण्याच्या देशाच्या उद्दीष्टात सुपर फॅक्टरी योगदान देईल. अवादाने मॉड्यूल ग्लास आणि फ्रेम तयार करण्यासाठी सहाय्यक युनिट्स स्थापित करून घरगुती पुरवठा साखळी वाढविण्याची योजना आखली असून त्यामुळे उच्च-गुणवत्तेच्या पीव्ही मॉड्यूलचे वेळेवर वितरण सुनिश्चित होते.

या कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ही सुविधा महाराष्ट्राच्या औद्योगिक वाढीबद्दल अवादाची वचनबद्धता दाखवते आणि शाश्वत उर्जा समाधानास प्रोत्साहित करण्यासाठी राज्य आणि राष्ट्रीय उद्दीष्टे या दोन्ही गोष्टींशी संरेखित करते. हे सौर उत्पादनासाठी मुख्य हब म्हणून महाराष्ट्राला बळकटी देते आणि या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि वातावरणावर त्याचा काय परिणाम होईल हे पाहून आम्ही उत्सुक आहोत.

अवादाच्या पहिल्या टप्प्यात सौर पेशींसाठी 5 जीडब्ल्यू आणि मॉड्यूलसाठी 3 जीडब्ल्यूची नियोजित क्षमता असलेल्या वेफर टू मॉड्यूल प्रोजेक्टची सुरूवात होईल. या प्रकल्पात अनेक भूमिकांमध्ये 5,000 हून अधिक नवीन रोजगार उपलब्ध आहेत. याव्यतिरिक्त, स्थानिक आयटीआयसह भागीदारीसाठी वचनबद्ध आहे.

## समूहगायन स्पर्धेचा पुरस्कार सोहळा आज

■ **महासागर प्रतिनिधी हिंगणा, दि. ८ :**
नादब्रह्म या संस्थेद्वारे आयोजित 'स्वतंत्रता का स्वराभिषेक' या देशभक्तीपर आणि संस्कार समूहगायन स्पधेर्चा पुरस्कार वितरण सोहळा बुधवार, दिनांक ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग, नागपूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

या प्रसंगी त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभही विद्यार्थ्यांना मिळणार आहे.अंतिम फेरीतून निवड झालेल्या १० शाळांतून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक आणि दोन उत्तेजनार्थ शाळांची घोषणा केली जाईल. त्यांना पुरस्कार राशी आणि सन्मानचिन्ह डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते बहाल करण्यात येईल. तसेच उर्वरित पाच शाळांना स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे. यावेळी मान्यवर उपस्थित राहतील.

## नागपुरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची हजेरी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :**
विदर्भात उन्हाचा चटका तापदायक ठरत असतानाच उपराजधानीत मंगळवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास ढगांच्या गडगडाटासह आणि वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. विजांच्या कडकडाटासह अचानक पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे वाहनचालकांची चांगलीच तारांबळ उडाली.

ऑक्टोबर हीट वाढल्याने विदर्भात उन्हाचा चटका तापदायक ठरत आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमान सातत्याने ३५ अंश सेल्सिअसच्या वर नोंदवले जात आहे. अशा स्थितीत भारतीय हवामान खात्याने आज महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील जिल्ह्यात तसेच विदर्भात विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा दिला होता. शनिवारपासून मोसमी पावसाने राज्यातील नंदूरबार जिल्ह्यातून परतीच्या पावसाचा प्रवास सुरु केला. मात्र, त्यानंतर त्यात फारशी प्रगती दिसून आली नाही.

दरम्यान, आता पुन्हा राज्यातील काही भागातून मोसमी पावसाच्या परतीसाठी पोषक वातावरण तयार होत आहे. केरळ आणि परिसरावरील चक्राकार वारे तसेच बंगालच्या उपसागरापासून लक्षद्वीप बेटापर्यंत असलेली चक्राकार वाऱ्याची स्थिती यामुळे अरबी समुद्रात हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. विदर्भात अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा वाढत आहे. सोमवारी अकोल्यात ३७.८ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. ब्रम्हपूरी येथे ३६.२ अंश सेल्सिअस तापमान होते. उर्वरित जिल्ह्यात देखील तापमान ३४, ३५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक आहे.

## मोबाईल चोरांची आंतरराज्यीय टोळी जेरबंद

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :**
शहरातील वेगवेगळ्या भागात फिरून मोबाईल चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय मोबाईल चोरांची टोळी गुन्हे शाखा युनिट 4 च्या जाळ्यात अडकली. पोलिसांनी तीन अल्पवयीनसह 8 आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून 11 मोबाईल फोनही जप्त करण्यात आले.

आरोपींमध्ये शेख महताब शेख कलीम (22), शेख जोनी शेख मकरुद्दिन (27), शेख टायगर शेख नसरुद्दिन (19), शेख शोहेब शेख उमर (23) चारही रा. साहेबगंज, झारखंड, इम्तियाज मेहबूब आलम (21) रा. मुर्शिदाबाद, बंगाल आणि तीन अल्पवयीनचा समावेश आहे.

नीलेश दत्ता बारलवार हे गत रविवारच्या रात्री वाठोडा चौकातील आठवडी बाजारात खरेदीसाठी गेले होते. या दरम्यान गदीर्चा लाभ घेऊन अज्ञात आरोपीने त्यांच्या खिशातील मोबाईल फोन लंपास केला. नीलेश यांनी वाठोडा पोलिसात तक्रार दाखल केली. झारखंडच्या काही अल्पवयीन मुलांची टोळी मोबाईल चोरीत सक्रिय असून वांजरा परिसरात भाड्याने खोली करून रहात असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी आरोपींना पकडले.

## कामठीत आज सरकारविरोधात आंदोलन


■ **महासागर प्रतिनिधी कामठी, दि. ८ :**
दलित महिला सरपंचांवर अन्याय झाल्याच्या निषेधार्थ भाजप समर्थित महाराष्ट्र महायुती सरकारचा विरोध दर्शविण्यासाठी एक दिवसीय धरणे आंदोलन ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० करण्यात येणार आहे.

डॉ . बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ जयस्तंभ चौक, कामठी येथे होणार आहे . या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन ग्रामपंचायत, येरखेडाच्या सरपंच श्रीमती सरिताताई रंगारी व सदस्यांनी केले आहे .

## फातिमा व कांशीराम स्मृति दिवस

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :**
भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका व सावित्रीबाईंच्या सहकारी फातिमा शेख यांचा ९ आक्टोंबर रोजी १२४ वा स्मृतिदिन आहे. तसेच बामसेफ, बीआरसी, डी एस-फोर व बहुजन समाज पार्टीचे संस्थापक मान्यवर कांशीराम साहेब यांचाही ९ ऑक्टोबर रोजी 18 वा स्मृतिदिन आहे.





बसपाच्या कही हम भूल न जाये या राष्ट्रीय अभियानांतर्गत बुधवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता नागपुरातील बसपा चे कांशीराम मार्गावरील मुख्यालय बहुजन भवन येथे या दोन्ही महापुरुषांच्या स्मृतिदिनाचा कार्यक्रम होत आहे. बसपाचे प्रदेश, जिल्हा, शहर, विधानसभा, सेक्टर व बूथ स्तरावरील आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व फुले शाहू आंबेडकरी विचाराच्या हितचिंतकांनी उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी केले आहे.



■ **नागपूर :** हरियाणा राज्याच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने सलग तिसऱ्यांदा विजय संपादन केला. निकालाचे आकडे जाहीर होताच नागपूर येथे भाजपा कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. विशेषतः भाजपच्या महिला कार्यकर्त्यांनी फुगडी खेळत या विजयाचा आनंदोत्सव साजरा केला.

## महायुती, आघाडीत रस्सीखेच!






**मनोज बागडे**

विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. नवरात्रोत्सवानंतर कधीही आचारसंहिता लागण्याची शक्यता असून, सर्वच राजकीय पक्ष आणि बाशिंग बांधून तयार असलेले उमेदवार कामाला लागले आहेत. गेल्या महिन्यात नागपूर येथे आढावा बैठकीसाठी आलेले केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी विदर्भात ज्याची सरशी, त्याची सत्ता.. असे स्पष्ट करीत या भागावर अधिक लक्ष केंद्रीत करण्याचे निर्देश दिलेत.

शहा यांच्या सूचनेनंतर भाजपाने विदर्भातील सर्व ६२ जागांवर फोकस केला असला तरी महायुतीमधील शिंदे आणि अजित पवार या दोन गटांव्यतिरिक्त मित्रपक्षांच्या मागणीने भाजपाची डोकेदुखी आणखीच वाढली आहे. विदर्भातील ११ जिल्ह्यांपैकी नागपूर जिल्ह्यात सर्वाधिक १२ विधानसभा मतदारसंघ असून, त्यातील ६ हे नागपूर शहरात तर उर्वरीत ६ नागपूर ग्रामिणमध्ये येतात.

२०१९ च्या निवडणुकीत भाजपा आणि शिवसेना एकत्रीत लढले. मात्र, सेनेच्या वाघांना गुरगुरण्याची संधीच मिळाली नाही. सर्व १२ जागा भाजपाने लढल्या आणि ६ जागांवर विजय मिळविला. काँग्रेसने ४ तर राष्ट्रवादीने १ जागा जिंकली होती. रामटेकमधून अपक्ष ॲड. आशिष जयस्वाल विजयी झाले होते.

सव्वा दोन वर्षापूर्वी एकनाथ शिंदे आणि १४ महिन्यांपूर्वी अजित पवारांच्या बंडानंतर राज्यातील राजकीय समिकरण पूर्णतः बदलून गेले. भाजपा, शिंदे गट आणि अजित पवार गट मिळून महायुतीचे ७ आमदार आहेत. त्यात भाजपाच्या ६ आणि शिंदे गटाचे ॲड. जयस्वाल यांचा समावेश आहे. उमरेडचे काँग्रेसचे आमदार राजू पारवे यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी (धास्तीने ?) आमदारकीचा राजीनामा दिला, काँग्रेस सोडली आणि शिंदे गटाकडून रामटेक लोकसभेची निवडणूक लढविली. पराभूत झाल्यानंतर त्यांनी आता उमरेडमधून विधानसभेची तयारी चालविली आहे. यावेळी चिन्ह तेवढे वेगळे असेल.

नागपूर जिल्ह्यातील १२ जागांचे वाटप करताना महायुतीच्या विशेषतः भाजपा नेत्यांच्या नाकी नऊ येणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर शहरातील दक्षिण पश्चिम मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतात. त्यांच्याविरोधात भाजपातून कुणी ब्र काढणार नसले तरी, इतर पाच मतदारसंघात अनेक पहेलवान तेल लावून बसले आहेत. पूर्व नागपूर - कृष्णा खोपडे, मध्य नागपूर - विकास कुंभारे आणि दक्षिण नागपूर - मोहन मते हे भाजपाचे विद्यमान आमदार असले तरी पक्षातूनच इतरांनी दावेदारी प्रस्तुत केली आहे. पश्चिम नागपूर (विकास ठाकरे) आणि उत्तर नागपूर (डॉ. नितीन राऊत) या दोन काँग्रेसच्या ताब्यात आहेत. येथूनही भाजपाचे अनेक इच्छूक दंड थोपटून आहेत.

महायुतीमधील शिवसेना शिंदे गटाचे नागपूर शहरात फारसे प्रस्थ नसले तरी त्यांच्या स्थानिक नेत्यांनीही काही जागांवर दावा ठोकला आहे. अजित पवार गटाचे प्रशांत पवार एकदोन जागेचे घोडे दामटत आहेत. पीपल्स रिपब्लीकन पार्टीचे प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी शिंदे गटाला समर्थन दिले आहे. राखीव जागांवर त्यांचा डोळा असणे स्वाभाविक आहे. उत्तर नागपूरची जागा ते मागू शकतात. अशा परिस्थितीत नागपूर शहरातील ६ जागांपैकी आपण किती लढायच्या? आणि मित्रपक्षांना किती सोडायच्या? भाजपासमोर मोठी विवंचना उभी ठाकली आहे

नागपूर ग्रामिणमधील विधानसभेच्या जागांचे वाटप ही त्यापेक्षा मोठी डोकेदुखी आहे. कामठी (टेकचंद सावरकर) आणि हिंगणा (समीर मेघे) हे दोन मतदारसंघ भाजपाच्या ताब्यात आहेत. काटोलमधून चरणसिंह ठाकूर, सावनेरमधून राजीव पोतदार, कामठीतून मल्लिकार्जून रेड्डी आणि उमरेडमधून सुधीर पारवे या भाजपा उमेदवारांना पराभवाचे तोंड पाहावे लागले होते.

अनिल देशमुख आणि सुनील केदार हे मविआचे दोन तगडे आमदार समोर असल्याने भाजपा येथून लढण्याचे धाडस करते की महायुतीतील मित्रपक्षांना जागा सोडते, वाटपानंतरच चित्र स्पष्ट होईल. मात्र, भाजपाच्या आशिष देशमुखांसह अनेकजण ताकदीनिशी रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत.

रामटेकमधून ॲड. आशिष जयस्वाल अपक्ष निवडून आले होते. आता ते शिंदे गटात असून, महायुतीत त्यांनाच उमेदवारी मिळेल. तरी भाजपाचे माजी आमदार रेड्डी दंड, बैठका काढत आव्हाने देवू लागले आहेत. काँग्रेस सोडून शिंदे गटात गेलेले उमरेडचे माजी आमदार राजू पारवे यांना उमेदवारी गेल्यास भाजपातूनच मोठा विरोध होण्याची शक्यता आहे. नागपूर ग्रामीणच्या या दोन जागा शिंदे गटाला गेल्यास, अजित पवारांच्या वाट्याला काय? हाही प्रश्न कायम आहे.

एकूणच काय तर निवडणुकीचा प्रत्यक्ष रणसंग्राम सुरू होण्यापूर्वी महायुतीमध्ये जागा वाटपावरून मोठे रणकंदन होऊ शकते.

**मविआतही ओढाताण?**

दुसरीकडे, महाविकास आघाडीमध्येही अनेक जागांवरून धुसफूस सुरू आहे. पूर्व नागपूर, मध्य नागपूर, दक्षिण नागपूर, या तीन जागांसाठी काँग्रेसच्या डझनभर दावेदारांनी अर्ज सादर केले आहेत.

आघाडीत काँग्रेसबरोबरच उद्धव ठाकरे शिवसेना आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा समावेश आहे. काँग्रेसचे ३ तर शरद पवार गटाकडे १ आमदार आहे. ठाकरेंच्या शिवसेनेला यापूर्वीही येथे फार काही करता आले नाही. तरी, जागा वाटपात एखादी जागा त्यांना पदरात पाडून घ्यावी लागेल. रामटेकसाठी उबाठा जोरआजमाईश करत आहे.

गेल्यावेळी काटोल आणि हिंगणा या दोन जागा राष्ट्रवादीने लढवल्या होत्या आणि काटोल जिंकले. परिणामी, शरद पवार गट दोन्ही जागांवरचा दावा कायम ठेवणार की एखादी जागा सोडणार? चित्र लवकरच स्पष्ट होईल.

बच्चू कडू यांचा प्रहार आणि सोबतच तिसरी आघाडी, त्याचप्रमाणे बसपा, डॉ. मानेंची बीआरएसपी असे पक्षही मैदानात असतील. परिणामी, नागपूर जिल्ह्याच्या बहुतेक मतदारसंघात अगदीच निकराची लढाई होणार आहे. तत्पूर्वी, जागावाटप ही महायुती आणि आघाडीसाठी मोठी डोकेदुखी ठरेल.

### शिविगाळ केल्यावरून

# मित्राची हत्या

## जखमी करीत छतावरून फेकले

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :** दारूच्या नशेत शिविगाळ केल्याचा बदला घेण्यासाठी मित्रानेच मित्राला ठार मारण्याचा कट रचला. बहाण्याने प्रेयसीच्या घरी घेऊन गेला. छतावर घेऊन जात भरपूर दारू पाजली. शस्त्राने सपासप वार करून गंभीर जखमी केले व नंतर छतावरून खाली फेकले. यात उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यू झाला.

ही थरारक घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. लीलाधर रवी टंडन (२४) रा. भवानीनगर, पारडी असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी लीलाधरचे वडील रवी मंगल टंडन (५४) यांच्या तक्रारीवरून खुनाचा गुन्हा नोंदवत आरोपीला अटक केली आहे. संजय दशरथ ठाकरे (४०) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

आरोपी संजय हा ड्रायव्हरचे काम करतो. वस्तीतच राहणाऱ्या लीलाधरशी त्याची मैत्री होती. दोघेही नेहमीच सोबत दारू प्यायचे. शुक्रवारी लिलाधरने दारूच्या नशेत संजयला शिविगाळ केली होती. याचा राग संजयच्या मनात होता. त्याने लीलाधरला धडा शिकवण्याचा कट रचला. शनिवारी रात्री तो लीलाधरच्या घरी गेला. गाडी आणायला जायचे आहे, असे सांगितले आणि लीलाधरला मोटारसायकलवर बसवून घेऊन गेला.

रस्त्यात दोघांनीही दारू खरेदी केली. त्यानंतर संजय त्याला आपल्या प्रेयसीच्या घरी शिवशंभूनगर येथे घेऊन गेला. प्रेयसीच्या घरी छतावर बसून दोघांनीही दारू ढोसली. लीलाधर मद्यधुंद झाल्याचे समजताच संजयने आपला राग व्यक्त करीत मारहाण सुरू केली. शस्त्र काढून त्याच्यावर हल्ला केला. जीव वाचविण्यासाठी लीलाधरने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र दारूच्या नशेत असल्याने तो त्यात अपयशी ठरला. संजयने गळा, मान व इतर ठिकाणी शस्त्राने सपासप वार करीत त्याला रक्ताच्या थारोळ्यात लोळवले आणि त्यानंतर छतावरून खाली फेकले.

नागपूर शहरात पुन्हा गुन्हेगारीने डोके वर काढले असून, गेल्या काही महिन्यात खून व खूनाच्या प्रयत्नाच्या अनेक घटना घडल्या.

**पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न**

त्यानंतर संजय जखमी लीलाधरला घेऊन पारडी पोलिस ठाण्यात पोहोचला. ओळखत नसल्याचा बनाव करीत रस्त्यावर जखमी अवस्थेत मिळाल्याची माहिती दिली. मात्र गळा व इतर शरीरावर शस्त्राचे घाव असल्याने पोलिसांना संशय आला. त्यांनी लीलाधरला उपचारार्थ मेयो रुग्णालयात रवाना करून संजयची विचारपूस केली. तो पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने गुन्हा कबूल केला. पोलिसांनी गुन्हा नोंदवून संजयला अटक केली.

**उपचारादरम्यान लीलाधरचा मृत्यू**

लीलाधरची प्रकृती सुरुवातीपासूनच चिंताजनक होती. मध्यरात्रीच्या सुमारास उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून रविवारी संजयला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला ८ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. पुढील तपास सुरू आहे.

# नागपूरमध्ये महायुतीत वादाची ठिणगी

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ८ :** नागपूर मधील अजित पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये भाजप विषयाची नाराजी चांगलीच वाढली आहे. या संदर्भात स्थानिक पदाधिकाऱ्यांची एक विशेष बैठक नागपुरात पार पडली. या बैठकीत भाजपच्या 'एकला चलो'च्या धोरणाची तक्रार पक्ष श्रेष्ठींकडे करणार असल्याचे ठरवण्यात आले.

आमचा पक्ष हा भाजपच्या दावणीला बांधलेला नाही, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत पवार यांनी भाजपवर पलटवार देखील केला आहे. यामुळे आता नागपूर मध्ये महायुतीमध्ये वादाची ठिणगी पडली असल्याचे बोलले जात आहे.

नागपूर मध्ये भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व दिसून येते. त्यामुळे नागपूर शहर आणि जिल्ह्यातील सर्व १२ जागांवर भाजपचा दावा सांगितला जात आहे. या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे नागपूर शहराध्यक्ष जितेंद्र उर्फ बंटी कुकडे यांनी सर्वच १२ जागा भाजप लढवणार असल्याचे म्हटले होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे स्थानिक पदाधिकारी नाराज असल्याचे दिसून येत आहे.

त्यातच आता अजित पवारांचे शहराध्यक्ष प्रशांत पवार यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केल्याने महायुतीतील वाद आता समोर आला आहे.

**तीन जागांची मागणी**

भाजपचे नागपूर शहर अध्यक्ष जितेंद्र कुकडे यांनी सर्व १२ विधानसभा मतदारसंघावर भाजपच निवडणूक लढवणार असल्याचा दावा केला होता. इतकेच नाही तर मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष देखील आमचे काम करणार असल्याचे देखील त्यांनी जाहीर केले होते.

त्यावर आता अजित पवार यांच्या पदाधिकाऱ्याने देखील पलटवार केला आहे. आमचा पक्ष दुसऱ्याच्या दावनीला बांधलेला नाही, असे म्हणत प्रशांत पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. आमचे नेतृत्व जे ठर-वेल, त्यांनी कोणाचे काम करायचे हे सांगितले की, त्याचे काम करू, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने दिला आहे.

अजूनही महायुतीमध्ये जागावाटपाची चर्चा सुरू आहे. त्यामुळे नागपूर मधून आम्ही तीन जागांची मागणी केली असल्याचे देखील अजित पवार यांच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. यामध्ये पश्चिम नागपूर, उत्तर नागपूर आणि काटोला विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे.

# आयोगाला गांभिर्याने घ्या... अन्यथा कारवाई निश्चित!

## आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांचा इशारा



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ८:** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग राज्यातील दलित, आदिवासींपर्यंत शासनाच्या योजना पोहोचविणे तसेच त्यांच्या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी कार्य करते. या योजनांचा लाभार्थ्यांना लाभ मिळावा ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

२मात्र प्रशासनाकडे ना पूर्ण आकडेवारी आहे ना माहिती. प्रशासनाने राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाला गांभीर्याने घेउन यापुढे पूर्ण तयारीनिशी बैठकीत उपस्थित रहावे, अन्यथा कारवाईला सामोरे जावे, असा सज्जड इशारा राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी पत्रकार परिषदेमधून दिला.

ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी सोमवार ७ ऑक्टोबर रोजी नागपुरात प्रशासनाची बैठक बोलाविली होती. या बैठकीमध्ये प्रशासनाकडे असलेली अपूर्ण आकडेवारी, अपुरी माहिती यावर पत्रकार परिषदेतून ॲड. मेश्राम यांनी नाराजी व्यक्त केली. बैठकीमध्ये नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त आणि प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या अनुपस्थितीवरही ॲड. मेश्राम यांनी नाराजी व्यक्त करीत त्यांनी कामात सुधारणा करावी, असा इशारा दिला.

ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी आयोगाच्या कायार्ची माहिती दिली. शासनाच्या योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांना मिळावा यावर आयोग देखरेख ठेवतो. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या अनेक प्रश्नांना न्याय देण्याचे कार्य केले. या समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीने अनेक योजना अंमलात आणल्या. मात्र प्रशासनाकडून केवळ या योजना कागदावरच सिमित ठेवण्यात आल्याचा आरोप आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. मेश्राम यांनी केला.

या योजनेचे लाभार्थी, लाभ देण्यात आलेल्यांची संख्या, त्यांची माहिती आजही प्रशासनाकडे उपलब्ध नाही. राज्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनांचा लाभ देणे अपेक्षित असताना २० टक्केच लाभार्थ्यांपर्यंत लाभ पोहोचता करण्यात आला. ही प्रशासनाची नामुष्की आहे. त्यामुळे प्रशासनाने आता भविष्यात गांभीयार्ने कार्य करून लाभार्थ्यांपर्यंत या योजना पोहोचवून योजनांचे खरे उद्दिष्ट साध्य करावे, असे निर्देशही ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी दिले.

राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ यांच्या नेतृत्वात आयोगाकडून राज्यातील दलित, आदिवासी समाजाच्या प्रश्नांना, समस्यांना न्याय देण्याचे कार्य करण्यात येत आहे. आयोगाचे कामकाज पारदर्शी ठेवण्यावर भर असून आयोगाच्या सर्व बैठका या प्रशासकीय बैठकांच्या धर्तीवर आयोजित करण्यात येतील, अशी माहिती त्यांनी दिली.

२००४ ते २००८ या कालावधीमध्ये राज्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा २१७४ कोटीचा मोठा घोटाळा झाला होता. या घोटाळ्याच्या चौकशीसाठी नागपूर शहराचे तत्कालीन पोलिस आयुक्त के. व्यंकटेशन यांच्या अध्यक्षतेत तीन सदस्यीय एसआयटी गठीत करण्यात आली होती. राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाद्वारे या समितीचा अहवाल मागविण्यात आला असून या घोटाळ्याची चौकशी करून हा घोटाळा उजागर करण्यात येईल. गोरगरीब दलित, आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा पैसा लाटण्याचे कारस्थान करणाऱ्यांना धडा शिकविला जाईल, असा इशारा ॲड. मेश्राम यांनी दिला.

## वाघाने पाडला गाईचा फडशा

■ **महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. ८ :** कन्हान नदी काठालगत सिहोरा गावाजवळ भर दुपारी वाघाने हल्ला करून गोवणातील गाईला ठार केले. वाघाने आणखी एका गाईला गंभीर जखमी केल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सोमवारी सकाळी सिहोरा शेत परिसरात वाघ आढळल्याची माहिती नागरिकांनी वन विभाग व पोलीस विभागाला दिल्याने प्रशासनाने सावध राहण्याचे आवाहन केले होते . दुपारी ३ वाजताच्या दरम्यान कन्हान नदी काठालगत खंडेलवाल यांच्या मोकळ्या जागेतील झुडपी जंगलात गावाजवळ वाघाने हल्ला करून पशु मालक शांताराम भोंधु मेश्राम यांच्या गोवणातील गाईला ठार केले तर आणखीएका गाईला गंभीर जखमी केले.

सदर घटनेची माहिती वनविभाग अधिकाऱ्यांना मिळताच आरफओ ए. बी. भगत, वनपाल बी. डी. वरखडे, सिहोरा परिक्षेत्र वनरक्षक, सिहोरा वनरक्षक एन. के. मेश्राम, पटगोवरी वनरक्षक सतिश वासनिक, वनमजुर म्हैसुर भोंडेकर यांनी घटनास्थळी पोहचून घटनास्थळाचा पंचनामा केला . पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर भदाने यांनी शवविच्छेदन केले. जखमी गाईवर उपचार सुरू आहेत .



## विकास प्रकल्पांचे आज लोकार्पण व भुमिपूजन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :** नागपूर महानगरपालिकेच्या वतीने नागपूर शहरातील विविध विकास प्रकल्पाचे लोकार्पण व भूमिपूजन बुधवार ९ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण व भूमिपूजन करण्यात येईल.

सकाळी १०.३० वाजता सहकार नगर पुलाजवळ आयोजित कार्यक्रमात आमदार प्रवीण दटके, चंद्रशेखर बावनकुळे, डॉ. परिणय फुके, कृपाल तुमाने, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, आमदार मोहन मते, विकास ठाकरे, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, नागपूर स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा-चांडक, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर उपस्थित राहतील.

मान्यवरांच्या हस्ते पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पाच्या भूमिपूजनासह नवीन श्रीमंत राजे रघोजीराव भोसले नगर भवन अर्थात टॉऊन हॉलच्या इमारतीच्या बांधकाम कार्याचे भूमिपूजन, स्व. बाळासाहेब ठाकरे प्राथमिक शिक्षण, कला व सांस्कृतिक केंद्राचे बांधकाम कायार्चे भूमिपूजन, नागपूर शहरातील कृत्रिम विसर्जन कुंडाचे बांधकाम कायार्चे भूमिपूजन, महानगरपालिका अंतर्गत सतनामी जी.एम. बनातवाला, राणी दुर्गावती नगर, चिचभूवन प्राथमिक तथा माध्यमिक शाळेचे बांधकाम व विस्तारीकरण कार्याचे भूमिपूजन, नागपूर शहरातील विविध ठिकाणी खुल्या जागेचे तसेच रस्त्याच्या दुभाजकांचे सौंदर्यीकरण व विकास कार्याचे भूमिपूजन, उद्यानांचे नुतनीकरण / सौंदर्यीकरण / विकास कार्याचे भूमिपूजन, शहरातील विविध उड्डाणपुलाखाली तसेच इतरत्र ठिकाणी लॅन्डस्केपिंग / कारंजे / सौंदर्याकरण कायार्चे भूमिपूजन, दक्षिण पश्चिम नागपूर क्षेत्रातील जयताळा व गायत्रीनगर जलकुंभाचे लोकार्पण आणि नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्रातील आरोग्य विभागामार्फत नव्याने कार्यान्वित चंद्र नगर, सर्वत्र नगर, वैभव नगर आयुष्यमान आरोग्य मंदिराचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

## निधन

### सुरेश गुलाबराव भुरशे



■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ८ :** वानाडोंगरी निवासी सुरेश गुलाबराव भुरशे ( वय ६३ ) यांचे आज मंगळवार ८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता वानाडोंगरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येईल.

## प्रा. संजय ढोबळे यांना स्व. धरणीधर गांधी समाज शिक्षक पुरस्कार



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :** स्व. धरणीधर गांधी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शिक्षक, प्राध्यापकांना देण्यात येणारा पुरस्कार डॉ. संजय ढोबळे यांना जाहीर झाला आहे.

स्व. धरणीधर यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला, शिक्षणाची व्यवस्था नसल्याने नागपूर येथे मॉडेल मिलमध्ये त्यांनी नोकरी पत्करली. शिक्षणाची आवड असल्याने नोकरी करतानाच बी. कॉम. व पुढे एम. कॉमची पदवी प्राप्त केली. ते सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. ५ फेब्रुवारी हा त्यांचा स्मृतिदिवस.

या निमित्ताने जे प्राध्यापक उत्तम पद्धतीने विद्यादान करीत असतानाच सामाजिक बांधिलकी स्वीकारून समाज प्रबोधनाचे काम करतात त्यांना दरवर्षी १ लाख रुपये, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात येतो.

२०२५ चा धरणीधर गांधी समाज शिक्षक पुरस्कार प्रा. डॉ. संजय ढोबळे यांना देण्यात येणार आहे. डॉ संजय ढोबळे हे रातुम नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात वरीष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. पदवी व पदव्युत्तर स्तरावर सुमारे ३१ वर्षांचा अध्ययनाचा व ३० वर्षांचा संशोधनाचा अनुभव आहे. विविध व्याख्याने, सेमिनार व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर, त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

शैक्षणिक सहकार्यासाठी परदेशवारी करून त्यांनी ज्ञानदान केले आहे. जवळपास ९५० शोधप्रबंध प्रकाशित असून ३० आंतरराष्ट्रीय पुस्तकांचे ते संपादित लेखक आहेत, डॉ. ढोबळे यांनी ७० पेटंट प्रकाशित केले आहेत. अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित असून अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या टीमने प्रकाशित केलेल्या टीमच्या प्रतिष्ठित यादीत जगातील टॉप २% वैज्ञानिकांमध्ये त्यांचा गौरवाने उल्लेख केला आहे.

आतापर्यंत हा पुरस्कार प्रा. आलोक शेवडे, डॉ. कुमार शास्त्री, डॉ. संध्या पवार, सौ. सुषमा रमेश मानकर (फुलारी), डॉ. दिलीप पेशवे यांना देऊन सन्मानित केले आहे. हा पुरस्कार स्व. धरणीधर गांधी यांच्या स्मृतीदिनी ५ फेब्रुवारी रोजी समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# आजचे राशिभविष्य

**मेष :** व्यवसाय व्यवहाराशी संबंधित बाबतीत सावधगिरी बाळगा. कामाच्या ठिकाणी बदल किंवा नवीन सुरुवात करण्यासाठी वेळ योग्य नाही. नोकरदार लोकांना काही समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

**वृषभ :** नोकरदार महिलांना त्यांच्या आवडीनुसार काम मिळाल्याने दिलासा मिळेल. कौटुंबिक जबाबदा-या समजून घ्या आणि मनापासून पूर्ण करा. दैनंदिन दिनचर्येवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**मिथुन :** कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत तुमच्या रागावर नियंत्रण ठेवा. तथापि, संयम आणि विवेकाने, आपण लवकरच परिस्थिती सामान्य कराल. वैवाहिक जीवन आनंदी राहील.

**कर्क :** विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. अनावश्यक खचार्ला सामोरे जावे लागेल, महत्त्वाची कामे ठप्प होऊ शकतात. कुठेही संभाषण करताना आपल्या प्रतिष्ठेची काळजी घ्या.

**सिंह :** व्यवसायात तुम्हाला तुमच्या मेहनतीनुसार योग्य फळ मिळेल. महिलांशी संबंधित व्यवसाय यशस्वी होतील. भागीदारीशी संबंधित व्यवसायात यश मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** कोणताही विशेष निर्णय घेताना जोडीदार आणि कुटुंबातील सदस्यांचा सल्ला फायदेशीर ठरेल. प्रेमसंबंधांमध्येही जवळीक वाढेल.

**तुळ :** काही काळापासून सुरू असलेल्या समस्येवर तुम्हाला उपाय मिळेल. अध्यात्मिक आणि रंजक कार्यातही रस आणि विश्वास वाढेल. गुंतवणूक करण्यापूर्वी त्याबाबत योग्य ती माहिती घ्या.

**वृश्चिक :** डोकेदुखी आणि मायग्रेनची समस्या टाळण्यासाठी, तणाव आणि थकवा हावी होऊ देऊ नका. भागीदारीशी संबंधित बाबींमध्ये अत्यंत सावधगिरी बाळगण्याची गरज आहे.

**धनु :** जमीन, वाहन इत्यादींशी संबंधित खरेदीसाठी कर्ज घेण्याची योजना आखली जाऊ शकते. पण काळजी करू नका. यामुळे तुमची संपत्ती आणि समृद्धी वाढेल. शेजा-यांशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवा.

**मकर :** तुमची कोणीतरी खास भेट होईल. कुटुंबाशी संबंधित तुम्ही घेतलेले कोणतेही निर्णय सर्वांसाठी फायदेशीर ठरतील. तुम्हाला तुमच्या कोणत्याही समस्येचे निराकरण देखील मिळेल.

**कुंभ :** परिस्थितीनुसार आपले नियोजन करा, यामुळे काम पद्धतशीरपणे होण्यास मदत होईल. यावेळी केलेल्या मेहनतीचे आगामी काळात चांगले फळ मिळेल.

**मीन :** व्यवसायाची योग्य व्यवस्था ठेवण्यासाठी तुम्ही विशेष प्रयत्न कराल. सरकारी कामांशी संबंधित व्यवसायात कामे पूर्ण करण्याचे धोरण यशस्वी होईल. थोडी सावधगिरी बाळगा.

## रेड लाइट एरियातील त्या पोलिसांची उचलबांगडी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :** गंगाजमुनात येणाऱ्या ग्राहकांना लुबाडणाऱ्या पोलीस चौकीतील त्या चार पोलीस कर्मचाऱ्यांची चौकीतून उचलबांगडी केली आहे. यापूर्वी, वरिष्ठांनी चौकीतील सर्वच पोलीस कर्मचाऱ्यांना कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले असून, गंगाजमुना पोलीस चौकीला कुलूप ठोकण्यात आले.

शकील शेख, सुखदेव गिरडकर, केशव तोंडरे आणि मुकेश श्रीपाद अशी चौकीतून बदली करण्यात आलेल्या वादग्रस्त पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. लकडगंज पोलीस ठाण्याच्या अंतर्गत गंगाजमुना वस्तीत पोलीस चौकी तयार करण्यात आली आहे.

चौकीत सहायक पोलीस निरीक्षक किचक, उपनिरीक्षक माहुलकर यांच्या नेतृत्वात पाच पोलीस कर्मचारी तैनात आहेत. गेल्या काही दिवसांपासून चौकीतील पोलीस कर्मचारी गंगाजमुनात येणाऱ्या ग्राहकांना पकडून चौकीत बसवून ठेवत होते. त्यांना मारहाण करुन पैसे उकळत होते. रोख रक्कम नसलेल्या ग्राहकांना पानठेल्यावरील क्यूआर कोडवर पैसे पाठवून वसुली करीत होते.

पोलीस उपायुक्त महक स्वामी यांनी चौकीतील सर्वच कर्मचाऱ्यांना लेखी खुलासा करण्याचे आदेश दिले. गंजाजमुनात गेल्या काही दिवसांपासून जुगार अड्डे सुरु झाले आहेत. त्या जुगार अड्डयांना शिंदे आणि शकील यांचा आशिर्वाद आहे. अब्दूलच्या माध्यमातून जुगार अड्डयावरुन मोठ्या प्रमाणात वसुली सुरु आहे. या सर्व प्रकाराकडे मात्र ठाणेदाराचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याची माहिती समोर आली आहे.

गंगाजमुना चौकी काही काळासाठी बंद करण्यात आली असून संबंधित कर्मचाऱ्यांची नियमानुसार चौकशी करण्यात येणार आहे.

गंगाजमुना पोलीस चौकीतच कर्मचारी दारू पार्टी करतात आणि ग्राहकांना लुटतात, अशी माहिती होती. मात्र, ठाणेदाराने अभय दिले. आता या चारही पोलीस कर्मचाऱ्यांची चौकीतून उचलबांगडी केली आहे.

## गांजा विक्रेत्यास अटक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :** कामठी पोलिसांनी गोपनिय माहितीवरून एका गांजा विक्रेत्याला अटक केली. सिद्धार्थ राजू धमगाये (38) रा. रमानगर, कामठी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

कुंभारे कॉलनी परिसरात बब्बू अलीच्या घराजवळ एक व्यक्ती गांजा विकत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी संयुक्त पथक तयार करून तेथे धाड टाकली. सिद्धार्थला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याजवळ 6 किलो गांजा मिळाला.

चौकशीत सिद्धार्थने सांगितले की, तो निक्की नावाची महिला, सलमान आणि मोहित अशा तीन जणांच्या मदतीने गांजाची खरेदी करतो आणि परिसरात विकतो. पोलिसांनी चारही आरोपींवर गुन्हा नोंदविला आहे.

## निमार्णाधिन इमारतीतील जुगारावर धाड

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ८ :** गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने गोपनिय माहितीवरून निमार्णाधिन इमारतीत धाड टाकली. यावेळी 7 जुगाऱ्यांना रंगेहात जुगार खेळताना अटक करण्यात आली. महेश मंगलप्रसाद जयस्वाल (53), प्रमोद भाऊराव पानबुडे (50), अनिकेत अशोक मानकर (36), कमलेश गंगाधरप्रसाद जयस्वाल (48), रोहित सुनील ठाकरे (33), अमित अशोक नेवारे (32) सर्व रा. शिवणगाव आणि प्रशांत बाबाराव बिजवे (44) रा. शिवशक्ती लेआऊट, सोनेगाव अशी आरोपींची नावे आहेत.

शिवणगाव पुनर्वास परिसरात कानतोडे नावाच्या व्यक्तीच्या निमार्णाधिन इमारतीत काही लोक जुगार खेळत असल्याची माहिती पथकाला मिळाली होती.

पोलिसांनी तेथे धाड टाकली. वरील आरोपी जुगार खेळताना रंगेहात मिळाले. पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेत त्यांच्याकडून रोख 87,840 रुपये, 8 मोबाईल फोन, वाहन आणि ताश पत्त्यांसह 4.83 लाख रुपयांचा माल जप्त केला. आरोपींविरुद्ध बेलतरोडी ठाण्यात जुगार बंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

## युनियन बँक ऑफ इंडियात हिंदी पंधरवाड्याचा समारोप

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८:** युनियन बँक ऑफ इंडियाने परवाना भवन, किंग्सवे कॉम्प्लेक्स, नागपूर येथे हिंदी पंधरवाडा समारोप समारंभ आणि पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केला.

यावेळी नागपूर क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्र प्रमुख एम. व्ही. एन. रविशंकर, उपक्षेत्र प्रमुख राजेश यादव आणि एस. शिवकुमारन, नरकस (बँक) सदस्य सचिव राजीव कुमार यांच्यासह स्थानिक शाखा व बाहेरील शाखांचे कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

पंधरवाडा समारोपीय कार्यक्रमात कु. कुमुद यांनी सांगितले की, हिंदी पंधरवाड्यांतर्गत विविध हिंदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांमध्ये कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या कर्मचाऱ्यांबरोबरच स्थानिक शाखांनाही त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राजभाषा शिल्डने सन्मानित करण्यात आले. स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळविणाऱ्या कर्मचाऱ्यांसह, विभागातील चार शाखांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राजभाषा शिल्डने सन्मानित करण्यात आले. वर्षभरातील चांगल्या कामाबद्दल १० कर्मचाऱ्यांना रोख पारितोषिक व प्रमाणपत्रे देण्यात आले. ६ स्पर्धांमध्ये अनेक विजेत्यांना शिल्ड, बक्षिसे आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.




यावेळी प्रादेशिक कार्यालयाचे क्षेत्र प्रमुख एम.व्ही.एन.रविशंकर यांनी सर्व कर्मचाऱ्यांना राजभाषा हिंदीत काम करण्यास प्रोत्साहित केले. प्रादेशिक कार्यालय नागपूर यांना नरकस (बँक) कडून तृतीय तर मध्यवर्ती कार्यालय मुंबई यांना तृतीय पारितोषिक मिळाल्याची माहितीही त्यांनी दिली. राजभाषा विभागात होत असलेल्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी आयोजित विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

Sindhu Education Society's

**K. C. Bajaj College of Pharmacy & Research**

Sindhu Education Society Campus, Jaripatka, Nagpur - 14
Approved by PCI, New Delhi & DTE, Mumbai,
Affiliated by DBATU, Lonere, Raigad & MSBTE, Mumbai.

**Institute Code - 4693**

**RECRUITMENTS**

| S.N. | Subject / Department | Professor / Principal | Associate Professor | Assistant Professor |
|---|---|---|---|---|
| 1. | Pharmaceutics | 01 | 03 | 03 |
| 2. | Pharmaceutical Chemistry (Including Pharm Analysis) | | | 04 |
| 3. | Pharmacology | | | 03 |
| 4. | Pharmacognosy | | | 02 |
| 5. | Pharmacy Practice and Related Subject | -- | -- | 02 |
| 6. | Librarian | | | 01 |
| | | 01 | 03 | 15 |
| | Total | | 19 | |

**Conditions :**
1. The educational qualifications, experience, pay scale etc. applicable for the respective post is as per the norms specified by UGC/PCI New Delhi, Govt. of Maharashtra; and Dr. Babasaheb Ambedkar Technological University (DBATU), Lonere, Dist. Raigad and as modified from time to time.
2. Those who are in service should apply through proper channel.
3. The applications received after the last date will not be considered. The college will not be responsible for any delay including postal delay.
4. The incomplete applications or applications without the attested copies of supporting documents will not be entertained.
5. No. TA-DA will be paid for attending the interview.
6. The applications giving full particulars and attested copies of all the supporting documents should reach to the under-signed **"The President/Principal"**, K. C. Bajaj College of Pharmacy & Research, Sindhu Education Society Campus, Jaripatka, Nagpur 440014, within 21 (twenty-one) days from the date of publication of this advertisement.

**Place : Nagpur, Date : 09.10.2024**

**PRINCIPAL**